


# तुका झालासे कळस

खंड १

# तुका झालासे कळस

खंड १

ई साहित्य प्रतिष्ठान

"तुका झालासे कळस" हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी आहे. त्यावर कोणाचाही कायदेशीर अधिकार नाही. हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांना वाटण्याचे अधिकार व जबाबदारी आम्ही आपल्याकडे देत आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान हे नवीन लेखक कवींना जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचण्याचे साधन आहे. तसेच सुमारे दोन लाख वाचकांसाठी दर्जेदार साहित्य विनामूल्य नियमितपणे मिळण्याचे साधन आहे. सुमारे दोन लाख मराठी वाचक ई मेल द्वारे व वेबसाईट्द्वारे ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तकांचा आस्वाद घेत असतात.

त्याचबरोबर भावार्थ ज्ञानेश्वरी, छत्रपती शिवाजी, शंभूराजे, मावळे, विवेकानंद, सावरकर आदि विषयांवरची पुस्तकंही तरूण मराठी मुलांपर्यंत आणण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठान करतं. दर आठवड्याला नवनवीन पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानला आपल्या सहकार्याची गरज आहे.

नवीन साहित्यासाठी.

नवीन वाचकांसाठी.

मराठीला नवीन क्षितिजांशी नेण्यासाठी.

आभार

Tukaram.com

Khapre.org

Marathivishwakosh.com

Athavanitil-gani.com

साहित्य प्रतिष्ठान ®

दशलक्षावधी भक्त

साडेसातशे वर्षं

शेकडो मैलांचा खडतर मार्ग

जगात कुठेही नसेल अशी एक उदात्त परंपरा जपणाऱ्या

वारकरी संप्रदायास

हे पुस्तक भावपुर्वक अर्पण

विनंती

“घरकी मुर्गी दाल बराबर” अशी एक म्हण आहे. इंग्रजी आणि हिंदी वाचून पंडितकी गाजवणाऱ्या आपल्या मराठी माणसांना ज्ञानोबा तुकारामांसारखे आपल्या घरातले महाविद्वान संत दिसत नाहीत. कारण हे संत मोठमोठ्या गोष्टी, क्लीष्ट भाषेत, बोजड करून सांगत नाहीत. अगदी सहज साध्या भाषेत सांगतात. आणि मग त्याचं भाषांतर वाचून अमेरिकेतले विद्वान जी पुस्तकं वाचतात ती जगभरात बेस्ट सेलर होतात. गुरुदेव टागोरांनी नोबेल पारितोषिक विजेती गीतांजली लिहिण्या आधी तुकारामांचे अभंग वाचले आणि बंगालीत भाषांतरित केले. गुरुदेव रविंद्रनाथांचे बंधू सत्येंद्रनाथ हे पहिले भारतीय ICS सनदी अधिकारी. ते १८७१ साली अहमदनगर, सातारा, पुणे आणि मुंबई भागात होते. त्या काळात त्यांनी तुकारामांचे अभंग वाचले आणि ते प्रभावित झाले. त्यानंतर त्यांनी व त्यांचे भाऊ रविंद्रनाथ यांनी तुकारामाच्या अनेक अभंगांचे “तुकोबा” या नावाने बंगाली व नंतर इंग्रजी भाषांतर केले. व याच प्रभावाखाली त्यांनी गीतांजली लिहिली. गीतांजलीच्या अनेक कवितांवर तुकारामांची छाप आहे. गीतांजलीचे इंग्रजी भाषांतर वाचून यिट्स हा इंग्लीश कवी प्रभावित झाला. त्यातले मानवतावादी आणि भूतदयावादी तत्त्वज्ञान ते लोक प्रथमच वाचत होते. एका वर्षातच त्याची फ्रेंच, जर्मन आदी दहा भाषांत भाषांतरे झाली. खुद्द गांधीजींनी तुकारामाच्या अभंगांचे भाषांतर केले.

पण आम्ही मराठी मंडळी मात्र तुकाराम आणि ज्ञानेश्वर शाळेतल्या पुस्तकात नाईलाजाने वाचतो. आणि नंतर तिकडे वळूनही बघत नाही. ज्या तुकाराम महाराजांनी छत्रपतींनी पाठवलेला नजराणा नाकारला आणि महाराजांना क्षात्रधर्माचा उपदेश केला ते तुकाराम महाराज आपल्यासाठी हजारो अभंगांचा नजराणा ठेवून गेले आहेत. त्यातली प्रत्येक ओळ, शब्द म्हणजे जीवनाचा मार्ग दाखवणारा प्रकाश झोतच आहे. पण हा नजराणा आपण नाकारत आहोत. निदान नवीन पिढी.

मित्रहो, मराठीतले असे अनमोल साहित्य आपल्या प्रत्येकाच्या घरी असले पाहिजे. वाचनात असले पाहिजे. आणि आचरणात आले पाहिजे. कारण आज जग आपल्या या खजिन्याने श्रीमंत होत आहे. आणि जर आपण हा खजिना रद्दीत टाकू तर आपल्यासारखे करंटे आपणच ठरू. हे पुस्तक आपल्या जास्तीत जास्त मित्रांना आणि नातेवाईकांना पाठवा. प्रत्येक मराठी माणसाला हे मिळू दे.

विनामूल्य आहे. अमूल्य आहे. येणाऱ्या पिढ्यांना नवा मार्ग दाखवण्याची क्षमता यात आहे.

चला तर. लागा कामाला. करा फ़ॉरवर्ड.

आपले नम्र

टीम ई साहित्य

अनुक्रमणिका

## खंड पहिला :

१) तुकाराम महाराजांचे अल्पचरित्र : मराठी विश्वकोष
२) तुकाराम महाराज संक्षिप्त चरित्र : श्री श्रीधर देहूकर
३) तुकाराम महाराज आणि महात्मा गांधी : सचिन परब
४) तुकोबा आणि छत्रपती शिवाजी : बाबाजी गणेश परांजपे
५) तुकोबा शिवराय भेट : भाऊ राहिरकर
६) संतवाणी : गायकांत विशेष लोकप्रिय अभंग
७) तुकाराम महाराजांचे ५०० अभंग

## खंड दुसरा :

तुकाराम महाराजांचे अभंग ५०१ ते १५००

## खंड तिसरा :

तुकाराम महाराजांचे अभंग १५०१ ते २५००

## खंड चवथा :

तुकाराम महाराजांचे अभंग २५०१ ते ३५००

## खंड पाचवा :

तुकाराम महाराजांचे अभंग ३५०१ ते ४५८३

(ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व VIP सदस्यांना पाचही खंड पाठवले जातील. त्यासाठी पत्र पाठवण्याची आवश्यकता नाही.

इतरांनी खंड २ ते ५ विनामूल्य मिळवण्यासाठी कृपया esahity@gmail.com ला पत्र लिहा. पत्रात आपण हा खंड ज्या लोकांना forward केला त्यांचे ई मेल पत्ते कळवावे)

# <u>संत तुकाराम महाराजांचे अल्पचरित्र</u>

संदर्भ : १. जाधव, रा. ग. आनंदाचा डोह, वाई, १९७६.

२. लाड, पु. म. संपा. श्री. तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा

(महाराष्ट्र शासन), मुंबई, १९७३.

संत तुकाराम

(१६०८-९ मार्च १६५०).

वारकरी संप्रदायाच्या ज्ञानदेवादी चार श्रेष्ठ संतांपैकी अखेरचे संतकवी. पित्याचे नाव बोल्होबा किंवा बाळोबाबावा; मातेचे कनकाई. कुलनाम मोरे; उपनाव अंबिले. तुकाराम महाराजांचा जन्म देहू (पुणे जिल्हा) येथला. आपल्या जातीचा ते शूद्र वा कुणबी असा उल्लेख करतात; कित्येकदा यातिहीन म्हणजे कोणतीही जात नसलेला किंवा हीन जातीचा, असाही स्वतःचा निर्देश ते करतात. मोरेकुळ हे मराठा क्षत्रिय. तुकाराम हे मराठे क्षत्रिय असूनही स्वतःला शूद्र म्हणवतात, ह्याचे कारण संस्कारलोपामुळे त्यांना वेदपठणाचा अधिकार उरला नव्हता, हे होय. तुकोबांचा वंशपरंपरागत व्यवसाय वैश्याचा म्हणजे वाण्याचा होता. शिवाय त्यांच्या घराण्यामध्ये पूर्वापार महाजनकीची वृत्ती होती. महाजन म्हणजे बाजारपेठेच्या व्यापारव्यवहारांतील वजने-मापे, मालाची देवघेव इत्यादींवर देखरेख ठेवणारा आणि व्यापारी कर वसूल करणारा अधिकारी. त्यांच्या मालकीची आणि इनामाची शेती तसेच सावकारीही होती. सुखवस्तू व प्रतिष्ठित असे हे घराणे होते. वाडवडिलांपासून त्यांच्या घराण्यात विठ्ठलभक्तीची मिरास, एकादशीचा उपवास आणि पंढरीची आषाढी-कार्तिकी वारी. तुकाराम महाराजांच्या पूर्वीच्या आठ पिढ्यांची माहिती मिळते. त्यांच्या पूर्वीच्या आठव्या पिढीचा प्रमुख विश्वंभर ह्यांना एका शेतात विठ्ठल-रखमाईंच्या मूर्ती सापडल्या. नदीकाठावरील एका घरात त्या मूर्तींची त्यांनी प्रतिष्ठापना केली. ह्या घरास ‘देऊळवाडा’ असे म्हणत.

तुकाराम महाराजांची वंशावळ अशी : विश्वंभर → हरी → विठोबा → पदाजी → शंकर → कान्होबा → बोल्होबा आणि तुकाराम महाराज चैतन्य. तुकाराम महाराजांच्या आईला सावजी, तुकाराम आणि कान्होबा असे तीन मुलगे झाले. तिला दोन मुलीही झाल्या, असे काही संशोधक सांगतात.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे तुकारामांचा जन्मशक १४९० म्हणजे इ.स. १५६८ व निर्याणशक १५७१ म्हणजे सन १६५० मानीत होते. म्हणून तुकारामांचा एकूण आयुर्दाय त्यांनी ८० वर्षांचा ठरविला होता. तथापि तुकारामांच्या निर्याणकाली त्यांची पत्नी जिजाई ही गरोदर होती, ही वस्तुस्थिती राजवाडे ह्यांच्या ह्या निष्कर्षांशी विसंगत ठरते; कारण राजवाडे ह्यांच्या मतास अनुसरले, तर ह्या वेळी जिजाईची साठी उलटून गेली, असे मानावे लागते. भक्तलीलामृत लिहिणाऱ्या महिपतीने तुकाराम महाराजांच्या पहिल्या २१ वर्षांची क्रमवार हकीकत देऊन तेथे पूर्वार्ध संपले, असे म्हटले आहे. हेही राजवाड्यांच्या संशोधनाशी जुळत नाही. महिपतीच्या ग्रंथातील इतर अनेक प्रसंग व व्यक्तिविषयक उल्लेख कालविसंगत ठरले, तरी त्यांतील कालक्रमाचे महत्त्व नाकारून चालत नाही.

तुकाराम महाराजांचे शिक्षण तत्कालीन सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित घराण्यांतील व्यक्तींप्रमाणे झाले होते, असे दिसते. त्यांच्या साहित्यात संस्कृत-प्राकृत ग्रंथांच्या व्यापक अध्ययनाची आणि सखोल व्यासंगाची अनेक प्रमाणे मिळतात. भक्तिमार्गात असताना पातंजल योगमार्गाचाही त्यांना शोध झाला होता, असे काही अभंगांवरून दिसते. मालकीचे पांडुरंगमंदिर असल्याने तेथे होणारी नित्यनैमित्तिक भजने, कीर्तने, पुराणे ऐकून लहान वयातच त्यांना बहुश्रुतपणा आलेला होता. घरचा व्यवसाय सांभाळण्याच्या दृष्टीने लेखन-वाचन-जमाखर्च ह्यांचे शिक्षणही त्यांना अपरिहार्य होते. आपण यातिहीन असल्यामुळे वेदाध्ययनाला आचवलो, ह्याची खंत त्यांना आरंभी वाटे. तथापि पुढे ज्ञान-भक्ती-वैराग्याने परिपक्व झाल्यानंतर वेदरहस्यच आपल्या वाणीवर कवित्वरूपे प्रकट झाल्याची प्रचीती त्यांना आली. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसी च ठावा' (अभंग २२६६) असे ते आत्मविश्वासाने म्हणू लागले.

लहानपणी चेंडूफळी, हुंबरी, हुतूतू, विटीदांडू इ. अनेक खेळ ते खेळले असावेत. टिपऱ्या, हमामा, फुगड्या इ. खेळही त्यांनी रस घेऊन पाहिले असावेत. क्रीडाविषयक अनेक सुंदर अभंग त्यांनी रचिले आहेत. तुकाराम महाराजांच्या गाथेइतके खेळांचे वैविध्य अन्य संतांच्या गाथांत आढळत नाही.

वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा पहिला विवाह झाला; परंतु त्यांची पहिली पत्नी रखमाई ही अशक्त आणि आजारी असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील खेड येथे राहणाऱ्या आप्पाजी गुळवे ह्यांच्या अवलाई नावाच्या मुलीशी त्यांचा दुसरा विवाह झाला. हीच जिजाई. कित्येक चरित्रकारांच्या मते तुकाराम महाराजांचे दुसरे लग्न पहिली बायको निवर्तल्यानंतर झाले. दुष्काळात उपासमारीने ती मरण पावली, असे तुकाराम आत्मचरित्रपर अभंगात म्हणतात (अभंग १३३३). तुकारामांचे वडील बंधू सावजी हे स्वतःची पत्नी वारल्यानंतर विरक्त बनून तीर्थाटनास निघून गेले ते पुन्हा परतले नाहीत. त्यामुळे वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी व्यवसायासह सर्व प्रपंचाचा भार तुकारामांवर येऊन पडला. त्यानंतर १६३०-३१ मध्ये महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यात त्यांच्या पहिल्या पत्नीबरोबरच त्यांचा मुलगाही मरण पावला; दुकानाचे दिवाळे निघाले; दारिद्र्य आले. ह्या स्थितीमुळे जनातील मान गेला. अपमान होऊ लागले. त्यामुळे अनन्यगती होऊन ते देवाला शरण गेले. नवा जीवनमार्ग त्यांना स्पष्ट दिसू लागला. लहानपणापासून झालेले अध्यात्मविद्येचे संस्कार जागृत होऊन त्यांना उपरती झाली. अभ्यासाची ओढ लागली. ते एकांतवासात रमू लागले. देहूच्या परिसरात सह्याद्रीचे अनेक उंच उंच रम्य पहाड आहेत. त्यांवर जाऊन वाचन-मनन-चिंतनात ते गढून जाऊ लागले. देहूच्या उत्तरेस असलेल्या भामनाथ किंवा भामचंद्र डोंगरावरील लेण्यात ते बसू लागले. ह्याच ठिकाणी त्यांना गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेवदिकांच्या गाथा, योगवसिष्ठ, रामायण, दर्शने इत्यादिकांचा व्यासंग केला. प्रिया, पुत्र, बंधू ह्यांचा संबंध मनातून तुटला. दुकानात बसून केवळ कुटुंबाच्या आणि देहाच्या धारणेपुरते मिळवण्यावर ते संतोष मानू लागले (अभंग १४८६). मनाच्या आणि इंद्रियांच्या विकारांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करू लागले. संतांचा, हरिभक्तांचा सहवास त्यांना मिळत गेला.

ज्ञानेश्वर-एकनाथादी संतांनी परमार्थात गुरूचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे मानले; परंतु गुरूसाठी हिंडण्याची तुकारामांची प्रवृत्ती नव्हती. पांडुरंगच गुरू, ही त्यांची भावना दिसते. तथापि परंपरेचाही त्यांच्या मनावर बळकट संस्कार होता. एका अभंगात (३६८) गंगास्नानास जातांना वाटेत सद्गुरूंनी गाठले; मस्तकी हात ठेवला; भोजनास पावशेर तूप मागितले; पण हे, स्वप्नच होते; त्यामुळे तूप देण्याचा विसर पडला, असे ते सांगतात. सद्गुरूंनी स्वतःचे नाव ‘बाबाजी’ असे सांगितले; राघवचैतन्य, केशवचैतन्य ही गुरुपरंपरा सांगितली. ‘रामकृष्णहरी’ हा मंत्र दिला. माघ शुद्ध दशमी, गुरुवार हा तो दिवस होता, असेही त्यांनी म्हटले आहे. ल.रा. पांगारकर ह्यांच्या मते उपदेशाचे वर्ष १६३२ हे होय. बाबाजी चैतन्य हे उपदेशकाळी हयात नव्हते, म्हणून स्वप्नातच उपदेश झाला, असे म्हणता येते. तथापि वा. सी. बेंद्रे ह्यांच्या मते

बाबाजी चैतन्य हयात होतेच आणि तुकारामांना सद्‌गुरू भेटण्याचा हा योग २३ जानेवारी १६४० रोजी आला. ही भेट देहूलाच झाली की ओतूरला, ह्याबद्दलही वाद असून तो अनिर्णित आहे. तुकारामांच्या अभंगात गंगास्नानाचा उल्लेख आहे. ओतूरला इंद्रायणी दक्षिणवाहिनी असल्यामुळे शास्त्राप्रमाणे तिला गंगा म्हणता येते; अशी गंगा देहूला नाही; म्हणून भेट ओतूरला झाली असावी, असे बेंद्र्यांचे मत आहे. तथापि 'गंगा' ही संज्ञा तीर्थविषयक धर्मशास्त्रात फार लवचिकपणेही वापरलेली आढळते. काशीच्या भागीरथी बरोबर इतर अनेक नद्यांना 'गंगा' ही अतिपवित्र संज्ञा दिलेली आहे.

बाबाजी चैतन्य हे बंगाली वैष्णव संत श्रीकृष्ण चैतन्य अर्थात गौरांग प्रभू ह्यांच्या संप्रदायाचे होते, असे अनुमान काहींनी काढलेले आहे. तथापी गौरांग प्रभू आणि तुकाराम महाराज ह्यांच्या तत्वज्ञानांत भिन्नता आढळते. श्रीकृष्ण चैतन्यांचे तत्वज्ञान शांकरमायावादास वगळणारा अचिंत्य भेदाभेदवाद होय, तर तुकाराम महाराजांचे तत्वज्ञान ज्ञानदेव-एकनाथांचा शाकरमायावाद व चिद्‌विलासवाद ह्या दोन वैचारिक श्रेणी वा टप्पे समाविष्ट करणारा अद्‌वैतवाद होय. श्रीकृष्ण चैतन्यांच्या संप्रदायात विशेषकरून आढळणाऱ्या मधुरा भक्तीची केवळ छटा तुकारामांच्या विराण्यांसारख्या गीतांमध्येही दिसते. शिवाय महाराष्ट्रात बंगाली चैतन्य संप्रदाय केव्हाही, कोठेही दिसत नाही.

बाबाजी चैतन्यांनी दिलेल्या गुरूपदेशाचे वर्णन तुकारामांनी केलेले असले, तरी गुरशिष्यनाते हे गुरूच्या ठिकाणी अहंता वाढविणारे, म्हणून त्यांना विशेषसे मान्य नाही. शिष्यसेवा घेऊ नये, असाही त्यांचा आग्रह आहे; दक्षिणा घेणे तर पापच होय, असे ते मानतात. त्यांना उपदेश झाला तो स्वप्नात म्हणजे तुर्येत किंवा उन्मनीत. तुर्या किंवा उन्मनी म्हणजे आत्मा होय. मांडूक्योपनिषदात शांत, शिव, अद्‌वैत व स्वयंप्रकाश आत्मा हे तिचे स्वरूप सांगितले आहे. जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या तिन्ही अवस्थांना ती व्यापते आणि पलीकडेही राहते. तुकाराम महाराजांनी 'स्वप्न' ह्या संज्ञेने तुर्या वा उन्मनी ह्यांचा निर्देश केला असणे अत्यंत शक्य आहे.

गुरूपदेश झाल्यावर कवित्वाची स्फूर्ती झाली. संत नामदेवांनी पांडुरंगासवे स्वप्नात येऊन जागे केले आणि कवित्व करावयास सांगितले. नामदेवांची शतकोटी अभंगांची संख्या अपुरी राहिली आहे, ती पूर्ण कर, असे पांडुरंगाने सांगितले (अभंग १३२०; १३२१). तुकाराम अभंग लिहू लागले. संसार-परमार्थाच्या अनुभवांतून निष्पन्न झालेला विचार रम्य शब्दरूप घेऊ लागला. शब्दांची रत्ने आणि शस्त्रे त्यांना गवसली (अभंग ३३९६). त्यांच्या अभंगांत शब्दांची

रत्ने जशी दिसतात, तसेच चमत्कार दाखविणारे बाबालोक; भविष्यशकुन सांगणारे, त्यांचे अपधर्म; पाखंड, धार्मिक, कर्मकांड वा थोतांड इत्यादिकांचे परखड खंडन करणारी शस्त्रास्त्रेही आढळतात. त्यांच्या शैलीचेच सूत्र उपर्युक्त अभंगातून त्यांनी बोलून दाखविले आहे. अभंगांतून स्वतःचा उल्लेख ते 'तुका' असा करतात.

आपल्या जीवनातून आणि अभंगांतून शुद्ध परमार्थधर्माच्या स्थापनेचे कार्य त्यांनी चालू ठेवले. त्यांच्या अलौकिक प्रतिभेतून निर्माण झालेल्या अमृतवाणीने सामान्य जनांचा आणि प्रतिष्ठित, सुसंस्कृत लोकांचा समाज आकर्षित होऊ लागला. ब्रह्मसाक्षात्कारी महान संतकवी म्हणून त्यांची कीर्ती त्यांच्या हयातीतच महाराष्ट्रात पसरली होती. लोकांच्या स्तुतीमुळे आपला झडलेला अहंकार पुन्हा जडेल की काय, अशीही त्यांना भीती वाटू लागली होती. तथापि मोहाचा तो टप्पाही त्यांनी ओलांडला. 'मी आहे मजूर विठोबाचा' असे ते लोकांना सांगू लागले. तथापि त्यांचा हेवा आणि द्वेष करणारे दुर्जनही वाढत होते. सालोमालो हे कीर्तनकार, मंबाजीबुवा, देहूगावाचा पाटील हे त्यांत प्रमुख होते. पुण्याजवळील वाघोलीचे रामेश्वरभट ह्यांचेही तुकारामांचे विरोधक म्हणून नाव घेतले जाते. पण रामेश्वरभट हे तुकारामांचे प्रथमपासूनच भक्त बनले होते; त्यांनी तुकारामांचा द्वेष कधीच केला नाही. तुकारामांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडविण्यात रामेश्वरभटांचा हात नव्हता; ती कल्पितकथा आहे. सालोमालो हे तुकारामांचे अभंग स्वतःच्या कीर्तनांत स्वतःच्या नावावर वापरीत. पाटलापेक्षा महाजनकीचा अधिकार त्या वेळी मोठा असल्यामुळे देहूगावचा पाटील मत्सरग्रस्त झाला असावा. तुकोबा शूद्र असून वेदान्तोपदेश करतात, हा मत्सरग्रस्त विरोधकांचा त्यांच्यावर मुख्य आरोप होता. ते स्त्रियांना नादी लावतात असाही आरोप असल्याचे तुकोबांच्या अभंगांतून सूचित होते. नाना प्रकारे ह्या लोकांनी तुकोबाचा छळ केला. त्यांच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या. त्या कोरड्याच्या कोरड्या वर आल्याचा उल्लेख काही अभंगांतत आलेले आहेत (२२४१, २२४३). तुकोबांवर बहिष्काराचाही प्रयोग करण्यात आला होता असे अभंगांतून समजते. मंबाजीने तर पुण्यातील विख्यात राजयोगी आपाजी गोसावी ह्यांस पत्र पाठवून ह्या शूद्राचा ब्राह्मणसुद्धा अनुग्रह घेत असल्याची तक्रार केली होती आणि आपाजी गोसावी ह्यांनी तुकारामांना शिक्षा देण्याचा निश्चय केला होता, ही हकीकत बहिणाबाईंच्या अभंगांत आलेली आहे. तुकोबांनी ह्या सर्व संकटांना तोंड दिले.

वयाची चाळीशी उलटल्यानंतर जग सोडावे, असे त्यांना वाटू लागले आणि वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी त्यांचे निर्याण झाले. शके १५७१, फाल्गुन वद्य द्वितीया (९ मार्च १६५०) हा त्यांचा निर्याणदिन म्हणून मानला जातो. तथापि वा. सी. बेंद्रे ह्यांच्या मते शके १५७१,

विरोधी संवत्सर फाल्गुन वद्य पंचमी, सोमवार हा तो दिवस होय; कारण तुकारामांचे पुत्रपौत्र ह्याच दिवशी पुण्यतिथी साजरी करीत. तुकाराम महाराज विमानात बसून सदेह वैकुंठास गेले असे चरित्रग्रंथांत आणि कथाकीर्तनांत सांगितले जाते; परंतु हे वाच्यार्थ्याने घ्यावयाचे नाही. त्यांचा देहच ब्रह्मरूप बनला, त्यामुळे ते सदेह वैकुंठात गेले, असे ध्वन्यर्थाने म्हणता येते. निर्याणसमयी त्यांना महादेव, विठोबा, नारायण हे तीन मुलगे आणि काशी, भागीरथी व गंगा ह्या तीन मुली अशी सहा अपत्ये होती. ह्या मुली मोझे, गाडे व चांभुलीकर ह्या प्रतिष्ठित घराण्यांत दिलेल्या होत्या.

मठस्थापना करून शिष्यशाखा निर्माण करण्याचे त्यांनी सावधपणे टाळले होते. त्यांनी प्रत्यक्ष शिष्य केलाच नाही. समकालीन रामेश्वरभट वाघोलीकर, बहिणाबाई सिऊरकर आणि नंतर झालेले कचेश्वरभट ब्रह्मे चाकणकर, निळोबाराय पिंपळनेरकर किंवा महिपती ताहाराबादकर ह्यांनी त्यांना गुरू मानले आहे. तथापि रामेश्वरभटांना दीक्षा दिलीच नव्हती. बाकीच्यांना स्वप्नात येऊन त्यांनी दीक्षा दिली, असे उल्लेख आहेत. शिवाजी महाराज आणि तुकाराम ह्यांच्या भेटीबद्दलही ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. वा. सी. बेंद्रे ह्यांनी तुकारामाचरित्राचे  बारकाईने संशोधन करून हे दाखवून दिले आहे.

धर्मरक्षण हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले. त्यासाठी जातपात, उच्चनीच भेद नाकारले. विष्णुदास जन्म घेतात तेच पवित्र कुळ आणि तोच पवित्र देश अशी त्यांची भूमिका होती. सामान्य लोकांना उचित साधनमार्ग दिला पाहिजे. भुताखेतांची साधना, जटाभार वाढविणारे ढोंगी, शकुन सांगणारे भविष्यवादी, क्षुद्र देवतांच्या उपासना ह्यांपासून लोकांना दूर केले पाहिजे, असे त्यांना वाटे. सगुणनिर्गुण हे एकाच आध्यात्मिक साक्षात्काराचे पैलू आहेत; वासना संपूर्ण विलीन होऊन पूर्ण व अविचल स्थिती अनुभवणे हे त्या साक्षात्काराचे फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील भागवत धर्माचा पाया रचून देवालय श्रीज्ञानदेवांनी उभारले आणि तुकारामांनी त्याच्यावर कळस चढविला; असे म्हटले जाते. ह्याचे कारण भागवत धर्माच्या दीर्घ परंपरेची पूर्ती तुकारामांच्या जीवनात आणि साहित्यात झालेली होती. अनन्यभक्ती आणि पारमार्थिक समता ह्यांच्या मुशीत भागवत धर्माने ओतलेली सुवर्णमूर्ती म्हणजे तुकाराम. 'अंत्यजादि योनी सरल्या हरिभजने तयांची पुराणे भाट झाली' असे सांगून तुकारामांनी सामाजिक संकुचित अहंकार आणि शुद्ध धर्म ह्यांच्यातील विरोध स्पष्टपणे दाखवून दिलेला आहे.

मराठी साहित्यात तुकारामांच्या अभंग-गाथेने अढळ स्थान मिळविले आहे. साधकदशेतील ‘मनासी झालेले संवाद’ व ‘नाना बुद्धीचे तरंग’ उत्कटपणे तुकोबांनी व्यक्त केले. संसारातील काही प्रसंग, जनात आलेले अनुभव यांबरोबरोच गोपालकृष्णाच्या बालक्रीडा, विराण्या, ब्रह्मतत्वाचा साक्षात्कार यांचीही अभंगरुप वर्णने त्यांच्या गाथेत आढळतात. संसारी लोकांना केलेला नीत्युपदेश व समाजातील सोंगाढोंगावर केलेला प्रहार हेही त्यांच्या अभंगवाणीचे मोठेच विषय आहेत. तिच्यात लौकिकाच्या नाना क्षेत्रांतील उपमारूपकादी अलंकारांचा मार्मिक वापर आढळतो. ही अभंगवाणी सुभाषितात्मक वचनांनी नटलेली आहे. ती मराठी भाषेचेच एक अंग बनली असून जनसामान्यांच्या तोंडी कायमची स्थानापन्न झाली आहे. आधुनिक मराठी कवींना ही उत्स्फूर्त, उत्कट, अल्पाक्षरसुंदर अभंगवाणी स्फूर्तिदायक ठरली व अनुकरणीय वाटली. मराठी काव्याचे ती एक शाश्वत भूषण होय.

# तुकाराम महाराज संक्षिप्त चरित्र

-श्रीधर देहूकर ( १९१६-२००४)

Tukaram.com

“ये तु धर्म्यामृतमिदम्” गीता १२.२०

“ते हे गोष्टी रम्य । अमृतधाराधर्म्य ।

करिती प्रतीति गम्य । ऐकोनि जे ॥ ” ज्ञानदेवी १२.२३०

देवाच्या चरित्राला परमामृत म्हटले जाते आणि भक्ताच्या चरित्राला धर्म्यामृत म्हटले जाते. देवाची चरित्रे संतांनी गायिली, सांगितली पण संतांची चरित्रे आम्ही सांगणे हे कठीण काम आहे. कारण संत जसे असतात तसे दिसत नाहीत आणि जसे दिसतात तसे असत नाहीत. शिवाय आमची जी शब्दसृष्टी आहे, तीही मर्यादित आहे.

आमुते करावया गोठी । ते झालीच नाही वाग्सृष्टि । आम्हालागी दिठी । ते दिठीच नोहे ॥ (अमृतानुभव)

आपण जर त्यांना विचाराल, आपण कोण? कोठले? कोठून आलात? कोठे जावयाचे? आपल नाव काय? रूप काय? तर ते सांगतील “ काही नाही ”.

काहीच मी नव्हे कोणिये गावीचा । येकटु ठायीच्या ठायी एकु ॥१॥

नाही जात कोठे येत फिरोनिया । अवघेचि वायावीण बोल ॥२॥

तुका म्हणे नाव रूप नाही आम्हा । वेगळा त्या कर्मा अकर्माशी ॥३॥

अशा परिस्थितीत तुकोबांचे (तुकाराम महाराज) चरित्राचा अल्प भाग देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

अनुक्रमणिका


१. जन्म व पूर्वज

२. राजकीय, धार्मिक आणि सामाजिक स्थिती

३. प्रेमळ मातापित्यांचा वियोग

४. साक्षात्कार

५. कवित्वाची स्फूर्ती आणि जलदिव्य

६. तुकोबा आणि दोन संन्याशी

७. धरणेकरी

८. छत्रपती शिवाजी आणि तुकोबा

९. तुकोबांचा बोध उपदेश शिकवण

१०. तुकोबांचे धृपदे, टाळकरी, अनुयायी व शिष्य

११. प्रयाण

११. तुकोबांच्या पश्चात्

## १. जन्म व पूर्वज

धन्य देहूगाव पुण्यभूमी ठाव । तेथे नांदे देव पांडुरंग ॥१॥

तुकोबांची जन्मभूमी, कर्मभूमी असलेले देहू गाव पुण्यभूमी आहे. देहू गावाला धन्यत्व-पुण्यत्व आले ते तेथे नांदत असलेल्या पांडुरंग देवतेमुळे. हे जागृत स्थान आहे.

इंद्रायणी नदीच्या शोभायमान तीरावर पांडुरंग देवाचे देवालय आहे. कटेवर कर ठेवून विश्वाचा जनिता उभा आहे. वामांगी माता रखुमाई आहे. समोर अश्वत्थ वृक्ष आहे. पारावर गरुड हात जोडून उभा आहे. द्वारात विघ्नराज आहेत. बाहेर भैरव आणि हनुमानजी आहेत. दक्षिणेला हरेश्वराचे देवालय आहे. जवळच बल्लाळाचे वन आहे. त्यात सिध्देश्वराचे अधिष्ठान आहे. क्षेत्रवासी धन्य होते, ते दैववान आहेत, वाचेने देवाचा नामघोष करीत आहेत. तुकाराम तुकोबांचे वेळचें हे देहू गावचे वर्णन आहे.

तुकोबांपासून सुमारे तीनशे वर्षांपूर्वी तुकोबांचे पूर्वज विश्वंभरबाबा हे देहू गावी राहात होते. या घराण्याचे कुलदैवत विठोबा होते. घराण्यात आषाढी-कार्तिकीची वारी विश्वंभरबाबाचे वाडवडिलांपासून चालत आली होती. पंढरीची वारी वाडवडिलाप्रमाणे नियमाने चालविण्यास बाबांच्या मातोश्रीने विश्वंभरबाबांच्या या निकट सेवेने देव पंढरपुराहून देहूस धावत आले. जसे पुंडलीकरायाच्या निकट सेवेनें देव वैकुंठाहून पंढरपूरला धांवत आले.

पुंडलिकांचे निकट सेवे । कैसा धांवे बराडी ॥१॥

मूळ पुरुष विश्वंभर । विठ्ठलाचा भक्त थोर ॥१॥

त्याचे भक्तीने पंढरी । सांडूनी आले देहू हरी ॥२॥

आषाढ शुध्द दशमीच्या दिवशी देवाने विश्वंभरबाबांना स्वप्नात भेट देऊन मी तुमचे गावी आलो असल्याचे सांगून देव आंबीयाचे वनात निद्रिस्त झाले. सकाळी विश्वंभरबाबा गावकऱ्यांचे समवेत आंबीयाचे वनात गेले. तेथे त्यांना श्री विठ्ठल रखुमाईच्या स्वयंभू मूर्ती मिळाल्या. मूर्तीची स्थापना बाबांनी आपल्या वाडयांतील देवघरात केली. पंचक्रोशीतील लोकही दर्शनास येऊ लागले. देवाचा प्रतिवर्षी महोत्सव होऊ लागला. महोत्सवाचे खर्चाकरिता शेत इनाम

मिळाले. शुध्द एकादशीस वारी भरू लागली. विश्वंभरबाबाचा काळ झाल्यानंतर त्यांचे चिरंजीव हरी आणि मुकुंद देवाची सेवा सोडून मूळच्या क्षात्र वृत्तीकडे वळले. कुटुंबियांना घेऊन राजाश्रयास गेले. तेथे त्यांना सैन्यामध्ये अधिकाराच्या जागा मिळाल्या. त्यांचे हे कृत्य त्यांच्या आई आमाबाई यांना आवडले नाही. देवालाही पसंत पडले नाही. देवांनी आमाबाईंना स्वप्नात येऊन सांगितले की, तुमच्याकरिता मी पंढरपूर सोडून देहूस आलो आणि तुम्ही मला सोडून येथे राजाश्रयास आलात हे बरे नव्हे. तुम्ही देहूला परत चला. आमाबाईंनी मुलांना स्वप्नातील वृत्तांत निवेदन केला व देहूस परत जाण्याबद्दल परोपरीने सांगितले. मुलांनीं त्याकडे मुळीच लक्ष दिले नाही. पुढे लवकरच राज्यावर परचक्र आले. उभयता बंधू रणांगणावर शत्रूशी लढता लढता धारातीर्थी पडले. मुकुंदाची पत्नी सती गेली, हरिची पत्नी गरोदर होती. तिला घेऊन आमाबाई देहूस आल्या. सुनेला माहेरी बाळंतपणाकरिता पाठविले आणि आपण देवाची सेवा करू लागल्या. हरिच्या पत्नीला मुलगा झाला त्याचे नाव विठ्ठल ठेवले. विठ्ठलाचा पुत्र पदाजी, पदाजीचा शंकर, शंकराचा पुत्र कान्होबा आणि कान्होबाचे बोल्होबा. बोल्होबा यांना पुत्र तीन. वडील सावजी, मधले तुकाराम आणि धाकटे कान्होबाराय.

तुकोबांचा ज्या कुळात जन्म झाला ते कुळ पवित्र होते.

पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ॥१॥

ते कूळ क्षत्रियाचे होते. पूर्वजांनी रणांगणावर शत्रूशी लढता लढता देह ठेवले होते. घराणे सुसंस्कृत होते, धार्मिक होते. घरात पिढयान् पिढया विठ्ठलाची उपासना चालू होती. पंढरीची वारी होती. महाजनकीचे वतन होते. शेतीवाडी होती, साव-सावकारकी, व्यापारधंदा होता. दोन वाडे होते. एक राहण्याचा व दुसरा बाजारपेठेतील महाजनकीचा. गावात चांगली मानमान्यता होती. पंचक्रोशीत प्रतिष्ठा होती. शेती करीत होते म्हणून त्यांना कुणबी म्हणत, व्यापार धंदा करीत होते म्हणून वाणी म्हणत. आणि तुकोबांनी या सगळयांचीच उपेक्षा केली म्हणून त्यांना गोसावी म्हणू लागले.

गोसावी हे काही या कुळाचे आडनाव नव्हे. आडनाव मोरे- आणि गोसावी ही पदवी (इंद्रियाचे धनी आम्ही झालो गोसावी ) गीता काली वैश्याची गणना शूद्रांत होऊ लागली होती.

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यांति - परां गतिम् ॥ गीता  ९.३२

श्रीज्ञानदेव तुकोबांच्या काळात क्षत्रियांचीही गणना शूद्रात होऊ लागली.

तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ॥ ज्ञानेदेवी ९. ४६०.

दोनच वर्ण राहिले होते. ब्राह्मण आणि शूद्र म्हणून तुकोबांना शूद्र म्हणू लागले.

**२. राजकीय, धार्मिक आणि सामाजिक स्थिती**

दक्षिणेत त्यावेळी मुसलमानी सत्तेचा अंमल होता. गोव्यात पोर्तुगीज होते. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही या राज्य करणाऱ्या तीन मुसलमानी सत्ता एकमेकांशी लढत होत्या, गावे बेचिराख होत होती, लुटली जात होती, राजे विलासात दंग असत. ते प्रजेला पीडित. "ब्राह्मणांनी आपले आचार सोडले होते. क्षत्रिय वैश्यांना नाडीत होते, सक्तीने धर्मांतर चालू होते." महाराजांनी म्हटले.

सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ॥

राजा प्रजा पिडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ॥

वैश्यशूद्रादिक । हे तो सहज नीच लोक ॥

वैश्य आणि शूद्र यांच्या संबंधी तर बोलावयास नको. धर्माचा लोप झाला होता. अधर्म माजला होता.

ऐसे अधर्माचे बळ । लोक झकविले सकळ ।।

लोक अधर्मालाच धर्म म्हणूं लागले. संतांना मान राहिला नव्हता.

संतां नाही मान । देव मानी मुसलमान ॥१॥

समाज नाना देव-देवतांच्या मागें लागून विस्कळीत झाला होता. धर्मात आकर्षण राहिले नव्हते. अज्ञानाचा अंधकार पसरलेला होता. लोक प्रकाश देणाऱ्या सूर्याच्या उदयाची वाट पाहात होते. अशा परिस्थितीत देहू गावी चित् सूर्यांचा उदय झाला.

संतगृह मेळी । जगत् अंध्या गिळी । पैल उदयाचळी । भानु तुका ॥३॥

(रामेश्वरभट्ट अभंग)

महान भगवत् भक्त बोल्होबा आणि माता कनकाई यांचे उदरी शके १५३० ( इ.स. १६०९)मध्ये तुकोबांचा जन्म झाला. घरची श्रीमंती असल्यामुळे बालपण मोठया कोडकौतुकात आणि खेळण्यात गेल. प्राथमिक शिक्षण पंतोजीकडून मिळाले. पंतोजी हातांत पाटी घेऊन मुलांचा हात धरून मुलांना शिकवीत.

अर्भकाचे साठी । पंते हाते धरिली पाटी ॥१॥

मुले खडे मांडून मुळाक्षरे काढीत.

ओनाम्याच्या काळे । खडे मांडियेले बाळे ॥१॥

व्यवहाराचे आणि परमार्थाचे शिक्षण तुकोबांना वडील बोल्होबा यांचेकडून मिळाले.वडील बंधू सावजी यांनी धंदा-व्यापारात लक्ष घालण्याचे नाकारल्यावर बोल्होबांनी तुकोबांना धंदा-व्यापार, सावसावकारकी पाहाण्यास सांगितली. बाजारपेठेतील महाजनकीचे वाडयात बोल्होबांच्या हाताखाली काम करता-करता व्यवसायाचे धडे मिळत गेले. वयाचे तेराव्या वर्षी तुकोबांच्या गळ्यात संसार पडला. तुकोबा लौकरच स्वतंत्रपणे व्यवसाय पाहू लागले. सावकारकीत, व्यापारधंद्यांत तुकोबांनी चांगलाच जम बसविला. लोकांकडून शाबासकी मिळू लागली. सर्वजण प्रशंसा करू लागले. राहात्या घरातील सोज्वळ सात्त्विक वातावरण तुकोबांनी बाजारपेठेतील-घरात-व्यवसायात आणले. तिन्ही भावांची लग्नकार्ये झाली. तुकोबांची प्रथम पत्नी दम्याने नेहमी आजारी म्हणून तुकोबांचा दुसरा विवाह पुण्यांतील सुप्रसिध्द सावकार आप्पाजी गुळवे यांची कन्या सौ. जिजाबाई उर्फ आवली यांच्याशी झाला. एका श्रीमंत घराण्याचा दुसऱ्या श्रीमंत

घराण्याशी संबंध होता. हे ऐहिक ऐश्वर्य पराकोटीला पोहोचलं होतं. घरात धन-धान्य विपुल होते. प्रेमळ माता - पिता, सज्जन बंधू, आरोग्यसंपन्न शरीर होतं. कोणत्याही गोष्टीची काही उणीव नव्हती.

माता पिता बंधू सज्जन । घरीं उदंड धन धान्य ।

शरिरी आरोग्य लोकांत मान । एकहि उणे असेना ॥१॥

(महिपतीबाबा चरित्र)

हे सुखाचे समाधानाचे ऐश्वर्याचे दिवस केव्हा गेले, कसे गेले हे थोड-सुध्दा समजले नाही. या नंतर सुखापुढे येतसे दुःख। या भविष्याला सुरुवात झाली.

३. प्रेमळ मातापित्यांचा वियोग

वयाच्या सतराव्या वर्षी कर्तबगार प्रेमळ पिताश्री बोल्होबा मृत्यू पावले. ज्यांनी तुकोबांना मिराशीचे धनी केले.

बाप करी जोडी लेकराचे ओढी । आपली करवंडी वाळवोनी ॥१॥

एकाएकीं केला मिराशीचा धनी । कडीये वाहुनि भार खांदी ॥२॥

मिराशी-महाजनकी आणि देवाची सेवा.ज्यांच्यामुळे संसारतापाची झळ लागत नव्हती, तेच छत्र हारपले.

बाप मेला न कळता । नव्हती संसाराची चिंता ॥१॥

(न कळता म्हणजे एकाकी माझे पश्चात) तुकोबांना असह्य दुःख झाल. हे दुःख कोठे ओसरते न ओसरते तोच पुढील वर्षी प्रेमळ माता कनकाई तुकोबांच्या देखत मृत्यु पावल्या.

माता मेली मज देखता ॥४॥

तुकोबांवर दुःखाचा डोंगरच कोसळला. मातेने तुकोबांकरिता काय केलं नाही? सर्व काही केलं.

काय नाही माता गौरवीत बाळा । काय नाही लळा पाळीत ती ॥१॥

काय नाही त्याची करीते सेवा । काय नाही जीवा गोमटेते ॥२॥

अमंगळपणे कांटाळा न धरी । उचलोनि करी धरी कंठी ॥३॥

यापुढे वयाच्या अठराव्या वर्षी वडील बंधू सावजींची पत्नी निधन पावली. आधीच सावजीचे प्रपंचाकडे लक्ष नव्हते, त्यात पत्नीचा मृत्यू. ते घरदार सोडून तीर्थयात्रेला जे गेले ते गेलेच. कुटुंबातील चार माणसांचा वियोग झाला. ज्या संसारात एकही उणे नव्हते त्यात आता एक एक उणं होऊ लागल. तुकोबांनी धीर खचू दिला नाही. औदासीन्य आवरून विसावे वर्षी प्रपंच नेटका करण्याची हाव धरली. पण हाय! एकविसाव्यात विपरीत काळ आला. दक्षिणेत मोठा दुष्काळ पडला. महाभयंकर दुष्काळ होता तो. इ. स. १६२९ त (शके १५५०-५१) पाऊस उशिरा पडला. शेवटी अती वृष्टीने पिके गेली. लोकांना अजून आशा होती. इ.स. १६३० मध्ये पाऊस अजिबात पडला नाही. सर्वत्र हाहाकार उडाला. धान्याचे भाव कडाडले. चाऱ्याच्या अभावी शेकडो गुरे मेली. अन्नावाचून शेकडो माणसे मेली. सधन कुटुंबे धुळीस मिळाली. अजून दुर्दशा संपली नव्हती. इ.स. १६३१ मध्ये त्या दैवी आपत्तीचा कडेलोट झाला. अती वृष्टीमुळे पिके गेली. महापुराने भयंकर नासाडी झाली. हा दुष्काळ ही दैवी आपत्ती तीन वर्षे टिकली. दुष्काळाच्या ह्या चढत्या दुर्दशेसंबंधी महीपतीबाबा लिहितात -

ती पुढे बरग पडले कठीण । दो पायल्याची झाली धारण ।

पर्जन्य निःशेष गेला तेणे । चाऱ्यावीण बैल मेले ॥१॥

पुढे दुष्काळाच स्वरुप भयंकरच वाढले.

महाकाळ पडीला पूर्ण । जाहाली धारण शेराची ।

ते ही न मिळे कोणा प्रती । प्राणी मृत्यूसदनी जाती ॥१॥

पायलीभर रत्नास पायलीभर उडद मिळेनात.

दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान ।

या दुष्काळामध्ये तुकोबांच्या प्रपंचाची संपूर्ण वाताहात झाली. गुरे ढोरे मेली. साव-सावकारकी बुडाली. व्यापार धंदा बसला. लोकातील मानमान्यता गेली. प्रथम कुटुंब रखुमाबाई आणि एकुलता एक लाडका मुलगा संतोबा यांचा दुष्काळाने बळी घेतला. सावकार आणि व्यापारी यांना दुष्काळी परिस्थिती म्हणजे सुवर्णसंधी. कृत्रीम दुष्काळ टंचाई निर्माण करून शेकडो रुपयांचा फायदा उठविणारे महाभाग आपण हल्ली पाहातोच की, लोकांच्याकडील येणं दुष्काळी परिस्थितीत वसूल करणारे तुकोबा कठोर हृदयाचे नव्हते. उलट आपली दुर्दशा आपत्ती दुःख विसरून, बाजूला ठेवून - दुष्काळात गांजलेल्या पीडलेल्या लोकांना तुकोबांनीं सढळ हाताने मदत केली.

सहज सरले होते काही । द्रव्य थोडे बहु ते ही ।

त्याग केला नाही । दिलें द्विजां याचकां ॥३॥

काही द्रव्य सहज सरून गेल होत आणि थोडबहुत जे राहिल होत ते ब्राह्मणांना, भिकाऱ्यांना, गरजूंना सढळ हाताने दिलं. (यावरून तुकोबांचे दिवाळं निघाल होतं असा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाही.)

संसाराच्या नावे घालोनिया शून्य । वाढता हा पुण्यधर्म केला ॥९॥

मायबाप, पुत्र कलत्रादि कौटुंबिकाचे मृत्यु, दुष्काळाने प्रपंचाची झालेली वाताहात, जनांमधील दुर्दशा, सखे-सोयरे यांनी केलेली निंदानालस्ती, या सर्व आपत्तींना तुकोबांनी धैर्याने तोंड दिले. ते दुर्दशेला आपत्तीला सन्मुख झाले. पळून गेले नाहीत. ते पलायनवादी नव्हते. त्यांना संसार जिंकावयाचा होता. या रणांगणावर माघार घ्यावयाची नव्हती. या असारातून सार काढावयाचे होते. दुष्काळामुळे, दैवी आपत्तीमुळे, मानवी देह, देहसंबंधी - माता,पिता, पुत्र आणि संपत्ति यांचे मूल्यमापन झाले होते. अशाश्वता पटली होती. ते शाश्वत मूल्याचा शोध करू लागले. आपण या उद्वेगातून पार कसे पडू? पैलतीर कसे गाठू. याचा विचार करू लागले.

**४. साक्षात्कार**

विचारले आधी आपुले मानसी । वाचो येथे कैसी कोण्यापरी ॥१॥

ते सत्याच्या शोधार्थ निघाले, त्या निश्चयाने ते भामनाथांच्या पर्वतावर गेले. चिरंतन सत्याचा साक्षात्कार झाला तरच परत फिरायचं नाहीतर नाही. त्यांनी निर्वाण मांडले. तुकोबांच्या अंगावर मुंग्या, विंचू, सर्प चढले, ते अंगाला झोंबले व पीडा देऊ लागले. वाघाने झेप घातली. मात्र तुकोबांचा निश्चय ढळला नाही. पंधराव्या दिवशी सत्याचा साक्षात्कार झाला.

भामगिरी पाठारी वस्ती जाण केली । वृत्ती स्थिरावली परब्रह्मी ॥१॥

सर्प विंचू व्याघ्र अंगाशी झोंबले । पिडू जे लागले सकळीक ॥२॥

पंधरा दिवसामाजी साक्षात्कार झाला । विठोबा भेटला निराकार ॥३॥

निराकार परमात्मा भेटला. देवाने भक्ताला ‘चिरंजीव भव’ आशिर्वाद दिला. दिलासा दिला.

तंव साहृय झाला हृदय निवासीं । बुध्दि दिली ऐशी नाश नाही ॥२॥

तुकोबांनी घर सोडल्यापासून तुकोबांचे धाकटे बंधू कान्होबा त्यांच्या शोधार्थ देहू गावचे परिसरातील डोंगर, दऱ्या-खोऱ्या, जंगले धुंडाळत होते. शोधता शोधता ते भामनाथ पर्वतावरील गुहेत येऊन पोहोचले आणि आश्चर्यचकित झाले. काय दृश्य त्यांना दिसल ? तुकोबांच्या अंगावर मुंगळे, सर्प, विंचू चढलेले आहेत, वाघांनी झेप घेतलेली आहे. परमात्मा प्रगट झालेला आहे, सोनियाचा दिवस तो. कान्होबांच्या नेत्रांचे पारणे फिटले. जन्माचे सार्थक झाले. उभयता बंधूंची भेट झाली. ज्या स्थळी देव तुकोबांना भेटले, त्या पवित्र स्थळाचे पावित्र्य आणि स्मृती अखंड राहण्याकरिता त्या ठिकाणी कान्होबांनी काही दगड रचले. त्या पवित्र भूमीला वंदन करून उभयता बंधू तेथून निघून सरळ इंद्रायणीच्या संगमावर आले. संगमात स्नान करून पंधरा दिवसाच्या उपवासाचे पारणे सोडले. तुकोबांनी कान्होबांकडून खते पत्रे आणून घेतली. यांचे लोकांकडे जे येणे होते त्या त्या लोकांकडून लिहून घेतलेली खते होती. त्याच्या वाटण्या केल्या. निम्मी खते कान्होबाला दिली आणि स्वतःच्या वाटयाची निम्मी खते तुकोबांनी इंद्रायणीच्या डोहात बुडविली. या धनकोने ऋणकोकडून येण असलेल्या रकमा दुष्काळानंतर येनकेन प्रकारेण वसूल करून आपल्या विस्कटलेल्या संसाराची घडी बसविण्याऐवजी खते गंगार्पण करून ऋणकोंना कर्जमुक्त केले आणि आपण सावकारकीकडे पाठ फिरवून विन्मुख झाल्याचे जगाला दाखवून दिल. याला म्हणतात सच्चा समाजवाद.

देवाचे देऊळ होते जे भंगले । चित्ती ते आले करावे ते ॥१॥

जसे खते पत्रे इंद्रायणीच्या डोहांत बुडवून सावकारशाहीला विन्मुख झाल्याचे विलक्षण रीत्या दाखवून दिले तसेच दुष्काळानंतर भंगलेला संसार न सांधता, देवाच्या भंगलेल्या देवळाचा जीर्णोध्दार करून देवाला - परमार्थाला सन्मुख झाल्याचे तुकोबांनी जग जाहीर केले. पिताश्री बोल्होबांच्या कारकिर्दीत वाढत्या यात्रेला देवघर अपुरे पडू लागले म्हणून इंद्रायणीच्या रम्य तीरावर बोल्होबांनी देवाचे देवालय बांधले व राहत्या वाडयाच्या देवघरातील मूर्तीची स्थापना या नव्या देवालयात केली. तुकोबांच्या वेळी देऊळ भंगले होते. म्हणून दुष्काळानंतर सर्वप्रथम तुकोबांनी देवालयाचा जीर्णोध्दार केला.

श्रीमूर्तीचे होते देवालय भंगले । पाहाता स्फुरले चित्ती ऐसे ॥१॥

म्हणे हे देवालय करावयाचे आता । करावया कथा जागरण ॥२॥

देवालयाचा जीर्णोध्दार केला तो देऊळ बांधण्याने होणाऱ्या पुण्यप्राप्तीरिता नव्हे तर भजन, कीर्तन, कथा, जागरण करण्याकरिता. हरीजागरण, श्रवण, कीर्तन, मनन, सहज साक्षात्कार आणि मग पांडुरंग कृपा - देवालयाने या अशक्य गोष्टीची सहज साध्यता-प्राप्ती झाली.

काही पाठ केली संतांची उत्तरे । विश्वासे आदरे करोनिया ॥१॥

कीर्तन करण्यास उभे राहण्याकरिता देवालय बांधले. आणि कीर्तन करण्यास लागणाऱ्या पाठ-पाठांतराकरिता तुकोबा रोज भंडारा डोंगरावर एकांतात जाऊन अभ्यास करूं लागले. प्रातःकाळी स्नान करून कूळ दैवत श्रीविठ्ठल-रखुमाई यांची स्वहस्ते पूजा अर्चा करावयाची व भंडारा डोंगर गाठावयाचा.

कीर्तन संपूर्ण यावयासी हाता । अभ्यास करिता झाला तुका ॥५॥

अभ्यास तुकया करीतसे ऐसा । सरितासी जैसा पात्र सिंधु ॥६॥

तैसे जे ऐके ते राहे अंतरी । ग्रंथ याहीवरी वाचीयेले ॥७॥

ज्ञानदेव महाराजांची - ज्ञानदेवी, अमृतानुभव, एकनाथ महाराजांची भागवतावरील टीका, भावार्थ रामायण, स्वात्मानुभव, नामदेवरायांचे अभंग, कबीरांची पदे यांचे तुकोबांनी परीशीलन केले. ज्ञानदेव महाराज, नाथ महाराज, नामदेवराय आणि कबीर या थोर भक्तिमार्गीय संतांची काही वचने त्यांनी पाठ केली.

करू तैसे पाठांतर । करुणाकार भाषण ॥१॥

जिही केला मूर्तिमंत । ऐसा संतप्रसाद ॥२॥

निर्गुण निराकार परमात्म्याला ज्यांनी सगुण साकार केला. अमूर्ताला ज्यांनी मूर्तिमंत केला असा हा संत प्रसाद सेवन केला. तुकोबांनी पुराणे पाहिली, शास्त्राचा धांडोळा घेतला.

पाहिलीं पुराणे । धांडोळिली दरूषणे ॥१॥

पुराणीचा इतिहास । गोड रस सेविला ॥१॥

तुकोबांना हा एकांतवास फार आवडत असे. या एकांतात त्यांना सखेसोयरे भेटले होते. अर्थात् ते एकांतांतील सख्यासोयऱ्यांपेक्षा निराळे होते. कोण होते ते ? वृक्ष होते, वेली होत्या ! वनचरे होती. पक्षीराज मधुर, मंजुळ सुरात कुजन करीत होते. देवाला आवळीत होते.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीये सुस्वरे आळविती ॥१॥

येणे सुखे रूचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत ॥धृ॥

आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करू ॥३॥

येणे सुखे रूचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत ॥धृ॥

तुकोबांच्या पत्नी सौ. जिजाबाई रोज घरचा कामधंदा आटोपून स्वयंपाक उरकून तुकोबांचे जेवण घेऊन भंडाऱ्यावर जात असत. तुकोबांना जेऊ घातल्यानंतर आपण जेवत असत, तुकोबा परमार्थ साधनेत निमग्न असता - विदेह स्थितीत असता त्यांची सर्व काळजी सौ. जिजाबाई घेत असत. तुकोबांच्या परमार्थात जिजाबाईंचा फार मोठा वाटा होता. शरीर कष्टवून परोपकार, संत वचनाचे पाठ- पाठांतर, वाचणे विठ्ठलाचे नामस्मरण आणि चित्ताने विठोबाचे ध्यान - अशी साधना अखंड चालू असता तुकोबांच्या स्वप्नात श्रीपंढरीराय नामदेवरायांना घेऊन आले. त्यांनी तुकोबांना जागे केले आणि जगत् उध्दाराकरितां कवित्व करण्याचे काम सांगितले.

### ५. कवित्वाची स्फूर्ती आणि जलदिव्य

नामदेवे केले स्वप्नामाजी जागे । सवे पांडुरंगे येऊनिया ॥१॥
सांगितले काम करावे कवित्व । वाउगे निमित्य बोलो नको ॥धृ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठले । थापटोनि केले सावधान ॥२॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटी लावी तुका ॥३॥

द्याल ठाव तरि राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ॥१॥
आवडीचा ठाव आलोंसे टाकून । आतां उदासीन न धरावे ॥धृ॥
सेवटील स्थळ निंच माझी वृत्ति । आधारे विश्रांती पावईन ॥२॥
नामदेवापायी तुक्या स्वप्नी भेटी । प्रसाद हा पोटी राहिलासे ॥३॥

तुकोबांचा स्वतःचा उध्दार झाला होता.आता त्यांना लोकोध्दार करावयाचा होता. त्यांना लाभलेला प्रसाद लोकांना वाटावयाचा होता. परमात्म्याचा संदेश, निरोप त्यांना घरोघर पोहोचावयाचा होता.

तुका म्हणे मज धाडिले निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥

तुकोबांना कवित्वाची स्फूर्ती झाली.

यावरी झाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरिले चित्ती विठोबाचे ॥

आणि तुकोबांचे मुखातून अभंगगंगा वाहू लागली. सभाग्यश्रोते श्रवण करू लागले.

बोलावे म्हणून बोलतो उपाय । प्रवाहेचि जाये गंगाजळ ॥१॥

भाग्य योगे कोणा घडेल श्रवण । कैचे तेथे जन अधिकारी ॥२॥

तुकोबांच्या अभंगातून श्रुतीशास्त्राचे मथित, महाकाव्य फलार्थ निघू लागला. आळंदीत श्रीज्ञानदेव  महाराजांच्या महाद्वारात तुकोबा कीर्तन करीत असता, ही प्रासादिक अभंगवाणी महापंडित रामेश्वरभट्टजी यांच्या कानावर जाऊन आदळली. त्यांना धक्काच बसला. ही गीताची किं मूर्तीमंत, किं नेणो श्रीमत् भागवत ॥ - ही प्रत्यक्ष वेदवाणीच आणि ती प्राकृतातून आणि ती तुकोबाच्या मुखातून !

तुकयाचे कवित्व ऐकून कानी । अर्थ शोधूनि पाहाता मनी ।

म्हणे प्रत्यक्ष हे वेदवाणी । त्याचे मुखे कानी न ऐकावी ॥

तरी यासी निषेधावे । सर्वथा भय न धरावे ॥

रामेश्वरशास्त्रींनी निषेध केला ते म्हणाले - “तुम्ही शूद्र आहात? तुमच्या अभंगवाणीतून वेदार्थ प्रगट होत आहे, तुमचा तो अधिकार नाही. तुमच्या मुखाने तो ऐकणे हा अधर्म आहे. तुम्हाला हा उद्योग कोणी सांगितला.” तुकोबा म्हणाले, “ही माझी वाणी नव्हे, ही देववाणी आहे.”

करितो कवित्व म्हणाल हे कोणी । नव्हे माझी वाणी पदरीची ॥१॥

माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥२॥

नेणे अर्थ काही नव्हती माझे बोल । विनवितो कोपाल संत झणी ॥१॥

नव्हती माझे बोल, बोले पांडुरंग । असे अंग संग व्यापुनिया ॥२॥

नामदेवराय आणि पंढरीराय स्वप्नात येऊन त्यांनी कवित्व करावयाची आज्ञा केली.

विप्र म्हणे आज्ञा कारण । श्रीची कैसे जाणेल जन ।

यालागी कवित्व बुडवून । टाकी नेऊन उदकात ॥१॥

तेथे साक्षात नारायण । आपे रक्षील जरी आपण ।

तरी सहजचि वेदाहून । मान्य होईल सर्वांशीं ॥१६॥

तुमचे कवित्व बुडवून टाका. देववाणी असेल तर देव तीच पाण्यात रक्षील. गावच्या पाटलाला रामेश्वरशास्त्रींनी तुकोबाच्या या अधर्माबद्दल कळविले. गावचा पाटील रागावला. लोक खवळले.

काय खावे आता कोणीकडे जावे । गावात राहावे कोण्या बळे ॥१॥

कोपला पाटील गावचे हे लोक । आता घाली भीक कोण मज ॥धृ॥

तुकोबांनी अभंगाच्या सर्व वह्या घेतल्या. दगड बांधून त्या इंद्रायणीच्या डोहात स्वहस्ते बुडविल्या. पूर्वी खत-पत्रे प्रपंच बुडविला, आता अभंगाच्या वह्या-परमार्थ बुडविला.

बुडविल्या वह्या बैसिलो धरणे ॥

तुकोबांना असह्य दुःख झालं. लोक निंदा करू लागले. कसला दृष्टांत आणि कसला प्रसाद! सगळ थोतांड. कसला देव आणि कसला धर्म! तुकोबा महाद्वारात असलेल्या शिळेवर

देवासमोर धरणे धरून बसले. प्राण पणाला लावला. निर्वाण मांडले. तेरा दिवस झाले. देव काही पावेना.

तेरा दिवस झाले निश्चक्र करिता । न पवसी अनंता मायबापा ॥

तुजवरी आता प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा॥

तुका म्हणे आता मांडिले निर्वाण । प्राण हा सांडीन तुज वरी ॥

इकडे रामेश्वरशास्त्री तुकोबांचा निषेध करून आळंदीहून निघाले ते नागझरीच्या उगमाजवळील पंचवटापाशी आले. ते  तेथे असलेल्या सरोवरात स्नानाकरिता उतरले. स्नान करीत असता त्या सरोवरातील पाणी नेण्याकरिता अनगड सिध्द फकीर आला. “आपण कोण? कोठून आलात?” म्हणून त्याने विचारले असता त्याला पाहाताच शास्त्रीबुवांनी कानात बोटे घालून बुडी मारली- (यावनी भाषा ऐकावयाची नाही म्हणून) या कृत्याने अनगड सिध्दास राग आला व त्यांनी शाप दिला. रामेश्वरशास्त्री पाण्यातून बाहेर निघताच त्यांच्या अंगाचा दाह होऊं लागला. अंगाला ओले कपडे गुंडाळून फकिराच्या शापातून मुक्त होण्याकरिता शिष्या समवेत शास्त्री आळंदीला परतले व अजान वृक्षाखाली अनुष्ठान करीत बसले.

तो इकडे देहूस तेरावे रात्री भगवंताने सगुण बाळवेष धारण करून  तुकोबांना भेटले. आणि सांगितले की, “आपल्या वह्यांचे मी पाण्यांत अठरा दिवस अहोरात्र उभे राहून रक्षण केले आहे. त्या उद्या पाण्यावरती येतील.”  याप्रमाणे देहू गावच्या भाविक भक्तानांही दृष्टांत झाले. दृष्टांताप्रमाणे ही सर्व भक्तमंडळी इंद्रायणीच्या डोहावर गेली. तो काय सर्व वह्या पाण्यावरती आल्या व तरंगू लागल्या. पोहोणारांनी उडया टाकून त्या ऐल तीरावर आणल्या. त्यांना पाण्याचा यत्किंचितही स्पर्श झाला नव्हता. सर्वांनी जयजयकार केला. देवाला आपण त्रास दिल्याबद्दल तुकोबांना फार खेद वाटला.

थोर अन्याय मी केला । तुझा अंत म्यां पाहिला ॥
जनाचिया बोलासाठी । चित्त क्षोभविले ॥१॥
उदकी राखीले कागद । चुकविला जनवाद ।
तुका म्हणे ब्रीद । साचे केलें आपुलें ॥

तिकडे आळंदीला रामेश्वरशास्त्रींना ज्ञानदेव महाराजांनी सांगितले की, "आपण तुकोबांची निंदानालस्ती केली त्याचे हे  फळ आहे. तरी यावर आता एकच इलाज आपण तुकोबांकडे देहूला जा." रामेश्वरशास्त्री देहूला निघाले, हे तुकोबांना समजले. तुकोबांनी आपल्या शिष्याजवळ शास्त्रीबुवाकरिता एक अभंग देऊन त्यास आळंदीला पाठविले तो अभंग रामेश्वरभटजींनी वाचताच त्यांचा दाह शांत झाला.

चित्त शुध्द तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥

दुःख तें देईल सर्व सुखफळ । होतील शितळ अग्निज्वाळा ॥

रामेश्वर भटजी यासंबंधी आपला अनुभव सांगतात.

काही द्वेष त्याचा करिता अंतरी । व्यथा हे शरीरी बहू झाली ॥

म्हणे रामेश्वर त्याच्या समागमें । झाले हे आराम देह माझे ॥

रामेश्वर भट तुकोबांच्या दर्शनास देहूस आले आणि कथा कीर्तने ऐकण्याकरिता देहूलाच राहिले. रामेश्वर भटांना शापमुक्त केल्याचे वर्तमान अनगडशाहाला कळले, त्याला विषाद वाटला. तो तुकोबांचा छळ करण्याकरिता देहूस आला. तुकोबांचे घरी गेला. कटोराभर भिक्षा मागितली. तुकोबांच्या कन्या हिने चिमूटभर पीठ कटोऱ्यात टाकताच तो पूर्ण भरून पीठ खाली सांडले. सिध्दाचे सामर्थ्य तुकोबांचे द्वारी लयाला गेले. अनगडशहा भक्तिभावाने तुकोबांना भेटले व तुकोबांचे जवळ भजन कीर्तन ऐकण्याकरिता राहिले. दार्शनिक ज्ञान, पांडित्य ऋद्धी व सिद्धी , हरिभक्तीला शरण आल्या. असो. वह्या तरल्याचे शुभवर्तमान देशोदेशी पसरले; वह्या तरल्याने लोकापवाद टळला. अभंगवाणी अविनाशी ठरली; परमात्म्याचे सगुण दर्शन झाले तुकोबांच्या कथा कीर्तनाचा मार्ग मोकळा झाला.

## ६. तुकोबा आणि दोन संन्याशी

अवघा झाला रामराम । कोणी कर्म आचरेन ॥१॥

तुकोबांची कीर्तने नव्या जोमाने व उत्साहाने सुरू झाली. तुकोबांचे लोकाध्दाराचे व जनता जागृतीचे साधन भजन कीर्तन.

तुका म्हणे केली साधना गाळणी । सुलभ कीर्तनी होऊनी ठेला ॥४॥

भगवान श्रीकृष्णाचा जन्म मथुरेचा, पण प्रेमसुख लुटले गोकुळच्या लोकांनी. तुकोबांचा जन्म देहूचा, पण भक्तीप्रेम सुख लुटले लोहगावच्या लोकांनी. लोहगाव तुकोबांचे आजोळ. तुकोबांची कीर्तने नेहमी लोहगावला होत असावियीची. एकदा दोन संन्याशी तुकोबांच्या कीर्तनाला येऊन बसले. त्यांना काय दिसले- स्त्री- पुरुष, कथा- कीर्तन मोठया तल्लीनतेने ऐकत आहेत. लहान-थोर, ब्राह्मण, शूद्र एकमेकांच्या पाया पडत आहेत. भेदभाव नाहीसा झालेला आहे. हे दृश्य पाहून त्यांनी तुकोबांची निंदा करून ब्राह्मणाची निर्भत्सना केली. तुम्ही कर्म भ्रष्ट झालात. कर्ममार्ग सोडून रामराम करत बसलात. ते तेथून निघाले. काखेतील मृगाजीन सावरत सावरत दाद मागण्याकरिता दादोजी कोंडदेवाकडे गेले.

काखे कडासन आड पडे । खडबड खडबड हुसकले ॥१॥

दाद करा दाद करा । फजीत खोरा लाज नाही ॥धृ॥

अवघा झाला रामराम । कोणी कर्म आचरेन ॥३॥

दाद करा दाद करा । फजीत खोरा लाज नाही ॥धृ॥

त्यांनी फिर्याद दिली की - "लोहगावच्या ब्राह्मणांनी ब्रह्मकर्म सोडून दिले आहे ते शूद्राचे चरणी लागले आहेत. आणि राम राम म्हणत आहेत. अधर्म माजलेला आहे. तरी आपण याचे परिपत्य केले पाहिजे." दादोजींनी आपले सैनिक पाठवून ब्राह्मणांना १०० रुपये दंड केला. तुकोबांना आणि लोहगावच्या लोकांना यावयास सांगितले. तुकोबा लोहगावच्या लोकांसह

पुण्यास संगमावर आले व कीर्तन आरंभिले. तुकोबा आल्याचे समजतांच संपूर्ण पुण्य नगरी तुकोबांचे दर्शनास व कीर्तनास लोटली. दादोजीही निघाले. दादोजी, तुकोबांचे कीर्तन ऐकत बसले. संन्याशीही बसले होते. त्यांना तुकोबा परमात्मा स्वरूप दिसू लागले. त्यांच्यावर एवढा प्रभाव पडला की, त्यांनी तुकोबांच्या चरणावर लोटांगण घातल. दादोजींने त्यांना त्यांच्या कृत्याचा जाब विचारला की, “ब्राह्मण शूद्राच्या पाया पडतात, अधर्म होतो अशी फिर्याद आपण देता आणि आपण पाया पडता हे काय?” ते म्हणाले, “आम्हाला कीर्तनात तुकोबांमध्ये नारायण दिसले. ” स्वतः दादोजीने तुकोबांचा सत्कार केला आणि संन्याशांची फटफजिती करून त्यांना शहराबाहेर हाकलून दिले.

## ७. धरणेकरी

बीड परगण्याचा देशपांडे उतारवयांत त्याला वाटू लागले की, आपण पंडित व्हावे. या वयात पाठपाठांतर अभ्यास करून पंडित होण अशक्य म्हणून तो आळंदीला ज्ञानदेव महाराजांच्या जवळ धरणे धरून बसला. ज्ञानदेव महाराजांनी त्याला सांगितले, “बाबा, तू देहूला तुकोबांकडे जा. कोर्ट सध्या तेथे आहे.” त्याप्रमाणे तो देहूस आला. ते समयी तुकोबांनी एकतीस अभंग केले. देवाचा धांवा अभंग सात आणि उपदेश अभंग अकरा तुकोबांचा बोध, विचारसरणी, उपदेशाची पध्दत आणि तत्त्वज्ञान यांतून अभंगाच्या गटात साकल्याने पाहावयास मिळते. तुकोबांनी प्रथम देवाकडे धाव घेतली. देवा तुम्हाला न सांगताहि अंतरातलं गुप्त कळू शकत. तेव्हा अभयदान देऊन आळीकराचे समाधान करा आणि आपली लाज आपण राखा.

न सांगता कळे अंतरीचे गुज । आता तुझी लाज तुज देवा ॥१॥

आळीकर त्यांचे करी समाधान । अभयाचे दान देऊनी ॥२॥

धरणेकऱ्यास उपदेश

पोथ्या, पुस्तक आणि ग्रंथ पाहण्याच्या भानगडीत आता पडू नको. ताबडतोब तू आता हेच एक कर. देवाकरिता देवाला आळव. म्हातारपण आलेले आहे तेव्हा आता उशीर किती करावयाचा ?

देवाचिये चाडे आळवावे देवा । वोस देहभाव पाडोनियां ॥१॥

तू मनाला गोविंदाचा छंद लाव मग तूच गोविंद होशील.

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥

मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया ॥१॥

सुखाने अन्न खा आणि परमात्म्याचे चिंतन कर. हरीकथा ही माउली आहे. आणि सुखाची समाधि आहे. शिणलेल्याची साऊली, विश्रांति स्थान आहे.

सुखाची समाधि हरीकथा माऊली । विश्रांति साऊली शिणलियांची ॥१॥

इतरांनी उपास करावा. विठ्ठलाचे दासाने चिंता झुगारून द्यावी- आमच्या अंगात सगळे बळ आले आहे. तुकोबांनी हा बहुमोल उपदेश त्या धरणेकऱ्यास केला - त्याने मूर्खपणाने काय केल-

देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करोनि गेला ॥

## ८. छत्रपती शिवाजी आणि तुकोबा

तुकोबांची कीर्ती शिवाजी राजे यांच्या कानावर गेली. त्यांनी तुकोबांना दिवटया, छत्री घोडे आणि जडजवाहीर सेवकाबरोबर पाठवून दिले. तुकोबांनी त्याचा स्वीकार केला नाही. सोबत चार अभंगांचे पत्र देऊन तो नजराणा शिवाजी राजांकडे परत पाठविला. ते देवास म्हणाले,

नावडे जे चित्ता । ते तू होशी पुरविता ॥१॥

दिवटया, छत्री, घोडे ही काही मला फायद्यात पडणारी नाहीत (किंवा ह्यांच्यांत मी पडणारा नव्हे) देवा तूं मला यात कशाला गुंतवतोस? तुकोबांच्या ह्या निरपेक्षतेच शिवाजी राजे यांना आश्चर्य वाटलं व ते स्वतः तुकोबांचे भेटीला वस्त्रे, भूषणे, अलंकार, मोहरा घेऊन सेवकांसह लोहगावला आले, ते राजद्रव्य पाहून तुकोबा म्हणाले -

काय दिला ठेवा । आम्हा विठ्ठलचि व्हावा ॥१॥

तुम्ही कळले ती उदार । साठी परिसाची गार ॥२॥

तुका म्हणे धन । आम्हा गोमांसासमान ॥३॥

मुंगी आणि राव आम्हाला दोन्ही सारखेच आहे. त्याचप्रमाणे सोने आणि माती ही आम्हाला समानच वाटते.

मुंगी आणि राव । आम्हा समानचि जीव ॥१॥

सोने आणी माती । आम्हा समानचि चित्ती ॥२॥

आम्ही या गोष्टीने सुखी होणार नाहीत तर आपण देवाचे नाव घ्या. श्रीहरीचे सेवक म्हणवा.

आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ॥१॥

म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥२॥

तुकोबांच्या उपदेशांनी प्रभावित होऊन राजांनी राज्यच सोडून दिले आणि तुकोबांचे भजन कीर्तन श्रवण करू लागले, तेव्हा तुकोबांनी त्यांना आणि त्यांच्या सेवकांना क्षात्र धर्म सांगीतला :

आम्ही जगाला उपदेश करावा । आपण क्षात्रधर्म सांभाळावा ॥

भांडण पडले असता सेवकांनी स्वामीच्या पुढे व्हावे ।

स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण ॥

गोळया, बाण यांचा वर्षाव होत असतां सैनिकांनी तो सहन करावा. आपले संरक्षण करून शत्रूला फसवावे. आणि त्याचे सगळे हिरून घ्यावे. शत्रूला आपला माग लागूं देऊ नये. आपण स्वामीकरिता जीवावर उदार असावे, असे ज्याचे सैनिक- सेवक आहेत तोच त्रैलोक्यांतील सामर्थ्यवान राजा होय.

तुकोबांनी शिवाजी राजे यांना आशीर्वाद देऊन निरोप दिला. राजे आणि सैनिक यांनी तुकोबांचा उपदेश चित्तात धरला, प्रत्यक्ष कृतीत उतरवला. तुकोबांच्या आशीर्वादाने ते सामर्थ्य संपन्न महाराजे झाले.

## ९. तुकोबांचा बोध उपदेश शिकवण

माझ्या विठोबाचा कैसा प्रेम भाव । आपणचि देव होय गुरु ॥१॥

ज्ञानमार्गात गुरुची महती विशेष भक्तिमार्गात तितकी नाही.

मेघवृष्टीने करावा उपदेश । परि गुरुने न करावा शिष्य ॥

या विचारसरणीचे तुकोबा. अद्‌वैत शास्त्राची तुकोबांना मुळीच आवड नसे.

अद्‌वैताची वाणी । नाही ऐकत मी कानी ॥१॥

तुकोबांचे सगुणावर प्रेम विशेष. यामुळे महाराज श्रीगुरूस शरण गेले नाहीत.

अद्‌वैतशास्त्र नावडे यासी । यास्तव शरण न जाय सद्‌गुरुशी ॥

पुढे वाट पडेल ऐसी । गुरु भक्तीशी अवरोध ॥

एक श्रेष्ठ आचरला जैसे । जन पाहोनि वर्तती तैसे ॥

तरी आपण धरूनि विप्रवेश । द्‌यावा तुकयासी अनुग्रह ॥

स्वप्नामध्ये तुकोबा इंद्रायणीचे स्नान करून देवळात जात असता त्यांनी रस्त्यात एक ब्राह्मण पाहिला व त्याला नमस्कार केला. ब्राह्मणाने संतुष्ट होऊन तुकोबांच्या मस्तकावर हात ठेवला व ‘रामकृष्ण हरि’ मंत्र दिला. आपली परंपरा सांगितली. माघ शुध्द दशमीस गुरूवारी ही घटना घडली.

सापडविले वाटे जात गंगास्नाना । मस्तकी तो जाणा ठेविला कर ॥२॥

राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खुण मालिकेची ॥४॥

बाबाजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरि ॥५॥

माघ शुध्द दशमी पाहोनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥६॥

तुकोबांनी स्वतः कोणापाशी मंत्राची याचना केली नाही. ते म्हणतात

नाही म्या वंचिला मत्र कोणापाशी । राहिलो जिवाशी धरोनिया ॥१॥

तुकोबा म्हणतात, मला कान फुंकण्याचे माहीत नाही व मजजवळ एकांतीचे ज्ञान नाही. पण जो देव कोणी डोळयांनी पाहिला नाही तो आम्ही दाखवू.

नेणो फुंको कान । नाही एकांतीचे ज्ञान ॥२॥

नाही देखिला तो डोळा । देव दाखवू ते कळा ॥३॥

प्रपंचामध्ये प्रभूचे अधिष्ठान असल्याखेरीज देव आपलासा केल्याखेरीज जीवांना सुख होणार नाही.

आपुला तो एक देव करोनी घ्यावा । तेणे विन जीवा सुख नोहे ॥२॥

तुम्ही माझा अनुभव पाहा

माझा पहा अनुभव । केला देव आपुला ॥१॥

बोलवले तेची द्यावे । उत्तर व्हावे ते काळी ॥२॥

हा अनुभव कशाचा म्हणाल तर-

हा गे माझा अनुभव । भक्तीभाव भाग्याचा ॥१॥

ऋणी केला नारायण । नोहे क्षण वेगळा ॥२॥

दैवाच्या लीलेने तुकोबांचा संसार रसातळाला नेला.देवाच्या लीलेने तुकोबांनी गौरीशंकर गाठल. दैव अनिर्बंध आहे त्याला कशाचेही बंधन नाही. देवाला बंधन आहे कशाच ? तर प्रेमाच.

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरी ॥१॥

ते प्रभू प्रेम स्मरणाने मिळते.

आम्ही घ्यावे तुझे नाम । तुम्ही आम्हा द्यावे प्रेम ॥

संताच्या गावीही प्रेमाचा सुकाळ असतो.

संताचिये गावी प्रेमाचा सुकाळ । नाही तळमळ दुःख लेश ॥१॥

संताच्या व्यापारात, उपदेशाच्या पेठेत प्रेमसुखाची देवाण- घेवाण चाललेली असते.

संतांचा व्यापार उपदेशाची पेठ । प्रेमसुखासाठी देती घेती ॥

येऱ्हवी हे भक्ती प्रेमसुख काय आहे, हे पंडितांना, ज्ञानियांना, मुक्तांना माहितही नाही आणि कळत नाही.

भक्ति प्रेम सुख नेणवे आणिका । पंडिता वाचका ज्ञानियासी ॥

या प्रेमाने समाज सांधला जाईल. प्रेमाच्या बंधनाने समाज बांधला जातो. प्रेमात सर्व भेद-आपपरभाव नाहीसे होतात. प्रेमानें जीवन सुखी समृध्द होतें. असें हें दिव्य दैवी प्रेम प्रभुस्मरणानें मिळेल. संताचे सान्निध्यात मिळेल.प्रेमात दुःखाचे रूपांतर सुखांत होईल. मनुष्य जीवन संपूर्ण पालटून जाईल.

उपदेश

उपदेश तो भलत्या हाती । झाला किती धरावा ॥

आता तरी पुढे हाची उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ॥

मोलाचे आयुष्य जाते हातोहात । विचारी पाहात लवलाही ॥

गात जातो तुका । हाचि उपदेश लोका ॥

तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावे ॥

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिये ॥

कुळी कन्या पुत्र होती जे सात्त्वि । तयाचा हरीख वाटे देवा ॥

गीता भागवत करीती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचे ॥

हित ते करावे देवाचे चिंतन । करोनियां मन शुध्द भावे ॥

तुका म्हणे फार । थोडा तरी उपकार ॥

संतसंग

संग न करावा दुर्जनांचा । करी संतांचा सायास ॥

पतन उध्दार संतांचा महिमा । त्यजावे अधमा संत सेवी ॥

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदासे विचारे वेच करी ॥

तुकोबांची शिकवण सुविचाराची, सदाचाराची आणि समतेची होती. प्राणिमात्राचे कल्याण होण्याकरिता ते कोणाची भीडभाड ठेवीत नसत.

नाही भिडभाड । तुका म्हणे सानाथोर ॥

तीक्ष्ण उत्तरे । हाती घेऊनि बाण फिरे ॥

तुका म्हणे लासू फासू देऊ डाव । सुखाचा उपाय पुढे आहे ॥

१०. तुकोबांचे धृपदे, टाळकरी, अनुयायी व शिष्य

तुकोबांचे मुख्य धृपदे टाळकरी १४ होते म्हणून महीपतीबाबाने त्याचा बऱ्याच ठिकाणी उल्लेख केलेला आहे. तुकोबांचे कीर्तनात हे धृपद धरीत.

१. महादजीपंत कुलकर्णी देहू गावचे कुलकर्णी - याचा उल्लेख बहिणाबाईचे गाथेतही आलेला आहे - देवालयाच्या बांधकामावर यांची देखरेख होती.

२. गंगाधरबाबा मवाळ - (तळेगाव), अभंग लेखक, हे तुकोबांचे सेवेस लागल्याचा कागदोपत्री उल्लेख आहे.

३. संताजी तेली जगनाडे - (चाकणकर) - तुकोबाचे अभंग लेखक.

४. तुकया बंधू कान्होबा.

५. मालजी गाडे, (येलवाडी) - तुकोबांचे जामात.

६. कोंडोपंत लोहकरे - लोहगाव.

७. गवार शेट वाणी - सुदुंबरे.

८. मल्हारपंत कुलकर्णी - चिखली.

९. आबाजीपंत लोहगावकर.

१०.रामेश्वरभट्ट बहुळकर.

११.कोंडपाटील, लोहगाव.

१२.नावजी माळी - लोहगाव.

१३.शिवबा कासार - लोहगाव.

१४.सोनबा ठाकूर - कीर्तनांत मृदंग वाजवीत असत.

तुकोबांची शिष्या बहिणाबाई यांना तुकोबांचा स्वप्नात उपदेश झाला. त्या देहूस दर्शनाकरिता आल्या, कवित्वस्फूर्ती बाईंना देहूस झाली. बहिणाबाईंनी तुकोबाची कथा कीर्तने प्रत्यक्षांत ऐकली. मंबाजीकडून यांना बराच त्रास पोहोचला. बहिणाबाईंची योग्यता अधिकार तुकोबांचे खालोखाल होता. बहिणाबाईंची अभंगाची गाथा एकदा तरी वाचून पाहावीच.

## ११. प्रयाण

कार्तिक वद्य एकादशीला आळंदीस ज्ञानदेव महाराजांचे पुढे तुकोबाचे कीर्तन चालले होते. यात्रा अपार होती. कीर्तनाचा अभंग होता.

भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मी भोग ब्रह्म तनू ॥१॥

शरीर कोठे ब्रह्म होईल काय? कोणी केले आहे काय? असे आत्मानात्म विचारकर्ते, ज्ञानी जे श्रोते होते त्यांनी तुकोबाला विचारले. तुकोबा म्हणाले, ‘मी करून दाखवीन.’

घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती । मुक्ता आत्मस्थिती सांडवीन ॥

ब्रह्मीभूत काया होतसे कीर्तनी । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥

लोहगावला तुकोबांचे कीर्तन चालू असताना परचक्र येऊन लोहगाव लुटले. तुकोबांनी देवाचा धावा केला.

न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते ॥१॥

देव ताबडतोब पावले नाहीत. तुकोबांनी देवाला सांगितले.

तुज भक्ताची आण देवा । जरी तुका येथे ठेवा ॥१॥

तिसरी गोष्ट - ज्ञानदेव महाराजांनी तुकोबांची अपार सेवा केली त्या ऋणातून उत्तीर्ण होण्याकरिता ज्ञानदेव महाराज जिजाईचे पोटी आले. तुकोबाने ओळखले की, देव सेवा करू पाहातात हे बरें नव्हे आपणच येऊन जावे सर्वांची विचारपूस केली, सर्वांना सांगितले, 'आम्ही वैकुंठाला जात आहोत. तुम्ही माझ्याबरोबर वैकुंठाला चला' कोणी तयार झाले नाही. महाराज सर्वासमवेत इंद्रायणीच्या काठी आले तेथे नांदुरुखीचे वृक्षाखाली कीर्तनास आरंभ केला. १४ टाळकऱ्यांनी क्षेमालिंगन दिले तुकोबांचे चिरंजीव महादेव विठोबा पुढे आले त्यांनी तुकोबांना नमस्कार केला. तुकोबांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. जिजाबाईकडे कौतुकाने पाहिले. सगळयांना सांगितले-

सकळही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावे तुम्ही ॥

वाढवेळ झाला उभा पांडुरंगा । वैकुंठा श्रीरंग बोलावतो ॥

आम्ही जातो तुम्ही कृपा असो द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ॥

अंतःकाळी विठो आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥२॥

भगवत्कथा करीत असता तुकोबा अदृश्य झाले. याचा उल्लेख राज्याभिषेक शके ३० च्या सनदेत आहे. श्री तुकोबा गोसावी सत्पुरुष हे मौजे देहू ता. हवेली , जि. पुणे येथे भागवत कथा करीत असता अदृश्य झाले हे गोष्ट विख्यात आहे.रा.तुकोबा गोसावी हे बहुत थोर सत्पुरुष होते. (इ.स.१७०४ च्या देहूगावची सनद. सनद रामचंद्र नीळकंठ अमात्यांचे हातची आहे.रामचंद्र पंत छत्रपती शिवाजी राजे यांच्या अष्टप्रधान मंडळातील अमात्य या पदावरील एक प्रधान होते.)

शके पंधराशे एकाहत्तरी । विरोधी नाम संवत्सरी ।

फाल्गुन वद्य द्वितीया सोमवारी । प्रथम प्रहरि प्रयाण केले ॥२॥

“तुकोबा गोसावी वैकुंठास गेले. स्वदेहीनिशी गेले. ” बाळोजी तेली जगनाडे वही, पृ. २१६, संताजींच्या वहीची नक्कल. संताजी प्रयाण समयी प्रत्यक्ष हजर होते.

तुकोबांच्या गुप्त होण्याने सर्वत्र मंडळी शोकसागरात बुडाली. तुकोबांची मुले, बंधू, अनुयायी तेथेच बसून राहिले. पंचमीला तुकोबांचे टाळ, पत्र, कथा आकाशमार्गे आली. रामेश्वरशास्त्रींनी निर्णय दिला. तुकोबा सदेह वैकुंठाला गेले. सर्वानी स्नाने उरकली. तुकोबांची मुले, बंधू कान्होबा देवाशी भांडले. ‘देवा तू माझ्या बंधूला आणून दे. वैकुंठाला नेऊ नकोस.’ देवाने कान्होबाचे समाधान केले.

## १२. तुकोबांच्या पश्चात्

तुकोबा देहासह वैकुंठास गेल्याचे वर्तमान ऐकून शिवाजीराजे विस्मय पावले. तेव्हा त्यांनी देहू येथील जानोजी भोसले याच्याजवळ तुकोबांच्या कुटुंबियांची विचारपूस केली व तुकोबांचे वडील पुत्र महादेवबुवा यांना भेटी घेऊन येण्याविषयीची आज्ञा केली. जानोजी भोसले महादेव बाबास घेऊन शिवाजी राजे यांचेकडे गेले. शिवाजी राजे यांनी महादेवबाबास वर्षासन "एक खंडी धान्य व लुगडयाकरितां एक होनाची सनद करून दिली." संभाजी राजे यांनी हे वर्षासन पुढे चालू ठेवले.

तुकोबांचे वैकुंठ गमनानंतर नारायण महाराजांचा जन्म झाला. नारायण महाराज ज्ञानदेव महाराजांचे अवतार असल्यामुळे दोघे वडील बंधू महादेवबुवा विठोबा नारायणरावांच्या आज्ञेत असत. मातोश्री असेपर्यंत एकत्र होते. मातोश्रीचा काल जाहल्यावर विठ्ठलबुवा, नारायणबुवा, जिजाबाईंच्या अस्थी घेऊन महायात्रेला गेले. महादेवबुवा श्री विठ्ठलदेवाची पूजाअर्चा नित्य नियम सांभाळून होते. महादेवबाबांनी तुकोबांचे अभंग लिहिले आहेत. नारायणबाबा प्रथम सरंजामी - सरदारी थाटाने राहू लागले. त्यांचे भेटीस संताजी पवार आले. त्यांनीं नारायणबाबास धिःकारले. बाबांनी घर ब्राह्मणाकडून लुटविले. तपश्चर्या केली. अरण्यवास पत्करला. विठोबाचें भव्य देऊळ बांधलें.

तुकाराम तो आधीच गेले होते वैकुंठा ।बहु दिवसांनी मग वैराग्य झालें नीळकंठा ॥१॥

तुकयाचा नंदन मागे नारायणबाबा ।दर्शन त्याचे घेऊनि म्हणती सुसंग लाभावा ॥२॥

निळोबा गोसावी पिंपळनेरकर बाबांच्या दर्शनास आले. बाबांनी त्यांना साद्यंत तुकोबांचे चरित्र सांगितलें निळोबांना घेऊन ते तीर्थयात्रेला गेले. निळोबांनी तुकोबांचे भेटीकरिता ४२ दिवसाचे निर्वाण मांडले. तुकोबा भेटले.

येऊनियां कृपावंते । तुकया स्वामी सदगुरूनाथें ॥१॥

हात ठेविला मस्तकीं । देऊनी प्रसाद केले सुखी ॥२॥

निळोबांना कवित्वाची स्फूर्ती झाली. त्यांनीही अनेक अभंग केलेत. नारायणबाबा थोर तपस्वी हरिभक्त म्हणून सनदा पत्रात उल्लेख आढळतो. बाबांच्या दर्शनास तडीतापडी संन्याशी, यात्री येऊ लागले. बीजेचा महोत्सव होऊं लागला. त्यांना बाबांना अन्नदान करावे लागे. त्याकरिता इ. स. १६९१ मध्ये छत्रपति राजाराम महाराजांनी नारायणबाबांना येलवाडी गांव इनाम दिला. पुढे देहू किन्हई ही गांवे देवाच्या महोत्सवाकरिता पूजा-अर्चा, अन्नछत्राकरितां बाबांना छत्रपती दुसरे शिवाजी आणि शाहू महाराज यांचेकडून मिळाली. शाहू महाराज आणि राणी सरवारबाई बाबांना गुरूचे ठिकाणी मानीत असत. नारायण महाराजांनी तुकोबांची पालखी सोहळा आषाढी वारीस सुरू केला. बाबांनीं देवस्थान नांवारूपास आणले. सांप्रदाय वाढविला. औरंगजेबाचा तळ महाराष्ट्रात पडला असता पंढरपूरच्या आणि शिंगणापूरच्या यात्रेकरूना होणारा उपद्रव थांबविला. बाबा शके १६४५ श्रावण शुध्द चतुर्थीस वैकुंठवासी झाले. त्यांच्या अस्थी घेऊन महादेवबाबांचे चिरंजीव आबाजी बाबा काशीयात्रेस गेले.

गंगोदकाची कावड घेऊन आबाजीबाबा देहूस आले. दरम्यान विठ्ठलबाबांचे चिरंजीव उध्दवबाबा हे या समयी शाहू तुकोबांच्याजवळ होते. ते देहूस आले. त्यांनी देवस्थान संस्थानचा कारभार हाती घेतला. आबाजीबाबांचे ताब्यात देवस्थाने ते देईनात. आबाजी बाबा हेही वैराग्यसंपन्न तपस्वी हरिभक्ती रत होते. आबाजीबाबा नंतर त्यांचे चिरंजीव महादेवबाबा हेहि देवस्थान संस्थानाकरितां भांडले. भांडण वडीलपणाचं, देवाकरिता होतं, संस्थानाकरिता नव्हतं. सरकारने विशेष लक्ष घातले नाही. तेव्हा महादेवबाबा देहू सोडून देवाकरिता संप्रदायाकरिता पंढरपूरला येऊन राहिले. भक्त देवाकडे आले. यांनी तुकोबांच्या अभंगांचे संकलन करून गाथा तयार केली, देहूकरांच्या फडाची परंपरा चालविली. त्यांचे चिरंजीव वासुदेव महाराज देहूकर यांनी पंढरीच्या ठिकाणी वारकरी सांप्रदायाचे कार्य भरीव असे केले व त्यांचेंच वेळी अनेक लहानमोठे फड नांवारूपास आले व वारकरी पंथाची परंपरा अधिकाधिक वाढू लागली. कर्नाटकापर्यंत संप्रदाय वाढविला. त्यांचे चिरंजीव वासुदेवबाबा यांनी फड नावारूपास आणला तुकोबाचे पणतू गोपाळबुवा हेहि साक्षात्कारी होते.

तुकोबांचें चरित्र लिहिले, हे त्यांचे महान कार्य होय. देहू संस्थानने घराण्याची आषाढी कार्तिकीची पंढरपूरच्या वारीचा पालखी सोहळा आजतागायत अखंड चालू ठेवला. देहूकर मंडळीनी गावोगावी कथा, कीर्तने करून वारकरी संप्रदाय वाढविला. संप्रदायाची व कुलदेवतेची अमोल सेवा केली. आजही सर्वजण,

अमृताची फळे अमृताचे वेली । तेची पुढे चाली बीजाचिहि ॥१॥

हे तुकोबांचे वचन सार्थ करून दाखवीत आहेत.

श्रीधर देहूकर

श्रीतुकाराम जन्मस्थान,

श्रीक्षेत्र देहू ४१२१०९.

# <u>तुकाराम महाराज आणि महात्मा गांधी</u>

- सचिन परब

चले जाव, करेंगे या मरेंगे, हे राम... अशा साधासुध्या शब्दांना वेदमंत्रांहून मोठं प्रामाण्य भारतवर्षात मिळालं. कारण त्यामागे मोहनदास करमचंद गांधी या साध्यासुध्या दिसणाऱ्या महापुरुषाच्या संतपणाचं सामर्थ्य होतं. हे संतपण आलं होतं ते खऱ्याच्या प्रयोगातून आणि संस्कारातून. देशोदेशींचे, पिढ्यानपिढ्यांचे संस्कार रिचवून असं सामर्थ्य उभं राहतं. त्यात एक संस्कार मराठी माती घडवणाऱ्या तुकाराम महाराजांचाही होता.

आपल्या मराठी मनांवर कळत नकळत असा संस्कार होत असतो. पण रिचवण्या आणि पचवण्याआधीच तो संस्कार कापरासारखा उडून जातो. मात्र गांधीजींनी तुकोबारायाचे संस्कार कसे पचवले होते, ते समजून घेण्याचा सोपा मार्ग आहे. तुकोबांच्या गांधीजींनी केलेल्या सोळा अभंगांचे भाषांतर वाचण्याचा. गांधीजींच्या भाषांतरात साहेबाचा भाषेचा, त्या भाषेच्या संपूर्णपणे वेगळ्या पार्श्वभूमीचा कोणताही अडथळा न होता तुकोबांचे विचार जसेच्या तसे वाचकांपर्यंत पोहचतात. लेखक आणि भाषांतरकारातलं असं अद्वैत क्वचितच अनुभवायला मिळतं. दोन सच्च्या वैष्णवांमधलं हे अद्वैत.

विशेष म्हणजे गांधीजींनी मराठी मातीत बसून हे लिहिलंय. हे भाषांतर त्यांनी येरवडा तुरुंगात म्हणजे त्यांच्या शब्दांत येरवडा आश्रमात बंदी असताना केलंय. त्यांच्या सगळ्या सोळा अभंगाचं भाषांतर खाली देत आहोत.

१

आज त्यातला पहिला अभंग गाधीजींचा सर्वाधिक आवडता अभंग. भाषांतराची तारीख आहे, १६ ऑक्टोबर. आपल्या मुलाला लिहिलेल्या पत्रांत त्यांनी या अभंगाचा उल्लेख केला आहे. त्यांना या अभंगांमध्ये आपली तीन माकडे दिसत असत...

पापांची वासना नको दांवू डोळा । त्याहुनि आंधळा बराच मी ॥

निंदेचे श्रवण नको माझे कानी । बधिर करोनि ठेवी देवा ॥

अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ॥

नको मज कधी परस्त्रिसंगती । जनांतुन मातीं उठता भली ॥

तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा । तू एक गोपाळा आवडसी ॥

O God, let me not be witness to desire for sin, better make me blind;

Let me not hear ill of anyone, better make me deaf;

Let not a sinful word escape my lips, better make me dumb;

Let me not lust after another's wife, better that I disappear from this earth.

Tuka says: I am tired of everything worldly, Thee alone I like, O Gopal.

संत नामदेवांनी भागवतधर्माची पताका अटकेपार लावली.  संपूर्ण भारतभर त्यांनी पांडुरंगाच्या भक्तीची मोहर उमटवली. गुजरातही त्याला अपवाद नव्हता. गुजराततेतल्या वैष्णव संतावंर नामदेवांचा प्रभाव स्पष्ट आहे. सर्वात प्रसिद्ध गुजराती संतकवी नरसी मेहतांच्या काव्यात तर नामदेवांचा उल्लेख अनेकदा येतो. ज्याने नामदेवासाठी दूधभात खाल्ला. ज्याने नामदेवासाठी मंदिर फिरवले असे भगंवताचे वर्णन त्यांनी केले आहे.

नरसी मेहतांच्या भक्तिकाव्याने सबंध गुजरातेवर प्रभाव टाकलाय. धामिर्क वैष्णव कुटुंबात जन्मलेल्या गांधीजींवरही त्याचा प्रभाव होता. विशेषत: नरसींच्या 'वैष्णव जन तो...' ने तर त्यांच्यावर लहानपणापासून गारूड केलं होतं. गांधीजींचा ध्यास नरसींनी वर्णन केलेला खरा वैष्णव बनण्याचाच होता.

त्यामुळे गांधीजींनी तुकाराम गाथा हाती घेतली असेल तेव्हा त्यांना 'जे का रंजले गांजले' हा अभंग सर्वात आधी आपला वाटला असावा. गांधीजींनी आपल्या अनुवादातही सर्वात वरचे स्थान याच अभंगाला दिले आहे.

शाळेतल्या निबंधपासून प्रमुख पाहुण्याच्या वापरून गुळगुळीत झाला असला तरी पुन्हा एकदा मूळातून वाचायला हवा. 'आपल्या नोकरचाकरांवर मूलासारख प्रेम करणारा तोच खरा साधू' अशी रोकडी व्याख्या त्यात आहे. आनंदाची गोष्ट ही इथे ही व्याख्या आणि त्याचा अनुवाद हे शब्दांचे बुडबुडे नाहीत. दोन्ही महात्म्यांनी हे शब्द आपल्या जीवनात उतरवून दाखविलेत.

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपले ।। १।।

तोची साधू ओळखावा ।। देव तेथे चि जाणावा ।।धृ.।।

मृदू सबाह नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।। २।।

ज्यासि अंपगिता नाही । त्यासि घरी जो हृदयी ।। ३।।

दया करणे जे पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।। ४।।

तुका म्हणे सांगू किती । तो चि भगवंताची मूर्ती ।। ५।।

Know him to be a true man who takes to his bosom those who are in distress. Know that God resides in the heart of such a one. His heart is saturated with gentleness through and through. He receives as his only those who are forsaken. He bestows on his man servants and maid servants the same affection he shows to his children. Tukaram says: What need is there to describe him further? He is the very incarnation of divinity.

गांधीजी आणि आंबेडकर या दोन्ही महापुरुषांचा प्रवास एकाच दिशेने पण समांतर झाला. आंबेडकरवाद्यांनी गांधीजींना समजून घेतले नाही आणि गांधीवाद्यांनी आंबेडकरांना. दोघांचा वारसा सांगणाऱ्या पुढाऱ्यांनी या दोघांना एकत्र आणलं ते फक्त राजकीय फायद्यासाठी. अन्यथा या दोन्ही विचारधारा जवळही येऊ नयेत म्हणून डोळ्यात तेल घालून प्रयत्न केले.

असे कितीही प्रयत्न केले असले, तरी अनेक बाबतीत गांधी आणि आंबेडकर एकमेकांची गळाभेट अनेकदा झालीय. तुकाराम त्यातली एक गोष्ट. स्वतःला 'यातिहीन' म्हणणारा आणि विद्रोहाची पताका उंचावणारा तुकाराम आंबेडकरांना आपलासा वाटलाच. पण तितकाच 'विष्णुदास' असणारा आणि पदोपदी संतसंग मागणारा तुकाराम गांधीजींना आवडणे तितकेच स्वाभाविक होते. आपण दोघांच्याही पूर्वपरंपरेत शोभून दिसणारा तुकाराम समजून घेऊया. एकदा ते झाले की गांधी आणि आंबेडकर दोघेही आरशासारखे समोर दिसू लागतील.

महारासि सिवे। कोपे ब्राम्हण तो नव्हे।।

तया प्रायश्चित्त कांही। देहत्याग करितां नाही।।

नातळे चांडाळ। त्याचा अंतरी विटाळ।।

ज्याचा संग चित्ती। तुका म्हणे तो त्या याती।।

He who becomes enraged at the touch of a Mahar is no Brahmin.

There is no penance for him even by giving his life.

There is the taint of untouchability in him who will not touch a Chandal.

Tuka says: A man becomes what he is continually thinking of.

४

नंतरच्या काळात सर्वोदयीचे  आश्रमातल्या प्रार्थना, भजन हे सारे माणसं घडवण्याचेच प्रयोग होते. स्वत: मोहनदासाचा महात्मा बनण्याचा प्रवासही अशाच प्रयोगांचा होता. प्रयोग, सत्याचे प्रयोग. साधन स्वत:, साधक स्वत: आणि साध्यही स्वत:चंच. तुकारामही असेच आतआत डोकावत सत्यापर्यंत पोहोचलेले. भगवंताच्या भेटीसाठी स्वत:च धावायचं, स्वत:च पडायचं, स्वत:च स्वत:ला हुरूप द्यायचा आणि स्वत:च स्वत:ला घडवायचं. तुकारामांचा कोणी गुरु नाही. गांधीजींचही तसंच. त्यांनी अनेकांचा गुरु म्हणून उल्लेख केला, पण फुलटाइम गुरु त्यांनाही नव्हता.

तसं पाहिलं, तर सद्विचार हेच या दोघांचे मार्गदर्शक होते. हे विचार जीवनात उतरवण्यासाठी दोघांनीही आटापिटा केला. विचार जीवनात उतरविणं हेच ज्ञान असतं. सॉक्रेटिस याविषयी ठाम सांगतो , virtue is knowledge असे विविध सद्विचार गांधीजींनी आश्रम भजनमाला मध्ये एकत्र आणले आहेत. आजचा अभंग संतपणाबद्दलचा.

नाहीं संतपण मिळतें हें हाटीं। हिंडतां कपाटीं रानींवनीं ।।

नये मोल देतां राशी । नाहीं तें आकाशीं पातळीं तें।।

तुका म्हणे मिळे जिवाचियें साठीं । नाहीं तरीं गोष्टी बोलों नये ।।

Saintliness is not to be purchased in shops nor is it to be had for wandering nor in cupboards nor in deserts nor in forests. It is not obtainable for a heap of riches. It is not in the heavens above nor in the entrails of the earth below. Tuka says: It is a life’s bargain and if you will not give your life to possess it better be silent. 24-10-1930

५

पावन देश कोणता, तुकाराम महाराज म्हणतात, जेथे हरिचे दास जन्म घेतात तो. त्या अर्थाने महाराष्ट्र आणि सौराष्ट्र हे दोन्ही प्रदेश अती पावन. संतांची मांदियाळी दोन्हीकडे बहरली. गांधीजी सौराष्ट्रातलेच. दुर्दैव हे की सौराष्ट्रातली जातीची उतरंड अजूनही पूर्णपणे ढळलेली नाही. तुकारामांनंतर शंभर वर्षांतच देहू ते पंढरीच्या वाटेत असणाऱ्या पुण्यात अस्पृश्यांना थुंकण्यासाठी गळ्यात गाडगी बांधावी लागली.

पण म्हणून भागवत धर्माने केलेल्या क्रांतीचं महत्त्व कमी होत नाही. महाराष्ट्रात अशी एकही जात नव्हती ज्यात त्याकाळी एकही संत झाला नाही. तुकोबांनी आपल्या अभंगात या संतांची जातवार यादीच दिली आहे. हा एक सामाजिक दस्तावेजच आहे. ज्ञानदेवे रचिला पाया... तुका झालासे कळस या बहिणाबाईंच्या अभंगा इतकाच मोलाचा.भारतीय इतिहासातील एका मोठ्या सामाजिक क्रांतीचा हा सज्जड पुरावा आहे. गांधीजींनी अनुवादासाठी हा अभंग निवडला नसता तरच नवल. त्यांनी उभ्या केलेल्या स्वातंत्र्य संगरातही अशीच समाजाच्या प्रत्येक घटकांत त्यांना जागृती अपेक्षित होती. काही प्रमाणात ती सफलही झाली. दोन्ही क्रांत्या अस्सल भारतीय मातीतल्या होत्या. दोन्ही तत्त्वज्ञानांचं अधिष्ठान भक्ती होतं. परिभाषा ही आध्यात्मिक होती, भारतीयांच्या मनात रूजलेली. त्यामुळेच वेदांचा हवाला देत जाती-धर्म नाकारण्यात विरोधाभास उरला नाही...

पवित्र तें कुळ पावन तो देश। जेथें हरिचे दास घेती जन्म।।

कर्मधर्म त्याचे जाला नारायण । त्याचेनी पावन तिन्ही लोक।।

वर्णअभिमानें कोण जाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं।।

अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें । तयाचीं पुराणें भाट जालीं।।

वैश्य तुळाधार गोरा कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ।।

कबीर मोमीन लतिब मुसलमान। शेणा न्हवी जाण विष्णूदास।।

काणोपात्र खोदु पिंजारी तो दादु। भजनीं अभेदू हरिचे पायीं।।

चोखामेळा बंका जातीचा माहार । त्यासी सवेर्श्वर ऐक्य करी ।।

नामयाची जनी कोण तिच भाव । जेवी पंढरीराव तियेसवें।।

मैराळ जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों।।

यातायातीधर्म नाहीं विष्णूदासा । निर्णय हा ऐसा हा वेदशास्त्रीं।।

तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ। तारिले पतित नेणों किती।।

Blessed is that family and that country where servants of God take birth. God becomes their work and their religion. The three worlds become holy through them. Tell me who have become purified through pride of birth? The Puranas have testified like bards without reserve that those called untouchables have attained salvation through devotion to God. Tuladhar, the Vaishya, Gora, the potter, Rohidas, a tanner, Kabir, a Momin, Latif, a Muslim, Sena, a barber, and Vishnudas, Kanhopatra, Dadu, a carder, all become one at the feet of God in the company of hymn singers. Chokhamela and Banka, both Mahars by birth, became one with God. Oh, how great was the devotion of Jani the servant girl of Namdev! Pandharinath (God) dined with her. Meral Janak's family no one knows, yet who can do justice to his greatness? For the servant of God there is no caste, no varna, so say the Vedic sages. Tuka says: I cannot count the degraded.

नामजपाला भारतीय अध्यात्म आणि तत्त्वज्ञानात मोठी जागा मिळाली आहे. भगवत्भक्तीच्या या पहिल्या पायरीबद्दल संतसाहित्यात सर्वाधिक लिहिले गेलंयं. विशेष म्हणजे सामाजिक दृष्टी असलेल्या संतांनी आणि वेदांताचा पुरस्कार करणाऱ्या नव्याजुन्या तत्त्ववेत्त्यांनीही नामजपाला प्राधान्य दिले आहे.

तुकाराम महाराजांनी अनेक अभंगांमध्ये याच नामजपाचं महात्म्य गायले आहे. आजचा अभंगही त्यातलाच एक. हा अभंग सांगतो, विठोबाला शरण जाणं आणि त्याच्या नामाचा जप करणं हेच सगळ्या ज्ञानाचे सार आहे. मात्र लोक यापैकी पहिला भाग सोडून केवळ दुसरा दर्शनी सोपा वाटणारा नामजपाचाच मार्ग उचलतात. त्यामुळे देवाचिये द्वारी क्षणभरच काय तासंतास उभं राहूनही अधीर्मुर्धी मुक्तीही मिळत नाही.

गांधीजींनी अनेकदा रामनामाचा महिमा सांगितला आहे. त्यांच्या या श्रद्धेविषयीचे काही प्रसंगही आहेत. एवढंच नाही तर शेवटचा श्वास घेतानाही त्यांच्या मुखी रामनामच होतं.

वेद अनंत बोलला । अर्थ इतकाचि शोधिला ।।

विठोबासी शरण जावे । निजनिष्ठ नाम गावें ।।

सकळशास्त्रांचा विचार ।अंति इतकाचि निर्धार ।।

अठरापुराणी सिद्धांत । तुका म्हणे हा चि हेत ।।

The essence of the endless Vedas is this:

Seek the shelter of God and repeat His name with all thy heart.

The result of the cogitations of all the Shastras is also the same;

Tuka says: The burden of the eighteen Puranas is also identical.

'कसं जगायचं, कसं वागायचं' या विषयावरच सर्वाधिक आणि सवोत्तम चिंतन भारतात झालं. दुदैव हेच आयतेपणाला मिळालेल्या फाजील प्रतिष्ठेमुळे या सगळ्या चिंतनाचे वाटोळे झाले. कर्मसिद्धांत, कर्मकांड यांना तर अकर्मण्यतेसाठी पूरेपूर वापरून घेण्यात आलं.

'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' चंही तेच झालं. वास्तविक हे समर्पण आणि भगवतनिष्ठेच्या परमावधीचे तत्त्वज्ञान आहे. मी भगवंताचे काम करीन, तर माझा चरितार्थ तोच चालवेल असा विश्वास सांगणारं हे तत्त्वज्ञान. हे जीवनात उतरवणही महाकर्मकठीण.

भारतीय तत्त्वज्ञानावरची राख झटकताना संतांनी प्रामुख्याने कर्मयोगाचाच अंगार फुलवला. कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा यांनी शिकवला तो आत्मगौरवातून उभा राहणारा कर्मवादच. गेल्या शतकातही विवेकानंद, टिळक, अरविंद, गांधीजी, विनोबा, गाडगेबाबा यांनीही हाच कर्मयोग वेगवेगळ्या परिभाषेत मांडला.

तुकारामांनी या अभंगात आपल्या नेहमीच्य पद्धतीने रोकडा कर्मवाद मांडला आहे. योग्य अयोग्य हे असं आहे. आता तुम्हीच काय करायचं ते ठरवा असं सांगणारा हा तुकोबाचा कर्मवाद... आणि गांधीबाबाचाही.

पुण्य पर उपकार पाप ती परपीडा । आणिक नाही जोडा दुजा यासी ।।

सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म । आणिक हे वर्म नाही दुजे ।।

गति ते चि मुखी नामाचे स्मरण । अधोगती जाण विन्मुखते ।।

संताचा संग तो चि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ।।

तुका म्हणे उघडे आहे हित घात । जयाचे उचित करा तैसे ।।

Merit consists in doing good to others, sin in doing harm to others.

There is no other pair comparable to this.

Truth is the only religion (or freedom); untruth is bondage,

there is no secret like this.God’s name on one’s lips is itself salvation,

disregard (of the name)know to be perdition.

Companionship of the good is the only heaven, studious indifference is hell.

Tuka says: It is thus clear what is good and what is injurious, let people choose what they will.

८

गांधीजींना मराठी येत होतं का, बहुधा नव्हतंच. महाराष्ट्रात त्यांचं अनेक वर्षांचं वास्तव्य, मराठीचं गुजराती-हिंदी-संस्कृतशी असलेलं साम्य यामुळे त्यांना निदान मराठी कळत असावं, असं  मानता येईल. असं असतानाही त्यांनी तुकारामांच्या गाथेमधल्या शेकडो अभंगांमधून अवघे सोळा अभंगांची केलेली निवड निव्वळ अप्रतिम आहे.

तुकारामांच्या अभंगांचे अनुवाद आश्रम भजनावलीसाठी आहेत.  त्यातून गांधीजींचं सगळं तत्त्वज्ञान आणि संस्कार स्पष्ट होतात. गांधीजींनी आपले वाटतील ते ते अभंग यात निवडले आहेत. त्यामुळे तुकोबांच्या अभंगांची निवड एवढी उत्तम झाली असावी.

अर्थात या अभंगांचे अर्थ समजून घेण्यासाठी त्यांना अनेकांची मदत झाली असेलच. महादेवभाई देसाई, स्वामी आनंद, काका कालेलकर, विनोबा, किशोरीलाल मश्रूवाला या गांधीजींच्या सगळ्या सावल्यांना मात्र मराठी उत्तम येत होतं. त्यापैकी काहीजण अनुवादाच्या प्रसंगी येरवड्यालाही सोबत होते. पण त्यांनी शब्दांचे अर्थ सांगितले असतील, या हृदयीचे त्या हृदयीपर्यंत पोहोचलेला भाव ट्रान्स्लेट होण्यासाठी हवं असतं अद्वैत. ते या दोन महात्म्यांमध्ये निश्चित होतं.

लगेच आठवणारे तुकारामांचे बहुतेक अभंग या सोळा अभंगांमध्ये सापडतात ते उगाच नव्हे! उदाहरणार्थ पुढे गाणं म्हणून गाजलेला, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती हा अभंग.

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हात धरुनिया ।।

चालो वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवे माझा ।।

बोलो जाता बरळ करिसी ते नीट । नेली लाज धीट केलो देवा ।।

अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ।।

तुका म्हणे आता खेळतो कौतुके ।जाले तुझे सुख अंतर्बाही ।।

Wherever I go, Thou art my companion.

Having taken me by the hand Thou movest me.

I go alone depending solely on Thee.

Thou bearest too my burdens.

If I am likely to say anything foolish,

Thou makest it right.

Thou hast removed my bashfulness and madest me self-confident,

O Lord. All the people have become my guards, relatives and bosom friends.

Tuka says: I now conduct myself without any care.

I have attained divine peace within and without.

तुकारामांचा गांधीजींच्या एकूणच व्यक्तिमत्त्वावर प्रभाव होता. त्यांना प्रत्यक्ष पाहिलेल्यांनीही तो प्रभाव नोंदवलाही आहे. 'लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका' नावाचं सदाशिव विनायक बापट यांचं पुस्तक आहे. त्यात १९१७ सालच्या आठवणींमध्ये त्यांनी लिहिलं आहे, 'आश्रमाची सर्व व्यवस्था पाहून आम्ही परत येत असता निम्या वाटेवर महात्माजी आश्रमाकडे चालले आम्हास भेटले. भगवद्भक्त श्री तुकोबाप्रमाणे ती शांत वैराग्यमूर्ती डोक्यास गुजराथी पांढरे पागोटे घालून अंगात खादीचा अंगरखा घातलेली अनवाणी येत असलेली आम्ही दुरून पाहिली'.

लोकमान्यांच्या प्रभावात असलेल्या बापटांचे हे निरीक्षण आहे, हे विशेष. वास्तविक टिळकवादी बड्या नेत्यांनी गांधीजींना कधीच आपले मानले नाही. उलट राष्ट्रीय लढ्याचे केंद्र पुण्यातून हलले याविषयी कायम हळहळ व्यक्त केली. त्यात ब्राह्मण बहुजन असा संघर्षाचाही एक पदर होता. त्यातून मग गांधीजींवर विखारी टीका झाली.

असं असलं तरी गांधीजींना टिळकांविषयी प्रचंड आदर होता. आपल्या महाराष्ट्रयात्रेचे वर्णन करताना त्यांनी लिहिलं आहे, जिथे लोकमान्य टिळक महाराजांचा जन्म झाला. आधुनिक युगाचे नायक असलेले शिवाजी महाराजांची जी भूमी आहे. जिथे तुकारामांनी आपले कार्य केले. ती महाराष्ट्राची भूमी माझ्यासाठी तीर्थक्षेत्राइतकीच पवित्र आहे... महाराष्ट्राने एकदा ठरवलं की तो कोणतीही अशक्य गोष्ट वास्तवात उतरवू शकतो, असं मी नेहमीच म्हणतो.

वादाचे, कार्यपद्धतीतले फरक असले तरी टिळक आणि गांधी या दोन्ही महापुरुषांमधले अद्वैतही आगळे होते. त्यामुळेच तर टिळकांच्या नेतृत्त्वाची धुरा गांधीजींनी यशस्वीपणे खांद्यावर घेतली. दोघांच्याही तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान श्रीमद्भगवद्गीताच होते. गांधीजींवर तुकारामांचा प्रभाव होता. टिळकांवरही तो होताच होता. गीतारहस्याची सुरुवात तुकोबांच्याच अभंगाने झाली आहे. गीतारहस्यात तुकोबांचे एकूण २३ अभंग आहेत. टिळक आणि गांधी उपकारे देह कष्टवणाऱ्या या दोन विभूती होत्या.

काय वाणू आता न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।

थोरीव सांडिली आपुली परिसे । नेणे सिवों कैसे लोखंडाशी ।

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारें।

भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देही ।

तुका म्हणे सुख पराविया सुखें। अमृत हे मुखे स्रवतसे ।

How now shall I describe (the praises of the good);

my speech is not enough (for the purpose).

I therefore put my head at their feet.

The magnet leaves its greatness and does not know that it may not touch iron.

Even so good men's powers are for the benefit of the world.

They afflict the body for the service of others.

Mercy towards all is the stock-in-trade of the good.

They have no attachment for their own bodies.

Tuka says: Others' happiness is their happiness; nectar drops from their lips.

आपलं, म्हणजे भारतीय अध्यात्म म्हटलं की जगण्यापासून पळून गेलेला जंगलामध्ये ध्यान लावून बसलेला साधुबुवा आठवतो. मोक्ष हेच आपल्या अध्यात्माचे अंतिम ध्येय, मग समष्टीचा, समाजाचा त्याच्याशी काय संबंध, असं वाटतं खरं. पण जगन्मिथ्या मानणाऱ्या शंकराचार्यांनी भारतभर चारदा परिक्रमा का केली? भवसागर पार करण्याविषयी बोलणाऱ्या संतांनी सर्वसामान्यांची काळजी का वाहिली?

मला मुक्ती नको, असं रोकडेपणे सांगणारे तुकोबा या प्रश्नांची अगदी खणखणीत उत्तर देतात. आजच्या अभंगात हे उत्तर अगदी सविस्तर आहे. नाहीतर आधीच्या वाक्यात 'बैसला गोविंद जडोनिया चित्ती' म्हणणारा तुकाराम पुढच्याच वाक्यात 'बळबुद्धी त्याची उपकारासाठी' कसे सांगतात? चित्ती गोविंद जडवण्यासाठी बळबुद्धी उपकारासाठी वापरण्याचं हे अध्यात्म आहे. हे आर्मचेअर तत्त्वज्ञान नाही, जीवनाचं, जगण्याचं आणि मातीशी जोडलेलं तत्त्वज्ञान आहे.

भवसागरातून पार व्हायचं आहे, हे खरं. पण त्यासाठी संसार सोडून संन्यास नको. उलट सुखी संसारच हवा. आपले देव, ऋषी, आचार्य, संत सगळे बहुतांशी संसार करणारे आहेत. सगळ्या महापुरुषांनी लोकांमध्ये लोकांसारखं राहुन लोकांमधला राम जागवून रामाला आपल्याशी जोडण्याचे काम त्यांनी केलं. रामाचे काम करण्याचा त्यांचा मार्ग हाच होता आणि हाच मार्ग असू शकतो. तुकाराम आणि गांधीजी दोघांचीही आयुष्य याला साक्ष आहेत.

मुक्तिपांग नाही विष्णुचिया दासा । संसार तो कैसा न देखती ।।

बैसला गोविंद जडोनिया चित्ती ।आदि तेचि अंती अवसान ।।

भोग नारायणा देऊनि निराळी । ओविया मंगळी तोचि गाती ।।

बळबुद्धी त्यांची उपकारासाठी । अमृत ते पोटी साठवले ।।

द्यावे तरी दया देवाच सारिखी । आपुली पारखी नोळखती ।।

तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती तो ।।

To the servants of Vishnu there is no yearning even for salvation;

they do not want to know what the wheel of birth and death is like.

Govind sits steadily settled in their hearts; for them the beginning and the end are the same.

They make over happiness and misery to God and themselves remain untouched by them,

the auspicious songs sing of them.

Their strength and their intellect are dedicated to benevolent uses;

their hearts contain gentleness.

They are full of mercy even like God; they know no distinction between theirs and others'.

Tuka says: They are even like unto God and Vaikuntha is where they live.

आजकाल साधू आणि संत म्हणवून घेणाऱ्यांचे मठ आणि आखाडे एकमेकांविरुद्ध खरोखरच्या आखाड्यात उभे असल्यासारखे झगडत असतात. त्यांच्यात वर्षानुवर्षं कोर्टकेस सुरु असतात. साधुबोवांना सिक्युरिटी घेऊन फिरावं लागतं. असे आपल्या संतसमाज वगैरे युनियन बनवणारे हे संत खऱ्या संतांना कसं काय ओळखू शकणार. खरा भक्तच दुसऱ्या भक्ताला ओळखू शकतो.

म्हणून तर विठ्ठलाचे समकालीन भक्त एकटेदुकटे नाही, तर मांदियाळीने फिरत आलेले दिसतात. त्यांनी एकत्र यात्रा केलेल्या आहेत. एकमेकांशी चचेर्तून, एकमेकांच्या व्यक्तित्वातून प्रेरणा घेत विकसित झालेले आहेत. भगवंताच्या आणखी जवळ गेले आहेत. कधी ज्ञानोबांच्या प्रभावातून नामदेवांनी गुरु करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो, तर त्याचवेळेस नामदेवांमुळे ज्ञानेश्वर योगाच्या प्रभावातून बाहेर पडून भक्तीकडे आलेले दिसतात. याचमुळे ज्ञानेश्वरांपासून आजपर्यंत वारकरी संप्रदायाने सदैव आपल्या पूर्वसूरींकडे केवळ आदराने पाहिलेले आहे.

फक्त आपल्या संप्रदायातीलच नाही, तर अन्य संप्रदायांतील संतांशी या संतांचं फार सौहार्दपूर्ण संबंध होते. नामदेव, तुकाराम, एकनाथ हे तर सुफी संतांशीही अगदी आपलेपणाचे वागल्याचे दाखले आहेत.

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारुनि ।।

विषय तो त्यांचा जाला नारायण । नावडे धन जन माता पिता ।।

निर्वाणी गोविंद असे मागेंपुढें । कांहीच सांकडे पडो नेदी ।।

तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साहे । घातलिया भये नरका जाणें ।।

He is a devotee who is indifferent about body, who has killed all desire,

whose one object in life is (to find) Narayana,

whom wealth or company or even parents will not distract,

for whom whether in front or behind there is only God in difficulty,

who will not allow any difficulty to cross his purpose.

Tuka says: Truth guides such men in all their doings.

१२

गांधीजींच्या लिखाणात , वक्तव्यांत तुकारामांच्या उल्लेख अनेकदा आलाय. गांधींचे समग्र साहित्य इंटरनेटवर उपलब्ध आहे , त्यात ' तुका ' असा सर्च दिला , की अनेक संदर्भ समोर येतात.

त्यातला महत्त्वाचा संदर्भ वाईच्या भाषणाचा आहे. त्यात असहकार आंदोलनाची तात्त्विक भूमिका समजावून सांगताना त्यांनी तुकारामांचा दाखला दिला आहे. त्यात गांधीजींना ' कठीण वज्रास भेदू ऐसे ' आणि ' नाठाळाच्या माथी हाणू काठी ' सांगायचं असावं , असं वाटतं. महाराष्ट्रयात्रेच्या संदर्भात त्यांनी तुकोबांचा केलेला उल्लेख याच सदरात पूर्वी एकदा आला आहे.

पुढे हरिजनांच्या सभेसमोर हिंदूधर्माचं मोठेपण सांगताना त्यांनी हा ज्ञानेश्वर आणि तुकारामांचा धर्म असल्याचे सांगितले आहे. हा धर्म चिरकाल टिकणार आहे , असं त्यांनी पुढे म्हटलं आहे. आंबेडकरांच्या धर्मांतराकडे आकर्षणाऱ्या दलितांना हिंदूधर्मात ठेवण्याची गांधीजींची कळकळ होती. कदाचित त्याचाही संदर्भ याला असू शकेल. याच भाषणात दाक्षिणात्य संत थिरुवल्लुवर यांची तुलना केवळ तुकारामांशीच होऊ शकते , असं सांगत ते तुकोबाचं मोठेपण अधोरेखित करतात.

बंगालहून पाठवलेल्या एका पत्रात गांधीजी देवाच्या अवतारांविषयी लिहितात. तुकाराम , ज्ञानेश्वर , नानक, कबीर हे दैवी अवतार नव्हते का , असा सवाल त्यांनी विचारला आहे. गावांच्या विकासासाठी काम करणाऱ्या तरुणांनी तुकारामासारख्या संतांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी , असा सल्लाही त्यांनी दिला आहे. तसेच गोपुरी आश्रमातील एका अंत्यसंस्काराच्या वेळी आपल्या आग्रहानंतर विनोबांनी तुकारामांचा अभंग गायल्याची आठवणही त्यांनी एका प्रार्थनासभेत सांगितली आहे. तसेच आणखी एका अशाच प्रार्थनासभेत बाळासाहेब खेर आणि ठक्करबापांच्या उपस्थितीत त्यांनी तुकारामांचा ' पापाची वासना नको दावूं डोळा ' हा आवडता अभंग उद्धृत केला आहे.

डॉ. इंदुभूषण भिंगारे यांनी तुकाराम गाथेचं हिंदी भाषांतर केलं होतं. त्याची एक छोटी प्रस्तावना गांधीजींनी लिहिली आहे. आपल्याला फारसं मराठी येत नसलं तरी मला तुकाराम खूप प्रिय आहे , असं त्यांनी यात आवर्जून लिहिलं आहे. या गाथेसाठी त्यांनी शांतिनिकेतनातून खास तुकारामांचं चित्र काढून घेतलं होतं. गांधीजींनी अनुवादित केलेला तुकोबाचा आणखी एक अभंग.

न कळता काय करावा उपाय । जेणे राहे भाव तुझ्या पायी ।।

येऊनिया वास करिसी हृदयी । ऐसं घडे कई कासयाने ।।

साच भावे तुझे चिंतन मानसी । राहे हे करिसी कैं गा देवा ।।

लटिके हे माझे करुनिया दुरी । साच तू अंतरी येउनि राहे ।।

तुका म्हणे मज राखावे पतिता। आपुलिया सत्ता पांडुरंगा ।।

When one does not know, what is one to do so as to have devotion to Thy sacred feet?

When will it so happen that Thou wilt come and settle in my heart?

O God, when wilt Thou so ordain that I may meditate on Thee with a true heart?

Remove Thou my untruth and, O Truth, come and dwell Thou in my heart.

Tuka says: O Panduranga, do Thou protect by Thy power sinners like me.

१३

'नेमिले या चित्तापासुनिया ' चा इंग्रजी अनुवाद करताना गांधीजींनी मेडिटेट असा शब्द वापरला आहे. मेडिटेशन म्हणजे ध्यान. त्याचा थेट संबंध चित्ताशी आहे. चित्तामधले तरंग नाहीशे करणे म्हणजे योग , असं भगवान पतंजली सांगतात. ध्यान त्या योगाची एक पायरी. त्यामुळे चित्त म्हणजे योग असं समीकरण बांधलं गेलं आहे.

भगवान पतंजलींनी सांगितलेला योग देव मानणारा आहे की नाही , यावर बरीच मतमतांतरे आहेत. पण असे वाद पुस्तकं लिहिणाऱ्या विद्वानांसाठी असतात किंवा मग डॉक्टरेट मिळवणाऱ्यांसाठी तरी. तुकारामांच्या काळी डॉक्टरेट नव्हती. मग असे लोक शास्त्रार्थाचा किस पाडत मोठे पंडित बनत. त्यातलेच मग तुकारामांना गाथा इंद्रायणीत बुडवण्याचे फतवे काढत. आता इंटरनेटवर एक सर्च मारला की जगभरची विद्वत्ता आपल्या बोटांजवळ येऊन पडते. या ग्लोबल जगात अशा पंडितांची दुकानं बंद पडली आहेत , हे बरं झालंय. पण सर्च मारून मंबाजी होता येईल , तुकाराम नाही.

तुकारामांना या अशा वादांशी काही घेणंदेणं नव्हतं. तत्त्वज्ञानासाठी त्यांचं जीवन नव्हतं. त्यांच्या जीवनात तत्त्वज्ञान जगायचं होतं. त्यामुळे मग त्यांचा योग त्यांच्या पांडुरंगाशीच होता. योग म्हणजे जोडलं जाणं. ते पूर्णपणे पांडुरंगाशी जोडले गेले होते. तुकारामांनी पतंजलींनी लिहिलेली थिअरी अभ्यासली असेलही , नसेलही. पण त्याने काय फरक पडतोय. ते ती थिअरी प्रॅक्टिकलमधे आणत होते. किंबहुना पतंजलींनी त्यांच्या भोवतालच्या तुकारामांसारख्या योग्यांच्या जीवनातच आपली सूत्र शोधली असतील.

पतंजलींचं एक भन्नाट योगसूत्र आहे , ' वीतरागविषयं वा चित्तम् '. संतांना आपल्या चित्ताचा विषय बनवा , असा त्याचा साधा अर्थ. आपण ज्यांच्याविषयी विचार करतो, तसे बनतो. संतांचा विचार करा , त्यांच्यासारखे व्हाल. पण रोजच्या व्यवहारातही हे तुकड्या तुकड्यात वापरता येण्याजोगं तत्त्वज्ञान आहे. कॉर्पोरेट जगात आपल्याला एखादा गुण आपल्यात हवा , असं वाटतंय. मग तसा रोजच्या पाहण्यातला माणूस शोधा. त्याचं बारीक निरीक्षण करा. त्या माणसाच्या त्या गुणासंबंधी विचार करून बघा. आपल्यात त्याच्यातला तो गुण कमीअधिक कधी येईल ते कळत पण नाही.

माणसंच आपल्याला शिकवत असतात. पुस्तकं नाहीत. पुस्तकांनी शिकवलं असं वाटलं , तर बारकाईनं विचार करा. बहुतेक त्या पुस्तकातल्या माणसांनीच आपल्याला शिकवलेलं असतं. गांधीजी , तुकाराम असेच शिकले असावेत.

आणिक दुसरे मज नाही आता । नेमिले या चित्तापासुनिया ।।

पांडुरंग मनी पांडुरंग ध्यानी । जाग्रती स्वप्नी पांडुरंग ।।

पडिले वळण इंदिया सकळां । भाव तो निराळा नाही दुजा ।।

तुका म्हणे नेत्री केले ओळखण । साजिरे ते ध्यान विटेवरी ।।

This heart of mine is determined that for me now there is nothing else;

I meditate on Panduranga, I think of Panduranga,

I see Panduranga whether awake or dreaming.

All the organs are so attuned that I have no other desire left.

Tuka says: My eyes have recognized that image standing on that brick transfixed in meditation unmoved by anything

आतापर्यंत एकही राष्ट्रपती किंवा पंतप्रधान बनलेला नाही , अशी दोन महत्त्वाची राज्यं कालपर्यंत होती , एक महाराष्ट्र आणि दुसरं बंगाल. आज प्रतिभा पाटलांनी शपथ घेतली की महाराष्ट्र या यादीतून गळेल. या दोन राज्यांत अनेक साम्य असली तरी राष्ट्रपती-पंतप्रधान नसणं , हा निव्वळ योगायोग नाही. (हा लेख २००९ सालचा आहे)

या दोन्ही राज्यांनी गेल्या दोनशे वर्षांत एकमेकांवर खूप प्रभाव पाडलाय. बंगालचा आपल्या संस्कृती साहित्यावरचा प्रभाव आपल्याला ठावूक आहेच. पण महाराष्ट्राचा प्रभावही बंगालवर आहे. गुरुदेव रवींदनाथ टागोरांनी शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या बंगाली कवितेचा पुलंनी केलेला अनुवाद शाळेच्या पुस्तकात अभ्यासालाच आहे. पण गुरुदेवांच्या तोडीचेच महाकवी असणाऱ्या अरविंद घोषांनी आपल्या पल्लेदार इंग्रजीत एक दीर्घकविता केलीय , कोणावर माहीतेय , बाजीप्रभूंवर.

गुरुदेव टागोरांवर तुकारामांचाही प्रभाव होता. त्यांनी तुकारामांचे बारा अभंग बंगालीत अनुवादितही केले आहेत.गुरुदेव आणि गांधीजींचे अगदी घनिष्ट संबंध होते. पण गुरुदेवांना तुकाराम आधीपासूनच माहीत होता. भारतातील पहिले आयसीएस आणि वडील बंधू सत्येंदनाथांमुळे रवींदनाथ तुकारामांकडे आकर्षिले गेले.

गांधीजींमुळे गुरुदेवांच्या अगदी जवळच्या एका कलाकाराला तुकाराम कळला. तो कलाकार म्हणजे नंदलाल बोस. ते जागतिक कीतीर्चे चित्रकार. जगभर त्यांची प्रदर्शने भरली होती. तीस वर्ष त्यांनी शांतिनिकेतनातल्या कलाभवनचं प्रमुखपद भुषवलं. गांधीजींनी त्यांना तुकारामाची चित्र काढण्याची विनंती केली होती. डॉ. इंदूभुषण भिंगारेंनी तुकारामांच्या अभंगांचं ' तुकाराम की राष्ट्रगाथा ' या नावाने हिंदी भाषांतर केलं होतं. त्याला गांधीजींनी प्रस्तावना लिहिली आहे. आणि या पुस्तकात तुकारामांची चांगली चित्रं छापून यावीत म्हणून नंदलाल बोसांकडून चित्रं काढून घेतली. यात पुस्तकात बोसांची तीन चित्रे आहेत.या तुकारामाला गांधीजी , रवींदनाथ आणि नंदलाल बोस अशा तीन दिग्गजांचा स्पर्श असल्याचा विचार डोक्यात येतो. आणि मग हा तुकाराम वेगळाच वाटू लागतो.

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो।।

ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणि लोकांसी हेचि सांगे।।

विटंबो शरीर होत का विपत्ती । परि राहो चित्ती नारायण।।

तुका म्हणे नासिवंत हे सकळ । आठवे गोपाळ तेचि हेत।।

What though I get nothing to eat and have no progeny? I

t is enough for me that Narayana’s grace descends upon me.

My speech gives me that advice and says likewise to the other people.

Let the body suffer; let adversity befall one,

enough that Narayana is enthroned in my heart.

Tuka says: All the above things are fleeting; my welfare consists in always remembering Gopal.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने अवघा महाराष्ट्र ग्यानबा तुकारामाच्या गजरात डोलत असताना , आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये तुकारामाचे शब्द ऐकू आले. नव्या राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी आपल्या पहिल्या भाषणात तुकारामांचा अभंग सांगितला. जे का रंजले गांजले...

विठ्ठलमुक्तीला साठ वर्ष होत असताना महाराष्ट्राची लेक देशातील सवोर्च्च पदावर बसते , हा एक आनंददायी योगायोग आहे. आणि तेव्हा ती लेक आपल्या भाषणात तुकाराम , गांधीजी आणि आंबेडकर या तिघांची नावं घेते, यापरता आनंद तो काय.

मावळते राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनाही तुकाराम माहित आहे. त्यांनीही त्यांच्या ' विंग्ज ऑफ फायर ' या प्रसिद्ध पुस्तकात तुकारामांचा अभंग दिलाय. बहुधा पद्मभूषण मिळाल्यानंतरचा आनंद व्यक्त करताना त्यांनी लिहिलंय , आनंदाचे डोही आनंद तरंग. या प्रकरणाचा हिंदीतला अनुवाद करताना प्रख्यात कवी गुलजारांनी या अभंगाचाही गोड हिंदी अनुवाद केला आहे. तो अगदी मिळवून वाचण्यासारखा आहे.

लागोपाठ दोन राष्ट्रपतींवरचा तुकारामांचा प्रभाव हा काय फक्त एक योगायोग मानायचा ?

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।

गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।

न लगे मुक्ती आणि संपदा । संतसंग देई सदा ।।

तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।

O God, grant only this boon. I may never forget Thee; and I shall prize it dearly. I desire neither salvation nor riches nor prosperity; give me always company of the good. Tuka says: On that condition Thou mayest send me to the earth again and again.

सामाजिक परिवर्तनाचा रथ गांधीजींनी आणि त्यांच्या अनुयायांनी पुढे नेला. साने गुरुजींनी विठ्ठलमंदिराची मुक्तीचा दिलेला यशस्वी लढा याचं खणखणीत उदाहरण आहे.

विठ्ठलमुक्ती आंदोलनाचा यंदा हिरकमहोत्सव. विठ्ठलमंदिरात कथित अस्पृशांना प्रवेश मिळाला त्याला या १० मे रोजी साठ वर्षं पूर्ण झाली. दलितांच्या मंदिरप्रवेशासाठी एक ब्राम्हण नेता आपला जीव पणाला लावतो. आपल्याच जातीतल्या कट्टरांशी भांडतो. त्याच्या पाठिशी उभे राहतात तेही बहुसंख्य ब्राम्हणच. ही भारताच्या इतिहासातली एक फार मोठी घटना आहे. साने गुरुजींच्या दहा दिवसांच्या उपोषण काळात सेनापती बापट , आचार्य अत्रे , अच्युतराव पटवर्धन , दादासाहेब मावळंकर , बबनराव बडवे , पांडुरंग उत्पात , तात्या डिंगरे अशा ब्राम्हण पुढाऱ्यांनी आपली सारी पुण्याई चंदभागेच्या वाळवंटात साने गुरुजींच्या मागे उभी केली.

साने गुरुजी गांधीजींचं तत्त्वज्ञान आणि आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच लढत होते. पण बडव्यांनी एका गांधीवादी पुढाऱ्याला गाठून गांधीजींना या आंदोलनाबद्दल गैरसमज करून दिले. त्यामुळे गांधीजींनी गुरुजींना उपोषण मागे घेण्याची तार केली. पण गुरुजी हाडाचे गांधीवादी. सत्य आपल्या सोबत असल्याचा पूर्ण विश्वास असल्याने त्यांनी गांधीजींचा आदेशही धुडकावून लावला. लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळंकर यांनी गांधीजींचे गैरसमज दूर केल्यावर मात्र त्यांनी पाठिंबा दिला. त्यानंतर लागलीच पावलं उचलली गेली आणि विठ्ठलमंदिर सर्वांसाठी खुले झाले.

तुकोबाच्या विठोबाची मुक्ती करण्यासाठी गांधीजींचं तत्त्वज्ञान धावलं. पण मुळात ते तत्त्वज्ञान तुकोबांच्या तत्त्वज्ञानापेक्षा वेगळं कुठे होतं ?

शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी ।।

विसर तो न पडावा । माझा देवा तुह्यांसी ।।

पुढे फार बोलो काई । अवघे पायी विदित ।।

तुका म्हणे पडिलो पाया । करा छाया कृपेची ।।

This is my last prayer, saintly people listen to it,:

God, do not forget me; now what more need I say,

Your holy feet know everything.

Tuka says: I prostrate myself before Your feet,

let the shadow of Your grace descend upon me.

# <u>तुकोबा आणि छत्रपती शिवाजी</u>

- बाबाजी गणेश परांजपे

तुकोबारायांची शब्दसृष्टि पढिक विद्वानाची नव्हती. त्यांनीं विश्वासानें, आदरानें-जीं कांहीं संतांची वचनें पाठ केलीं होतीं, तेवढींच त्यांचीं शब्दसृष्टि ! ती संतांचीं वचनें कानांत विसावून मनांत परिपाक होऊन त्यांच्या अंतरांत जेव्हां सुखाचा झरा लागला, आनंदाला पूर आला तेव्हां प्रेमामृतानें ओलावलेल्या, हरिगुणगानानें गोडावलेल्या, विठ्ठल गजरानें पिकलेल्या वाचेच्याद्वारां तो प्रेमाचा पूर-तो सुखाचा झरा-वाट काढूं लागला; तेव्हां त्या निःशब्दाचे शब्दांनीं आळें करून परब्रह्म कवळावें अशी स्थिति झाली. प्रत्येक शब्द हा अरवस्थेच्या प्रतीतीनें स्थानापन्न असल्यामुळें तो ज्या कळकळीनें उच्चारला जाई तेवढया च आर्ततेनें त्या समोरच्या श्रोत्यांच्या आर्त मनोभूमींत रुजे. त्यामुळें तुकोबांचें कीर्तन वा भजन परिणामकारक होई. अगदी बालपणांत च शिव छत्रपती त्यांच्या वक्तृत्वाच्या प्रभावांत सांपडले. त्यांनीं इतर उपदेशकांनीं सांगितल्याप्रमाणें सर्वसंग परित्याग करून भजन पूजन कीर्तनांत आयुष्य वेचावें असें मनांत आणलें व तसा क्रम सुरू केला. तुकोबांस ही गोष्ट कळली तेव्हां तुम्ही स्वराज्यस्थापनेच्या कामावर रहा आम्ही भजन कीर्तन द्वारां लोकांची अवनत स्थिती सुधारण्याच्या, त्यांच्या अंतरांत रवीचा प्रकाश पाडण्याच्या, त्यांच्या हातून पाप कृत्य होणार नाहीं, अशा त-हेनें त्यांच्या विचारांची दिशा बदलविण्याच्या कामावर राहूं असें आपण एकमेक एकमेकांस सहाय्य करूं व सर्व जण सुपंथ धरतील असें वागूं; असें म्हणून तुमच्या कार्याच्या पाठीशीं मी आहें याची खूण म्हणून तुमच्या सहका-यांना प्रसाद म्हणून अभंग देतों, असे हे पाइकीचे अभंग आहेत. आज जरी स्वराज्य आहे तरी सध्याचे सरकार त्या अभंगांचें निरूपण पटवून घेऊन पचवितील अशी मला खात्री देववत नाहीं. असो, तात्पर्य काय, कीं अभंगवाणी ही फार प्रतापवंत व प्रभावी होती. याची साक्ष रामेश्वर भटाची फिर्याद, व "गुरुत्व गेले नीच याती" अशी रामदासांची पोटदुखी, मंबाजीबोवांचा तडफडाट, व चिंतामणी देवांची परीक्षा अशा गोष्टी देत आहेत. अशीं आणखी हि कांहीं उदाहरणें झालीं असतील. पण अशा अडथळयांस न जुमानतां देवा हातीं रूप धरवूं आकार नेदु निराकार होऊं त्यासी । या बाण्यानें तुकाराम महाराज वागत होते.

शिवछत्रपतींच्या सैनिकांस पाईकीचे अभंग महाराजांनीं दिलें व शिवरायास निष्ठावंत माणसें लाभलीं म्हणून स्वराज्य स्थापतां आलें. त्या निष्ठावंत माणसांनीं स्वराज्य अवनत अवस्थेंत संभाळलें.

१

पाईकपणें जोतिला सिध्दांत । सुर धरी मात वचन चित्तीं ॥१॥

पाइकावांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ॥२॥

तरि व्हावें पाईक जिवाचा उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥४॥

पाइकीचें सुख जयां नाहीं ठावें । धिग त्यांनीं ज्यावें वांयांविण ॥४॥

तुका म्हणे एका क्षणांचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥५॥

२

पाइकीचें सुख पाइकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटीं ॥१॥

येतां गोळया बाण साहिले भडमार । वर्षातां अपार वृष्टि वरी ॥२॥

स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडन शोभा दावी ॥४॥

पाइकांनीं सुख भोगिलें अपार । शुध्द आणि धीर अंतर्बाहीं ॥४॥

तुका म्हणे या सिध्दांताच्या खुणा । जाणे तो शाहाणा करी तो भोगी ॥५॥

३

पाईक जो जाणे पाइकींनीं भाव । लाग पगें ठाव चोरवाट ॥१॥

आपणां राखोनि ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हरूनियां ॥२॥

येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईक त्या जग स्वामी मानी ॥४॥

ऐसें जन केलें पाइकें पाईक । जया कोणी भीक न घलिती ॥४॥

तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक । बळिया तो नाइक त्रैलोकींचा ॥५॥

४

पाइकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांटा मोडोनियां ॥१॥

पारखिये ठायीं घेउनियां खाणें । आपलें तें जन राखियेलें ॥२॥

आधारेंविण जें बोलतां चावळे । आपलें तें कळे नव्हे ऐसें ॥४॥

सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया ॥४॥

तुका म्हणे विश्वा घेऊनि विश्वास । पाईक तयास सुख देती ॥५॥

५

पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥१॥

तो एक पाईक पाइकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥२॥

तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाइका त्या भिन्न नाहीं स्वामी ॥४॥

विश्वासावांचूनि पाइकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिलिया ॥४॥

तुका म्हणे नये स्वामी उणेपण । पाइका जतन करी त्यासी ॥५॥

६

धनी ज्या पाइका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ॥१॥

जिवाचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुगुटमणि ॥२॥

आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख ॥४॥

कमाइचीं हीणें पडिलीं उदंडें । नाहीं तयां खंड येती जाती ॥४॥

तुका म्हणे तरि पाइकी च भली । थोडीबहुत केली स्वामिसेवा ॥५॥

७

पाइकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाइकीनें ॥१॥

पाईक जाणें मारितें अंग । पाइकासी भंग नाहीं तया ॥२॥

एके दोहीं घरीं घेतलें खाणें । पाईक तो पणें निवडला ॥४॥

करूनि कारण स्वामी यश द्यावें । पाइका त्या नांव खरेपण ॥४॥

तुका म्हणे ठाव पाइकां निराळा । नाहीं स्वामी स्थळा गेल्याविण ॥५॥

८

उंच निंच कैसी पाइकाची वोळी । कोण गांढे बळी निवडिले ॥१॥

स्वामिकाजीं एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबध्द ॥२॥

प्रसंगावांचूनि आणिती आयुर्भाव । पाईक तो नांव मिरवी वांयां ॥४॥

गणतीचे एक उंच निंच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडे ॥४॥

तुका म्हणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ॥५॥

९

एका च स्वामीचे पाईक सकळ । जैसें बळ तैसें मोल तया ॥१॥

स्वामिपदीं एकां ठाव उंच स्थळीं । एक तीं निराळीं जवळी दुरी ॥२॥

हीन कमाईचा हीन आन ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ॥४॥

पाइकपणें तो सर्वत्र सरता । चांग तरी परता गांढया ठाव ॥४॥

तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ॥५॥

१0

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाटीं एकें जैशीं तैशीं ॥१॥

आगळें पाऊल आणिकांसी तरी । पळती माघारीं तोडिजेती ॥२॥

पाठीवरी घाय म्हणती फटमर । धडा अंग शूर मान पावे ॥३॥

घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी सकळीक सर्व हरी ॥४॥

तुका म्हणे नव्हे बोलाचें कारण । कमाईचा पण सिध्दी पावे ॥५॥

११

जातीचा पाईक ओळखे पाइका । आदर तो एका त्याचे ठायीं ॥१॥

धरितील पोटासाटीं हतियेरें । कळती तीं खरें वेठीचींसीं ॥२॥

जीताचें तें असे खरें घायडाय । पारखिया काय पाशीं लोपे ॥३॥

तुका म्हणे नमूं देव म्हूण जना । जालियांच्या खुणा जाणतसों ॥४॥

# <u>तुकोबा - शिवराय भेट</u>

- भाऊ राहिरकर

महाराष्ट्राच्या या दोन परमोच्च विभूतींची भेट हा एक सूर्यचंद्र, गंगायमुना, मेरुमंदार, यांच्या मीलनाचा, श्रेष्ठ तत्त्वांचा संगम होता. आमच्या दृष्टीने यातल्या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक शिवाजी व तुकोबा यांच्या भेटीचा काल साधारणत: शके 1565 ते 1570-71 एवढाच असू शकेल. रामदास, शिवाजी व तुकोबा यांच्या संबंधाबद्दल सर्वसामान्य वाचक जेव्हा विचार करू लागतो तेव्हा हे तिघेही एकमेकांच्या संपूर्ण हयातीत जिवंतच होते असे गृहीत धरलेले असते. तीत एक स्पष्ट कल्पना ध्यानी घेणे अवश्य आहे. ती म्हणजे शिवरायाचा जन्म सन 1630 चा निश्चित असेल तर तुकोबांचे निर्याणप्रसंगी ते फक्त एकोणीस वर्षाचे होते. तेव्हा तुकोबांची व शिवरायाची भेट, वह्या तरल्यानंतर जी तुकोबांची प्रसिध्दी झाली त्या सुमारास व शिवराय स्वराज्याकरिता चळवळ करू लागले त्या त्यांच्या वयाच्या 15 व्या वर्षानंतर झाली आहे. शिवराय हे स्वराज्यासाठी जशी मावळयांची प्रत्यक्ष मदत घेत होते, त्याचप्रमाणे ते हिंदवी राज्यासाठी साधुसंतांचा आशीर्वाद मिळवीत होते. त्यांनी या कामी मुसलमान साधूकडूनही जर शुभकामना अपेक्षिल्या व त्यांच्या परामर्ष घेतला तर हिंदुधर्मातले त्याकाळचे निरपेक्ष सर्वश्रेष्ठ साधुवर्य यांनाच तेवढे न भेटता, वगळले असेल हे शक्यच नाही. शिवराय व तुकोबा यांच्या भेटीबद्दलची तुकोबारायांची प्रत्यक्ष अक्षरे आता पाहा. ते गातात-

‘दिवटया छत्री घोडे। हे तो बऱ्यात न पडे॥

आता येथे पंढरिराया। मज गोविसी कासया॥

मुंगी आणि राव। आम्हा सारखाची देव॥

गेला मोह आणि आशा। कळिकाळाचा हा फासा॥

सोने आणि माती। आम्हा समान हे चित्ती॥

तुका म्हणे आले। घरा वैकुंठ हे सावळे॥’

या प्रसंगातील दोन्ही पुरुषांचे वर्तन त्यांचे जीवनाचे पैलू अधिक उजळविणारे आहेत असे दिसेल. आर्यधर्मातील राजा हा सत्तेने उन्मत्त नसतो तर तो संतश्रेष्ठांचे आशीर्वाद घेणारा व आपले शिर त्या चरणावर ठेवणारा असतो. म्हणून सारे राज्य आणि जीवनही त्यांना समर्पण करण्याची इच्छा झाल्याने बहुमोल रत्नांचा नजराणा शिवरायाने पाठविला, हे उल्लेखनीय आहे. तुकोबाही हे साधुश्रेष्ठ एवढे की, असा बहुगुणी राजा आपणाला

शिष्य म्हणून लाभतो म्हणून ते हुरळले नाहीत. ‘इंद्रपदादिक भोग। भोग नव्हती ते भवरोग॥’ अशा सत्य जीवनधारणेमुळे आलेला नजराणा त्यांनी परत करून ‘राजा! प्रभूला स्मरून जनकल्याण करणे हेच आम्हाला आवडते, ते तू आम्हाला पुरवावे’ असा उलट निरोप पाठविला. या अभंगावरून संत तुकोबाराय राजाच्या समृध्द स्वराज्यसिध्दीसाठी चिंत्ता करीत होते हे निश्चित.

मात्र, हा नजराणा पाहून देवाला त्यांनी ऐकवले ते महत्त्वाचे आहे. धनराज्य, ऐश्वर्यसत्ता, लौकिक यांचा पाऊस पडला तरी न डगमगण्याचे धैर्य जिथे ते हृदय प्रभूला त्या निमित्ताने सांगते-

आता पंढरिराया। येथे मज गोविसी कासया॥

आम्ही तेणे सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी॥

तुमचे येर ते धन। ते मज मृत्तिकेसमान॥

तुकोबांचे शिवरायभेटीबद्दलचे आणखीही अभंग आहेत. पण दिलेले उतारे सूचक व परिपूर्ण आहेत.

दिवटया छत्रीचा उल्लेख, शिवरायांनी त्या पाठविल्या नसत्या तर एवढया तपशिलाने वर्णन होण्याची आवश्यकता काय? मुंगी आणि राव, सोने आणि मृत्तिका समान असून आम्हाला तुम्ही प्रभुचिंतन करण्याचे खरे सुख आहे ही भूमिका त्या भेटीखेरीज इतरत्र चपखल बसूच शकत नाही.

यावरून जे घडले ते साहजिक दिसते. तुकोबांची दिगंतकीर्ती ऐकून-वाऱ्याहाती गेलेल्या मापाने-भक्तिभाव व सत्पुरुषाबद्दल आदर असणारा हा धर्मवृत्तीचा बालराजा त्यांना नजराणा पाठविणे सहज शक्य आहे. याप्रमाणे तो धर्मरत बालराजा न पाठविता तर त्याच्या स्वभावप्रवृत्तिविरुध्द आक्षेप आला असता. फकीरांच्या कबरींना जो दान देतो तो सजीव, साक्षात्कारी आणि कीर्तनसिंधू वाहणाऱ्या व पुण्यापासून 16 मैलांवरील साधूला न भेटता विसरला असेल हे शक्यच नाही.

अर्थात शिवरायाची व तुकोबांची भेट होण्यावर दोघांचाही मोठेपणा अवलंबून नाही. दोघेही आपापल्या क्षेत्रात स्वयंभू, स्वप्रकाशी आहेत. मात्र स्वराज्य उदयकाली स्वराज्याची स्वप्ने साकार व्हावी म्हणून गगनपाताळ उचंबळविणारा हा दूरदृष्टी धर्मनिष्ठ राजा, सर्व आचारधर्माला लाजविणाऱ्या भक्तिमान व अखंड गर्जणाऱ्या कीर्तनश्रेष्ठाला ओळखू शकला नसेल, व महाराष्ट्राच्या भाग्यनौबती गर्जविणाऱ्या या बालाकरिता, देवाला तो संतश्रेष्ठ सादावीत नसेल हे शक्यच नाही. अधर्म व अंदाधुंदी वाढल्याने ‘पांडुरंगा तुम्ही निजलेत काय’ असा खडसावून सवाल विचारणारे, पांडुरंगच शिवरायाच्या रूपाने धर्माची पहाट घडवीत असल्याचे पाहून डोळे झाकून

बसले असतील काय? तुकोबांची वचने सांगतात की, ते तसे गप्प बसले नव्हते. जो अल्पकाल या दोघात समान होता, त्या चारपाच वर्षांच्या अवधीत तुकोबांनी पाईक कसे असावेत, रणात कोण नीतीने वर्तावे याचे धडे घातले तेही जाणत्यांचे डोळे उघडण्यास पुरे आहेत. अर्थात निजलेल्यांना जागे करणे शक्य आहे. जागे असून झोपेचे सोंग घेणारांना नाही. त्या मोकळया आत्मप्रत्ययी जीवापुढे तुकोबांच्या पाईकावरील अभंगातील काही मार्मिक वचने ठेवीत आहे. ती वाचा, मनन करा. (येथे पाईक म्हणजे शिपाई हा अर्थ प्रथम ध्यानी घेणे अवश्य आहे.)

पाईकी वाचून नव्हे कधी सुख। प्रजामध्ये दु:ख न सरे पीडा॥

तरि व्हावे पाईक जीवाचे उदार। सकळ त्यांचा भार स्वामी वाहे॥

पाईकीचे सुख जया नाही ठावे। धि त्यांनी जियावे वायावीण॥

तुका म्हणे एका क्षणाचा करार। पाईक अपार सुख भोगी॥

शिपाई कर्तव्यतत्पर असले तरच प्रजेला सुख शक्य आहे. तो पाईक राजासाठी जिवावर उदार असावा लागतो. मग त्याचा धनी त्याचे सर्व काही बरे करतो. हे धन्याकरिता जीवन अर्पण करण्याचे सुख ज्यांना नाही ते फुका कशाला जगावे? म्हणजे तुकोबांना असे शिपाई देशरक्षक नाहीत ते सारे भूमीभार आहेत असे वाटतात. हा शिपाईपणा एका क्षणात जिवाचा करार करून भेटू शकतो. त्या एका क्षणाच्या निश्चयाने जे ध्येय अंगी जडते, त्यात अपार सुख असते.

पाईकीचे सुख पाईकासी ठावे। म्हणोनिया जीवे केली साटी॥

येता गोळया बाण साहिले भडिमार। वर्षता अपार वृष्टी वरी॥

स्वामीपुढे व्हावे पडता भांडण। मग त्या मंडण शोभा दावी॥

पाईकांनी सुख भोगिले अपार। शूर आणि धीर अंतर्बाही॥

पाईक तो जाण पाइकाचा भाव। लगबग ठाव चोरवाट॥

आपण राखोनी ठकावे आणिक। घ्यावे सकळीक हिरोनिया॥

तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक। बळिया तो नाईक त्रैलोकीचा॥

पाईक असेल त्याला ते खरे ध्येयसुख माहीत, म्हणूनच जीवाभावापासून त्या जीवनाची साठवण (जोडी) केली. ते अंतर्बाह्य शूर आणि धीर असल्याने स्वामीपुढे होऊन गोळया आणि बाणांच्या वर्षावाला छाती पुढे करतात. असे शिपाई ज्याच्याजवळ तो कुठल्यातरी एखाद्या राज्याचा नव्हे तर त्रैलोक्याचाही धनी-बळिया म्हणून

शोभेल. म्हणजे असे शिपाई शिवरायाचे होते, असावे ही आकांक्षा, धर्मजीवनाने आधार पुरविणाऱ्या या साधुश्रेष्ठाची होती.

पाईकावरील अभंग ज्ञानराजादि इतर संतांचेही आहेत. पण त्यात शूरधीरत्वाचे व एकनिष्ठतेचे वर्णन प्रमुख आहे. तुकोबाराय "आपणा राखूनि ठकावे आणिक" म्हणतात, चोराच्या वाटा माहीत असाव्या असे दाखवितात ते वैशिष्टय इतर पाईक अभंगात नाही. आणि याचे कारण उघड आहे. त्याकाळच्या परिस्थितीला तुकोबा जागे होते, त्या कालच्या राजाला अभिष्ट चिंतून देता येईल ते साह्य देण्याचे उत्कट प्रयत्न त्यात दिसून येतात.

‘रणी निघता शूर न पाहे माघारे’

‘एका बीजा केला नास। मग भोगिले कणीस।’

‘तुका म्हणे आधी करावा विचार। शूरपणे तीर मोकलावा॥’

‘मनाचा उदार रायाचा झुंजार। फिरंगीचा मार करीतसे॥’

‘शूरत्वावाचूनी शूरामाजी ठाव। नाही आविर्भाव आणिलीया॥’

अशी अनेक वचने तुकोबांच्या अंगीचे शौर्यचैतन्य राष्ट्रात फुलवीत होते, शिवप्रभूला साह्य देत होते. ईश्वरीलिखित एवढेच की, ही दोन श्रेष्ठांची संगती तुकोबांचा निर्याणकाळ येऊन चारपाच वर्षात संपली. ती अधिक काळ राहती तर?

पाईकीचे अभंग परमार्थवीर आणि राज्यचालक या दोघांनाही लागू पडणारे आहेत. पण ती अक्षरे ज्या परिस्थितीत उमटली तेथला वेष घेऊन आली आहेत असे वरील उदाहरणांनी स्पष्ट म्हणावेसे वाटते. नाथांनी भावार्थ रामायणात राक्षसांना दाढया असल्याचे वर्णन व्यर्थ केले नव्हते; तसेच तुकोबांचे पाईक दैवावर हवाला ठेऊन बसणारे नव्हते हे त्या अक्षरातून आपण ओळखू शकलो तर संत देश बुडवे होते, ते परिस्थितीपासून दूर राहणारे, पलायनवादी होते, इत्यादी आळशी व पोकळ डोक्यातील निंदेला वाव न देता कुठल्याही व्यक्तीचे मूल्यमापन त्या कालची परिस्थिती, व त्यांची कृत्ये व अक्षरे यांना धरूनच करू शकू.

पण शब्दशूर व जगाला धक्के देणारांना हे पटत नाही. ते आजचे संकेत, आजचे जीवन डोळयापुढे ठेऊन मागील काळातील लोकांचे मूल्यमापन करतात. तुकोबांच्या काळी यथा राजा तथा प्रजा हा राजधर्म होता, वर्णाश्रम हा समाजधर्म होता आणि वेदांतवाणी ही अध्यात्माची बाब हेती. तुकोबांनी आपले ध्येय, भक्तीने स्वत:चे व जगत्कल्याण साधण्याचे मानले. ते करताना हा देश सामाजिक दृष्टयाही पतित आहे हे जाणून उपदेशपर अभंगाने त्याला जागविला. प्रभूने अवतार घेऊन दुष्टाला दमन करावे ही आर्त वाणी ऐकविली.

# <u>संतवाणी : गायकांत विशेष लोकप्रिय अभंग</u>

अणुरेणियां थोकडा ।
तुका आकाशाएवढा ॥१॥

गिळुन सांडिलें कलेवर ।
भव भ्रमाचा आकार ॥२॥

सांडिली त्रिपुटी ।
दीप उजळला घटीं ॥३॥

तुका म्हणे आतां ।
उरलो उपकारापुरता ॥४॥

आनंदाचे डोही आनंदतरंग ।
आनंद चि अंग आनंदाचे ॥१॥

काय सांगो जालें कांहीचियाबाही ।
पुढें चाली नाहीं आवडीनें ॥२॥

गर्भाचे आवडी मातेचा डोहळा ।
तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥३॥

तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा ।
अनुभव सरिसा मुखा आला ॥४॥

चंदनाचे हात पाय ही चंदन ।
परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥१॥

दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार ।
सर्वांगे साकर अवघी गोड ॥२॥

तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।
पाहतां अवगुण मिळेचि ना ॥३॥

खेळ मांडीयेला वाळवंटी घाई ।
नाचती वैष्णव भाईं रे ।
क्रोध अभिमान गेला पावटणी ।
एक एका लागतील पायीं रे ॥१॥

गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा
हार मिरविती गळां ।
टाळ मृदुंग घाई पुष्प वर्षाव ।
अनुपम्य सुखसोंहळा रे ॥२॥

वर्णअभिमान विसरली याती
एकएकां लोटांगणीं जाती ।
निर्मळ चित्तें जालीं नवनीतें ।
पाषाणा पाझर सुटती रे ॥३॥

होतो जयजयकार गर्जत अंबर
मातले हे वैष्णव वीर रे ।
तुका म्हणे सोपी केली पायवाट ।
उतरावया भवसागर रे ॥४॥

उंचनिंच कांहीं नेणे भगवंत ।
तिष्ठे भाव भक्ती देखोनियां ॥१॥

दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी ।
दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ॥२॥

चर्म रंगूं लागे रोहिदासा संगे ।
कबिराचे मागे विणी शेले ॥३॥

सजनकसाया विकुं लागे मास ।
मळा सांवत्यास खुरपूं लागे ॥४॥

नरहरिसोनारा घडों फुकुं लागे ।
चोख्यामेळ्या संगे ढोरें ओढी ॥५॥

नामयाच्या जनी सवे वेची शेणी ।
धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ॥६॥

नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित ।
ज्ञानियाची भिंत अंगीं ओढी ॥७॥

अर्जुनाचीं घोडीं हाकी हा सारथी ।
भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे ॥८॥

गौळियांचे घरीं अंगे गाइ वळी ।
द्वारपाळ बळी द्वारीं जाला ॥९॥

यंकोबाचें ऋण फेडी हृषिकेशी ।
आंबऋषीचे सोशी गर्भवास ॥१०॥

मीराबाइं साठी घेतो विषप्याला ।
दामाजीचा जाला पाडेवार ॥११॥

घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची ।
हुंडी मेहत्याची अंगे भरी ॥१२॥

पुंडलिकासाठीं अजुनि तिष्ठत ।
तुका म्हणे मात धन्य त्याची ॥१३॥

कन्या सासुऱ्यासीं जाये ।
मागें परतोनी पाहे ॥१॥

तैसें जालें माझ्या जिवा
केव्हां भेटसी केशवा ॥२॥

चुकलिया माये ।
बाळ हुरुहुरु पाहे ॥३॥

जीवनावेगळी मासोळी ।
तैसा तुका तळमळी ॥४॥

काय तुझे उपकार पांडुरंगा ।
सांगो मी या जगामाजी आतां ॥१॥

जतन हें माझें करोनि संचित ।
दिलें अवचित आणूनियां ॥२॥

घडलिया दोषांचे न घाली भरी ।
आली यास थोरी कृपा देवा ॥३॥

नव्हतें ठाउकें आइकिलें नाहीं ।
न मागतां पाहीं दान दिलें ॥४॥

तुका म्हणे याच्या उपकारासाटीं ।
नाहीं माझें गाठीं कांही एंक ॥५॥

कृष्ण माझी माता, कृष्ण माझा पिता ।
बहीण, बंधू, चुलता, कृष्ण माझा ॥१॥

कृष्ण माझा गुरू, कृष्ण माझे तारूं ।
उतरी पैलपारू भवनदीचे ॥२॥

कृष्ण माझें मन, कृष्ण माझें जन ।
सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥३॥

तुका म्हणे माझा कृष्ण हा विसावा ।
वाटो ना करावा परता जीवा ॥४॥

जन विजन जालें आम्हा ।
विठ्ठलनामा प्रमाणे ॥१॥

पाहें तिकडे मायबाप ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥२॥

वन पट्टण एकभाव ।
अवघा ठाव सरता जाला ॥३॥

आठव नाहीं सुखदु:खा ।
नाचे तुका कौतुकें ॥४॥

जातो माघारी पंढरीनाथा
तुझे दर्शन झालें आता

तुझ्या नादाने पाहिली मी
ही तुझीच रे पंढरी
धन्य झालों आम्ही जन्माचे
नाम घेऊ तुझे आवडीचें

दीपवली तुझी पंढरी
चालू झाली भक्तांची वारी
तुका म्हणे भक्ती करा तुझी
जाती पापें जन्माची पळोनी

जे का रंजले गांजले ।
त्यासि म्हणे जो आपुलें ॥१॥

तो चि साधु ओळखावा ।
देव तेथें चि जाणावा ॥२॥

मृदु सबाह्य नवनीत ।
तैसे सज्जनांचे चित्त ॥३॥

ज्यासि अपंगिता नाही ।
त्यासि धरी जो हृदयी ॥४॥

दया करणें जें पुत्रासी ।
ते चि दासा आणि दासी ॥५॥

तुका म्हणे सांगू किती ।
त्या चि भगवंताच्या मूर्ति ॥६॥

तूं माझी माउली तूं माझी साउली ।
पाहतों वाटुली पांडुरंगे ॥१॥

तूं मज येकुला वडील धाकुला ।
तूं मज आपुला सोयरा जीव ॥२॥

तुका म्हणे जीव तुजपाशीं असे ।
तुजविण ओस सर्व दिशा ॥३॥

धन्य आजि दिन ।
जालें संतांचें दर्शन ॥१॥

जाली पापा-तापा तुटी ।
दैन्य गेलें उठाउठीं ॥२॥

जाले समाधान ।
पायीं विसावलें मन ॥३॥

तुका म्हणे आले घरा ।
तोचि दिवाळी दसरा ॥४॥

धन्य ती पंढरी धन्य भीमातीर ।
आणिंयेलें सार पुंडलिकें ॥१॥

धन्य तो हि लोक अवघा दैवांचा ।
सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥२॥

धन्य ते ही भूमी धन्य तरुवर ।
धन्य ते सुरवर तीर्थरूप ॥३॥

धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान ।
आनंदे भुवन गर्जतसे ॥४॥

धन्य पशु-पक्षी-कीटक-पाषाण ।
अवघा नारायण अवतरला ॥५॥

तुका म्हणे धन्य संसारातें आलीं ।
हरिरंगी रंगली सर्वभावें ॥६॥

पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।
आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥

सत्य तो ची धर्म, असत्य तें कर्म ।
आणिक हे वर्म नाहीं दुजें ॥२॥

गति ते चि मुखी नामाचें स्मरण ।
अधोगति जाण विन्मुखता ॥३॥

संतांचा संग तो चि स्वर्गवास ।
नर्क तो उदास अनर्गळ ॥४॥

तुका म्हणे उघडें आहे हित यांत
जया जें उचित करा तैसें ॥५॥

बा रे पांडुरंगा केव्हा भेट देशी ।
झालो मी परदेशी तुजविण ॥१॥

ओवाळावी काया चरणावरोनि ।
केव्हा चक्रपाणि भेटशील ॥२॥

तुका म्हणे माझी पुरवावी आवडी ।
वेगें घाली उडी नारायणा ॥३॥

बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल ।
करावा विठ्ठल जीवभाव ॥१॥

येणें सोसें मन जालें हांवभरे ।
परती माघारें घेत नाहीं ॥२॥

बंधनापासुनि उकलल्या गांठी ।
देतां आली मिठी सावकाश ॥३॥

तुका म्हणे देह भरिला विठ्ठलें ।
कामक्रोधें केलें घर रीतें ॥४॥

भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ॥१॥

पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन ।
तैसें माझें मन वाट पाहें ॥२॥

दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली ।
पाहतसे वाटुली पंढरीची ॥३॥

भुकेलिया बाळ अति शोक करी ।
वाट पाहे परि माउलीची ॥४॥

तुका म्हणे मज लागलीसे भूक ।
धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥५॥

मन हा मोगरा अर्पुनी ईश्वरा ।
पुनरपी संसारा येणे नाही ॥१॥

मन हे शेवंती देऊ भगवंती ।
पुनरपी संसृती येणे नाही ॥२॥

मन हे तुळशी देऊ हृषिकेशि ।
पुनरपी जन्मा येणे नाही ॥३॥

तुका म्हणे ऐसा जन्म दिला देवा ।
तुझा वास व्हावा वैकुंठासी ॥४॥

याजसाठी केला होता अट्टहास ।
शेवटचा दिस गोड व्हावा ॥१॥

आता निश्चितीनें पावलों विसांवा ।
खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥

कवतुक वाटे जालिया वेचाचें ।
नांव मंगळाचे तेणें गुणें ॥३॥

तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी ।
आतां दिवस चारी खेळीमेळी ॥४॥

राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठी वैजयंती ॥२॥

मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें ।
सुखाचें ओतलें सकळ ही ॥३॥

कासे सोनसळा पांघरे पांटोळा ।
घननीळ सांवळा बाइयांनो ॥४॥

सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा ।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥५॥

रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ।
अंतर्बाह्य जग आणि मन ॥१॥

जिवाही अगोज पडती आघात ।
येऊनिया नित्य नित्य करि ॥२॥

तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे ।
अवघीयांचे काळे केले तोंड ॥३॥

लहानपण दे गा देवा ।
मुंगी साखरेचा रवा ॥१॥

ऐरावत रत्न थोर ।
त्यासी अंकुशाचा मार ॥२॥

जया अंगी मोठेपण ।
तया यातना कठीण ॥३॥

तुका म्हणे बरवे जाण ।
व्हावे लहानाहून लहान ॥४॥

महापूरे झाडे जाती ।
तेथे लव्हाळ वाचती ॥५॥

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें ।
पक्षी ही सुस्वरें आळविती ॥१॥

येणें सुखें रुचे एकांताचा वास ।
नाही गुण दोष अंगा येत ॥२॥

आकाश मंडप पृथुवी आसन ।
रमे तेथें मन क्रीडा करी ॥३॥

कंथाकुमंडलु देहउपचारा ।
जाणवितो वारा अवसरु ॥४॥

हरिकथा भोजन परवडी विस्तार ।
करोनि प्रकार सेवूं रुची ॥५॥

तुका म्हणे होय मनासी संवाद ।
आपुला चि वाद आपणांसी ॥६॥

आम्हां घरीं धन शब्दाचींच रत्नें ।
शब्दाचींच शस्त्रें यत्ने करूं ॥१॥

शब्द चि आमुच्या जिवाचें जीवन ।
शब्दें वांटूं धन जनलोकां ॥२॥

तुका म्हणे पहा शब्द चि हा देव ।
शब्दें चि गौरव पूजा करूं ॥३॥

आतां कोठें धांवे मन ।
तुझे चरण देखिलिया ॥१॥

भाग गेला सीण गेला ।
अवघा जाला आनंद ॥२॥

प्रेमरसें बैसली मिठी ।
आवडी लाठी मुखाशी ॥३॥

तुका म्हणे आम्हां जोगें ।
विठ्ठला घोगें खरें माप ॥४॥

अवघा तो शकुन ।
हृदयीं देवाचे चिंतन ॥१॥

येथें नसतां वियोग ।
लाभा उणें काय मग ॥२॥

छंद हरिच्या नामाचा ।
शुचिर्भूत सदा वाचा ॥३॥

तुका म्हणे हरिच्या दासां ।
शुभकाळ अवघ्या दिशा ॥४॥

अमृताचीं फळें अमृताची वेली ।
ते चि पुढें चाली बीजाची ही ॥१॥

ऐसियांचा संग देइ नारायणा ।
बोलावा वचना जयांचिया ॥२॥

उत्तम सेवन सितळ कंठासी ।
पुष्टी कांती तैसी दिसे वरी ॥३॥

तुका म्हणे तैसें होइजेत संगें ।
वास लागे अंगें चंदनाच्या ॥४॥

ज्ञानियांचा राजा गुरू महाराव ।
म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें ॥१॥

मज पामरासी काय थोरपण ।
पायींची वहाण पायीं बरी ॥२॥

ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळगणे ।
इतर तुळणें काय पुढे ॥३॥

तुका म्हणे नेणे युक्तीचिया खोलीं ।
म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥४॥

अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥

ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव ।
ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥३॥

उशीर तो आतां न पाहिजे केला ।
अहो जी विठ्ठला मायबापा ॥४॥

उरलें तें एक हें चि मज आतां ।
अवघें विचारितां शून्य जालें ॥५॥

तुका म्हणे आतां करीं कृपा दान ।
पाऊलें समान दावीं डोळां ॥६॥

हें चि दान देगा देवा ।
तुझा विसर न व्हावा ॥१॥

गुण गाईन आवडी ।
हे चि माझी सर्व जोडी ॥२॥

नलगे मुक्ति आणि संपदा ।
संतसंग देई सदा ॥३॥

तुका म्हणे गर्भवासी ।
सुखें घालावें आम्हांसी ॥४॥

आम्ही जातो आपुल्या गावा ।
आमचा राम राम घ्यावा ॥१॥

तुमची आमची हे चि भेटी ।
येथुनियां जन्मतुटी ॥२॥

आतां असों द्यावी दया ।
तुमच्या लागतसें पायां ॥३॥

येतां निजधामीं कोणी ।
विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥४॥

रामकृष्ण मुखी बोला ।
तुका जातो वैकुंठाला ॥५॥

मंगलाचरण - अभंग ६

१

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥

आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥

ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ॥२॥

तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥३॥

२

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥१॥

तुळसीचे हार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥

मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥२॥

तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३॥

३

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

विठो माउलिये हा चि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥२॥

तुका म्हणे कांहीं न मागे आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥३॥

४

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥

मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळ ही ॥२॥

कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयानो ॥३॥

सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥४॥

५

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥

ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥धृ.॥

कटीं पीतांबर कास मिरवली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥२॥

गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवें मानसीं तें चि रूप ॥३॥

झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ॥४॥

तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ॥५॥

६

गरुडाचें वारिकें कासे पीतांबर । सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा । वैजयंतीमाळा गळां शोभे ॥धृ.॥

मुगुट माथां कोटि सूर्यांचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥२॥

ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥३॥

उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ॥४॥

तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा । तो चि माझा सखा पांडुरंग ॥५॥

विराण्या - अभंग २५

७

वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे जालों तुका हरिरता ॥३॥

८

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥

नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ॥३॥

९

हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥

घररिघी जालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रम्ह ॥२॥

बळियाचा अंगसंग जाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥३॥

१०

नाहीं काम माझें काज तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥

व्यभिचार माझा पडिला ठाउका । न सर ती लोकांमाजी जालें ॥२॥

न धरावा लोभ कांहीं मजविशीं । जालें देवपिशी तुका म्हणे ॥३॥

११

विसरले कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ॥१॥

सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥२॥

मज आतां कोणी आळवाल झणी । तुका म्हणे कानीं बहिरी जालें ॥३॥

१२

न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥

आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥३॥

१३

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥

तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ॥३॥

१४

क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥१॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥

तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥३॥

१५

आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥

फावला एकांत एकविध भाव । हरि आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥

तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ॥३॥

१६

सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥

याचसाठी सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ॥२॥

तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥३॥

१७

एका जिवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥

नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

तुका म्हणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥३॥

१८

हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥

सेवासुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥२॥

तुका म्हणे आम्ही जालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥३॥

१९

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ॥१॥

न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥२॥

तुका म्हणे जालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ॥३॥

२०

शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥१॥

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥२॥

तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥३॥

२१

सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥

जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

तुका म्हणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥३॥

२२

आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥३॥

२३

सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥

सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥

न व्हावी ते जाली आमुची भंडाई । तुका म्हणे काई लाजों आतां ॥३॥

२४

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥

आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥

तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी । कैसे संग सरी तुम्हां आम्हां ॥३॥

२५

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥१॥

संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ॥२॥

तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपासोई ॥३॥

२६

अइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ॥१॥

नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥३॥

२७

आहांच वाहांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैशा ॥१॥

भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥

तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ॥३॥

२८

बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥

विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥

तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥३॥

२९

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥

मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥३॥

३०

न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥१॥

मानेल त्या तुम्ही अइका स्वभावें । मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥२॥

तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गती जाली आतां ॥३॥

३१

न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । म्हणउनी लाज सांडियेली ॥१॥

आतां तुम्हां पुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥२॥

तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ॥३॥

॥२५॥

३२

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥

नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु.॥

देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥

तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥३॥

३३

सावध जालों सावध जालों । हरिच्या आलों जागरणा ॥१॥

तेथें वैष्णवांचे भार । जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥

पळोनियां गेली झोप । होतें पाप आड तें ॥२॥

तुका म्हणे त्या ठाया । ओल छाया कृपेची ॥३॥

३४

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥१॥

कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयाचा हरिख वाटे देवा ॥ध्रु.॥

गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ॥२॥

तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥३॥

३५

अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥१॥

देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥ध्रु.॥

आपुल्या वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥२॥

तुका म्हणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥३॥

३६

सुखें वोळंब दावी गोहा । माझें दुःख नेणा पाहा ॥१॥

आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा म्हणे भिडा ॥ध्रु.॥

निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ॥२॥

गेले वारीं तुम्हीं आणिली साकर । सातदी गेली साडेदहा शेर ॥३॥

अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साकर तूप पथ्या ॥४॥

दो पाहरा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सुपती ॥५॥

नीज नये घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥६॥

अंगी चंदन लावितें भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥७॥

हाड गळोनि आलें मास । माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ॥८॥

तुका म्हणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका नेला ॥९॥

३७

पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥१॥

जेथें तेथें तुझीं च पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥धृ.॥

भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशीं देऊं ॥२॥

तुका म्हणे अणु तुजविण नाहीं । नभाहूनि पाहीं वाढ आहे ॥३॥

३८

वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ॥१॥

अमुप हे गांठीं बांधूं भांडवल । अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ॥धृ.॥

अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥२॥

जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥३॥

गेले पुढें त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ॥४॥

तुका म्हणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥५॥

३९

जेविले ते संत मागें उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥१॥

सोवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा । पासूनि सकळां अवघ्यां दुरीं ॥धृ.॥

परें परतें मज न लागे सांगावें । हें तों देवें बरें शिकविलें ॥२॥

दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत । जाणोनि संकेत उभा असे ॥३॥

येथें कोणीं कांहीं न धरावी शंका । मज चाड एका भोजनाची ॥४॥

लांचावला तुका मारितसे झड । पुरविलें कोड नारायणें ॥५॥

४०

देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥

ब्रम्हादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रम्हरसीं ॥ध्रु.॥

अवघियां पुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥२॥

इच्छादानी येथें वळला समर्थ । अवघें चि आर्त पुरवितो ॥३॥

सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळीं । पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ॥४॥

तुका म्हणे पाक लक्ष्मुमीच्या हातें । कामारीसांगातें निरुपम ॥५॥

४१

अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजीती ॥१॥

नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ॥ध्रु.॥

विष तांब्या वाटी । भरली लावूं नये होटीं ॥२॥

तुका म्हणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ॥३॥

४२

हरीच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥१॥

कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेचे फुकासाटीं ॥२॥

ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥२॥

तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ॥३॥

४३

धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥१॥

मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥ध्रु.॥

करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥२॥

जिवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ॥३॥

४४

ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे । बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥

कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । जाला पद्मनाभ सेवाॠणी ॥ध्रु.॥

कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावे ॥२॥

बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥३॥

हरि नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ॥४॥

तुका म्हणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहों ॥५॥

४५

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥ आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥१॥

इतुलें जाणावया जाणा । कोंडें तरी मनें मना ॥ पारधीच्या खुणा । जाणतें चि साधावे ॥ध्रु.॥

देह आधीं काय खरा । देहसंबंधपसारा ॥ बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥२॥

तुका करी जागा । नको चाचपूं वाउगा ॥ आहेसि तूं आगा । अंगीं डोळे उघडी ॥३॥

४६

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥

अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ध्रु.॥

कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥२॥

तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥३॥

४७

आम्ही जरी आस । जालों टाकोनि उदास ॥१॥

आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥धृ.॥

भलते ठायीं पडों । देह तुरंगीं हा चढो ॥२॥

तुमचें तुम्हांपासीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ॥३॥

गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ॥४॥

तुका म्हणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ॥५॥

४८

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥१॥

मज हें ही नाहीं तें ही नाहीं । वेगळा दोहीं पासुनी ॥धृ.॥

देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥२॥

अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुक्याचें ॥३॥

४९

जन विजन जालें आम्हां । विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥

पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ॥धृ.॥

वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता जाला ॥२॥

आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ॥३॥

५०

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥१॥

तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥धृ.॥

मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥२॥

तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥३॥

५१

आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥

ऐसा संताचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

तीर्थे पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥२॥

तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥३॥

५२

माझिया मीपणा । जाला यावरी उगाणा ॥१॥

भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥ध्रु.॥

टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ॥२॥

यावें कामावरी । तुका म्हणे नाहीं उरी ॥३॥

५३

सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ॥

निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥१॥

मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें॥

तीर्थांसी तीर्थ जाला तो चि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ध्रु.॥

मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ॥

हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥२॥

तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥

तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥३॥

५४

आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥१॥

म्हणउनी पाठी लागतील भूतें । येती गवसीत पांचजणें ॥ध्रु.॥

ज्याचे त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ॥२॥

तुका म्हणे काळें चेंपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ॥३॥

५५

महारासि सिवे । कोपे ब्राम्हण तो नव्हे ॥१॥

तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ध्रु.॥

नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥२॥

ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या याती ॥३॥

५६

तेलनीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥१॥

आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ध्रु.॥

नावडे लोकां टाकिला गोहो । बोडिले डोकें सांडिला मोहो ॥२॥

शेजारणीच्या गेली रागें । कुत्र्यांनी घर भरिलें मागें ॥३॥

पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणे फार ॥४॥

तुका म्हणे वांच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥५॥

५७

मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा ॥१॥

मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥ध्रु.॥

नीचवृत्तिकाम । परी मुखीं तुझें नाम ॥२॥

तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेचावे ॥३॥

५८

सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥१॥

त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ॥ध्रु.॥

कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥२॥

नेणे शब्द पर । तुका म्हणे परउपकार ॥३॥

५९

जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥१॥

त्याचें वय नित्य काळ लेखीताहे । रागें दात खाय कराकरा ॥ध्रु.॥

जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणां ॥२॥

जये कुळीं नाहीं एक ही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीतापा ॥३॥

विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें ॥४॥

तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया ॥५॥

६०

आम्ही सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ॥ जाऊं पुडी भिकें । कुतरीं घर राखती ॥१॥

नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ॥ थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ध्रु.॥

अक्षय साचार । केलें सायासांनी घर ॥ एरंडसिंवार । दुजा भार न साहती ॥२॥

धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी ॥ जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥३॥

जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती ॥ झळझळीत भिंती । वृंदावनें तुळसीचीं ॥४॥

तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा ॥ कुटुंबाची सेवा । तो चि करी आमुच्या ॥५॥

६१

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥१॥

न करितां परनिंदा द्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ध्रु.॥

बैसलिये ठायी म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥२॥

संताचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥३॥

खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥४॥

तुका म्हणे देव जोडे याचसाटीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ॥५॥

६२

शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥१॥

मुखीं अमृताची वाणी । देह वेचावा कारणीं ॥ध्रु.॥

सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥२॥

तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥३॥

६३

चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ॥१॥

बहु खोटा अतिशय । जाणां भले सांगों काय ॥ध्रु.॥

मनाच्या तळमळें । चंदनें ही अंग पोळे ॥२॥

तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा ॥३॥

६४

परिमळ म्हणूनी चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें ॥१॥

मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ॥२॥

कर्मफळ म्हणुनी इच्छूं नये काम । तुका म्हणे वर्म दावूं लोकां ॥३॥

६५

माया तें चि ब्रम्ह ब्रम्ह तेंचि माया । अंग आणि छाया तया परी ॥१॥

तोडितां न तुटे सारितां निराळी । लोटांगणांतळीं हारपते ॥ध्रु.॥

दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणिक ते आटी विचाराची ॥२॥

तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ॥३॥

६६

दुर्जनासि करी साहे । तो ही दंड हे लाहे ॥१॥

शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥ध्रु.॥

येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ॥२॥

तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥३॥

६७

वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥

भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥२॥

तुका म्हणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥३॥

६८

पवित्र सोंवळीं । एक तीं च भूमंडळीं ॥१॥

ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

तीं च भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥२॥

तुका म्हणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ॥३॥

६९

आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥१॥

करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ध्रु.॥

भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥२॥

तुका म्हणे विषें । अन्न नाशियलें जैसें ॥३॥

७०

ढेकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥१॥

हे ही बोल ते ही बोल । कोरडे फोल रुचीविण ॥ध्रु.॥

गव्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ॥२॥

तुकां म्हणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥३॥

७१

करावी ते पूजा मनें चि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥१॥

कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु.॥

अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥२॥

तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥३॥

७२

एकादशीव्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणों ॥१॥

काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ध्रु.॥

हरिहरां नाहीं बोटभरी वाती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥२॥

तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होइल नेणों ॥३॥

७३

नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हा चि धंदा ॥१॥

देवधर्म सांदीं पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥ध्रु. ॥

रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ॥२॥

तुका म्हणे आत्महत्या रे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥३॥

७४

स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१॥

भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु.॥

अपूज्य लिंग तेथें अतित न घे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥२॥

तुका म्हणे नाहीं ठावी स्थिति मती । यमाची निश्चिती कुळवाडी ॥३॥

७५

आहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र जाला ॥१॥

गळे चि ना गर्भ नव्हे चि कां वांज । माता त्याची लाजलावा पापी ॥ध्रु. ॥

परपीडें परद्वारीं सावधान । सादर चि मन अभाग्याचें ॥२॥

न मळितां निंदा चाहडी उपवास । संग्रहाचे दोष सकळ ही ॥३॥

परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें कीडें दुग्धीं मरे ॥४॥

तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥५॥

७६

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥१॥

नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ध्रु. ॥

माणसांसि भुंके । विजातीनें द्यावे थुंके ॥२॥

तुका म्हणे चित्त । मळिण करा तें फजित ॥३॥

७७

देखोनि हरखली अंड । पुत्र जाला म्हणे रांड ॥ तंव तो जाला भांड । चाहाड चोर शिंदळ ॥१॥

जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका ॥ थोर जाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ध्रु.॥

भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ॥ निष्टुर उत्तरें । पापदृष्टी मळिणचित्त ॥२॥

दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ ॥ तुका म्हणे खळ । म्हणोनियां निषद्धि तो ॥३॥

७८

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ॥१॥

नेणें राग वेळ काळ घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥२॥

तुका म्हणे मज चाड नाहीं जना । तुज नारायणा वांचूनिया ॥३॥

७९

माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥१॥

तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥ध्रु.॥

उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥२॥

तुका म्हणे बाहेरमुदी । आहा च गोविंदीं न सरती ॥३॥

८०

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥१॥

काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ॥धु.॥

काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असें तें आपुलें ते ते ठायीं ॥२॥

तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥३॥

८१

योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥१॥

अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ॥ध्रु.॥

मिरासीचें म्हूण सेत । नाहीं देत पीक उगें ॥२॥

तुका म्हणे उचित जाणां । उगीं सिणा काशाला ॥३॥

८२

न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥

तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥

न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ॥२॥

तुका म्हणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥३॥

८३

बाईल सवासिण आई । आपण पितरांचे ठायीं ॥१॥

थोर वेच जाला नष्टा । अवघ्या अपसव्य चेष्टा ॥ध्रु.॥

विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ॥२॥

तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥३॥

८४

दानें कांपे हात । नाव तेविशीं मात ॥१॥

कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ध्रु.॥

न वजती पाप । तीर्था म्हणे वेचूं काय ॥२॥

तुका म्हणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥३॥

८५

वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥१॥

निवे भावाच्या उत्तरीं । भलते एके धणी वरी ॥ध्रु.॥

न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ॥२॥

सांडी थोरपणा । तुका म्हणे सर्वे दीना ॥३॥

८६

मैत्र केले महा बळी । कामा न येती अंतकाळीं ॥१॥

आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ध्रु.॥

नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥२॥

धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥३॥

कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥४॥

तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ॥५॥

तुका म्हणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ॥६॥

८७

कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ॥१॥

तैसें मज नको करूं कमळापति । देई या संगति सज्जनांची ॥ध्रु.॥

तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण जाली आतां ॥२॥

तुका म्हणे येर येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे सीण सुखा पोटीं ॥३॥

८८

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥१॥

धरीं धरीं आठवण । मानीं संताचें वचन ॥ध्रु.॥

नेलें रात्रीनें तें अर्धें । बाळपण जराव्याधें ॥२॥

तुका म्हणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा ॥३॥

८९

बोलायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ॥१॥

जया घडली संतनिंदा । तुज विसरूनि गोविंदा ॥धृ.॥

जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥२॥

तुका म्हणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥३॥

९०

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥

कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥धृ.॥

मानदंभासाठीं । केली अक्षरांची आटी ॥२॥

तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ॥३॥

वांटिलें तें धन । केली अहंता जतन ॥४॥

तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघा चि अधर्म ॥५॥

९१

संवसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥१॥

म्हणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥धृ.॥

बहुतां जन्मींचा जालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥२॥

वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥३॥

बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस जालों कासाविस ॥४॥

तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥५॥

९२

भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ॥१॥

मागें काय जाणों अइकिली वार्त्ता । कबिर सातें जातां घडिया वांटी ॥धृ.॥

माघारिया धन आणिलें घरासि । न घे केला त्यासि त्याग तेणें ॥२॥

नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ॥३॥

प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋण फेडियेलें ॥४॥

बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥५॥

तुका म्हणे नाहीं जयासि निर्धार । नाडला साचार तो चि एक ॥६॥

९३

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥१॥

ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगीं च अधर्म ॥ध्रु.॥

देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ॥२॥

तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचारावा पोटीं ॥३॥

९४

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । ध्यान धरी मत्स्या जैसें ॥१॥

टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदि जगीं फांसे जैसे ॥ध्रु.॥

ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥२॥

खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तया साठीं ॥३॥

तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंगा ॥४॥

९५

गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ॥१॥

मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥ध्रु.॥

भंगलिया चित्ता । न ये काशानें सांदितां ॥२॥

तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ॥३॥

९६

युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥१॥

कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देइल भेटी ॥ध्रु.॥

न लगे हा लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥२॥

तुका म्हणे मज आणि उपाव । दिसती ते वाव नामाविण ॥३॥

९७

कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥१॥

हो का नर अथवा नारी । रांड तयें नावें खरी ॥ध्रु.॥

नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥२॥

वाळियेली संतीं । केली बोडोनि फजिती ॥३॥

तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥४॥

९८

माया ब्रम्ह ऐसें म्हणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ॥१॥

विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ध्रु.॥

करुनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतित्याई दुःख पावे ॥२॥

औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥३॥

तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा त्यांचीं ॥४॥

तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायणभेट तयां ॥५॥

९९

मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी ॥१॥

जाणोन कां करा आपुलाले घात । विचारा रे हित लवलाहीं ॥ध्रु.॥

संचित सांगातीं बोळवणें सवें । आचरलें द्यावें फळ तेणें ॥२॥

तुका म्हणे शेखी श्मशान तोंवरी । संबंध गोवरी अंगीं सवें ॥३॥

१००

गौळीयाची ताकपिरें । कोण पोरें चांगलीं ॥१॥

येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ॥ध्रु.॥

काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ॥२॥

तुका म्हणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥३॥

१०१

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥१॥

सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ध्रु.॥

हित तें करावे देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥२॥

तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥३॥

१०२

भक्ताविण देवा । कैंचें रूप घडे सेवा ॥१॥

शोभविलें येर येरां । सोनें एके ठायीं हिरा ॥ध्रु.॥

देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ॥२॥

तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ॥३॥

१०३

विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ॥१॥

ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥ध्रु.॥

निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥२॥

तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥३॥

१०४

काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥१॥

कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ॥ध्रु.॥

आडविलें दासीं । तरि कां मरती उपवासी ॥२॥

तुका म्हणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥३॥

१०५

जेवितां ही घरी । नाक हागतिया परी ॥१॥

ऐसियाचा करी चाळा । आपुली च अवकळा ॥ध्रु.॥

सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥२॥

तुका म्हणे करी । ताका दुधा एक सरी ॥३॥

१०६

हो का पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥१॥

कळों आलें खट्याळसें । शिवों नये लिंपों दोषें ॥धृ.॥

फोडावें मडकें । मेलें लेखीं घायें एकें ॥२॥

तुका म्हणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ॥३॥

१०७

व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥१॥

कासया पाल्हाळ आणिकांचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ॥धृ.॥

कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥२॥

तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥३॥

१०८

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥

येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥धृ.॥

प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥२॥

तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥३॥

१०९

मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ॥१॥

हें चि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥धृ.॥

शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥२॥

आली ऊर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ॥३॥

११०

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥१॥

हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥धृ.॥

अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ॥२॥

तुका म्हणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ॥३॥

१११

आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ॥ तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटासि ॥१॥

मनुष्यदेहा ऐसा निध । साधिली ते साधे सिद्ध ॥ करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥धृ.॥

नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं ॥ कट धरूनियां करीं । उभाउभी पालवी ॥२॥

तुका म्हणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी ॥ होतो उठाउठी । लवकरी च उतार ॥३॥

११२

न करीं रे संग राहें रे निश्चळ । लागों नेदीं मळ ममतेचा ॥१॥

या नांवें अद्वैत खरें ब्रम्हज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ॥धृ.॥

इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पा ही न ये वरी मन ॥२॥

तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ॥३॥

११३

पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥१॥

ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥धृ.॥

आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ॥२॥

तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥३॥

११४

तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥१॥

मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥धृ.॥

तिर्थी भाव फळे । येथें आनाड तें वळे ॥२॥

तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥३॥

११५

घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ॥१॥

भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ध्रु.॥

अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥२॥

तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥३॥

११६

देखोनि पुराणिकांची दाढी । रडे स्फुंदे नाक ओढी ॥१॥

प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥ध्रु.॥

आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥२॥

बोलों नयें मुखावाटां । म्हणे होतां ब्यांचा तोटा ॥३॥

दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥४॥

मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥५॥

होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥६॥

तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥७॥

११७

दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥१॥

अइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ॥ध्रु.॥

दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥२॥

दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धांवे श्वान ॥३॥

दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥४॥

तुका म्हणे किती सांगावें पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ॥५॥

११८

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज तो ॥१॥

वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ॥ध्रु.॥

तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥२॥

११९

शब्दा नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥१॥

त्याचें न व्हावे दर्शन । खळा पंगती भोजन ॥ध्रु.॥

संतास जो निंदी । अधम लोभासाठीं वंदी ॥२॥

तुका म्हणे पोटीं । भाव अणीक जया होटीं ॥३॥

१२०

चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ॥१॥

शिंदळीच्या मागें वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ध्रु.॥

तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता । म्हणऊनि चिंता उपजली ॥२॥

१२१

मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ॥१॥

म्हणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ध्रु.॥

समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥२॥

तुका म्हणे खरा । येथूनिया दूर करा ॥३॥

१२२

कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तो श्वान ॥ वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥१॥

त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ॥ जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥ध्रु.॥

अखंड अशुभ वाणी । खरें न बोले स्वप्नीं ॥ पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ॥२॥

पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ॥ पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥३॥

कांहीं संतांचे पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥ यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥४॥

तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥५॥

१२३

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥१॥

गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ॥२॥

आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका म्हणे जाती नरकामधीं ॥३॥

१२४

हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥१॥

एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ध्रु.॥

भेदकासी नाड । एक वेलांटी च आड ॥२॥

उजवें वामांग । तुका म्हणे एक चि अंग ॥३॥

१२५

वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । श्रोता यति जाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥१॥

शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्माचें पाळण । सकळीं सत्य करावें ॥ध्रु.॥

पट्ट पुत्र सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥२॥

वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें । सोनियाचीं परी तीं नीच ॥३॥

सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण । जयाचें कारण । तया ठायीं अळंकार ॥४॥

सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण । तुम्ही संत तदर्थी ॥५॥

१२६

घरीं रांडा पोरें मरती उपवासीं । सांगे लोकांपासीं थोरपण ॥१॥

नेऊनियां घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकावूनि ॥२॥

तुका म्हणे आम्ही जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसे नहों ॥३॥

जोहार - अभंग ३

१२७

मायबाप जोहार । सारा साधावया आलों वेसकर ॥१॥

मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ध्रु.॥

फांकुं नका रुजू जालिया वांचून । सांगा जी कोण घरीं तीं धण्या ॥२॥

आजि मायबाप करा तडामोडी । उद्यां कोणी घडी राहेना हो ॥३॥

तुका म्हणे कांहीं न चले ते बोली । अखरते सालीं झाडा घेती ॥४॥

१२८

येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ॥१॥

जों यावें तों हात चि रिता नाहीं । कधीं तरीं कांहीं द्यावें घ्यावें ॥२॥

तुका म्हणे उद्यां लावीन म्हनेरा । जे हे दारोदारांभोंवतीं फिरा ॥३॥

१२९

देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ॥१॥

धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ॥ध्रु.॥

वघियांचे अवघें नेलें । काहीं ठेविलें नाहीं मागें ॥२॥

सोंग संपादुनि दाविला भाव । गेला आधीं माव वरि होती ॥३॥

घराकडे पाहूं नयेसें जालें । अमानत केलें दिवाणांत ॥४॥

आतां तुका कोणा न लगे चि हातीं । जाली ते निश्चिती बोलों नये ॥५॥

॥३॥

१३०

शुकसनकादिकीं उभारिला बाहो । परिक्षितीला हो दिसां सातां ॥१॥

उठाउठी करी स्मरणाचा धांवा । धरवत देवा नाहीं धीर ॥ध्रु.॥

त्वरा जाली गरुड टाकियेला मागें । द्रौपदीच्या लागें नारायणें ॥२॥

तुका म्हणे करी बहु च तांतडी । प्रेमाची आवडी लोभ फार ॥३॥

१३१

बोललों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥१॥

वाट दावी तया न लगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥ध्रु.॥

निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां वरि आंत चरे ॥२॥

तुका म्हणे हित देखण्यासि कळे । पडती आंधळे कूपा माजी ॥३॥

१३२

माकडें मुठीं धरिलें फुटाणे । गुंतले ते नेणे हात तेथें ॥१॥

काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणे काय आपुलें तें ॥ध्रु.॥

शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥२॥

तुका म्हणे एक ऐसे पशुजीव । न चले उपाव कांहीं तेथें ॥३॥

१३३

हरि तूं निष्ठ निर्गुण । नाहीं माया बहु कठिण । नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥१॥

घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व । पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं ॥ध्रु.॥

नळा दमयंतीचा योग । बिघडिला त्यांचा संग । ऐसें जाणे जग । पुराणें ही बोलती ॥२॥

राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दया भूतीं । तुळविलें अंतीं । तुळें मास तयाचें ॥३॥

कर्ण भिडता समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं । मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे ॥४॥

बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर । करूनि काहार । तो पाताळीं घातला ॥५॥

श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी । मारविलें करीं । त्याचें बाळ त्याहातीं ॥६॥

तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति । ठाव नाहीं पुढती । तुका म्हणे करिसी तें ॥७॥

१३४

चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥१॥

तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ॥ध्रु.॥

पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ॥२॥

केलीं मागें नको राहों । तुज जमान आम्ही आहों ॥३॥

करीं तुज जीं करवती । आणिक नामें घेऊं किती ॥४॥

तुका म्हणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ॥५॥

१३५

बाळ बापा म्हणे काका । तरी तो कां निपराध ॥१॥

जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥ध्रु.॥

साकरेसि म्हणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ॥२॥

तुका म्हणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ॥३॥

१३६

चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥१॥

प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥२॥

तुका म्हणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥३॥

१३७

काय कशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ॥१॥

अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ॥ध्रु.॥

काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥२॥

तुका म्हणे प्रेमें विण । बोले भुंके अवघा शीण ॥३॥

१३८

शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंभे ॥१॥

दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो म्हणे इतर लोक तैसे ॥२॥

तुका म्हणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥३॥

काला चेंडुफळी - अभंग १००

१३९

झेला रे झेला वरचेवर झेला । हातिचें गमावी तो पाठीं साहे टोला ॥१॥

त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ध्रु.॥

आगळा होऊनि धरी वरिचिया वरी । चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझारीं ॥२॥

हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनि ॥३॥

डाई पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवता ही उभा फेर ॥४॥

तुका म्हणे सुख पाहे तयाचें आगळें । जिंकी तो हरवी कोणी एका तरी काळें ॥५॥

१४०

अझुनि कां थीर पोरा न म्हणसी किर । धरुनियां धीर लाजे बुर निघाला ॥१॥

मोकळा होतासि कां रे पडिलासि डाई । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं ॥ध्रु.॥

मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं ॥२॥

तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥३॥

सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ॥४॥

तुका म्हणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥५॥

कोडें - अभंग २

१४१

कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ॥१॥

पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई । रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई ॥ध्रु.॥

सांगतों हें मूळ काहीं न धरावी खंती । ज्यालें ज्यवो मेलें मरो प्रारब्धा हातीं ॥२॥

तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं । नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी ॥३॥

१४२

नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालुनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ॥१॥

आतां कांहीं नाहीं राहिलें । म्यां आपणा आपण पाहिलें ॥ध्रु.॥

कमाईस मोल येथें नका रीस मानू। निवडूं नये मज कोणा येथें वानूं ॥२॥

तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥३॥

१४३

हारस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥१॥

पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित । होईल करीत । आला अधिकारी तो ॥ध्रु.॥

काय पाहातां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई । पोटभरी कांहीं । घेतां उरी कांहीं ठेवा ॥२॥

जें सुख दृष्टी आहे । तें च अंतरीं जो लाहे । तुका म्हणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥३॥

१४४

अवघे गोपाळ म्हणती या रे करूं काला । काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला ।

नका कांहीं मागें पुढें रे ठेवूं खरें च बोला । वंची वंचला तो चि रे येथें भोवंडा त्याला ॥१॥

घेतल्या वांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एकां एक ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं ।

ताक सांडी येर येर रे काला भात भाकरी दहीं । आलें घेतो मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ॥ध्रु.॥

एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनि मोटा । एक सोडितील गाठी रे एक चालती वाटा ।

एक उभा भार वाहोनि पाहे उगाचि खोटा । एक ते करूनि आराले आतां ऐसें चि घाटा ॥२॥

एकीं स्थिराविल्या गाई रे एक वळत्या देती । एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती ।

एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला म्हणती एक हुंबरी घेती ॥३॥

एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें ।

गांठीचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी वोढी रे भार वाहातां मेलें ॥४॥

एक ते माया गुंतले घरीं बहुत काम । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहीं च ठावें ।

जैसें होतें शिळे संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेचुनि मग पडिलें ठावें ॥५॥

एकीं हातीं पायीं पटे रे अंगीं लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा ।

एक ते आळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा । सिदोरी वांचून बुद्धि रे केला अवघ्यां वाखा ॥६॥

तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनि द्यावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघें चि ठावें ।

मोकलितां तुम्ही शरण आम्ही कवणासि जावें । कृपावंते कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥७॥

१४५

बैसवुनि फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥१॥

पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥ध्रु.॥

बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥२॥

तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥३॥

१४६

आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारीसें । कान्होबाचे अंतरीं ॥१॥

पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ध्रु.॥

खेळ खेळे न पडे डाईं । ज्याचा भार त्याच्या ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगवीती ॥२॥

तुका म्हणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्यांचें बळ । त्यांसि तैसा विभाग ॥३॥

१४७

काम सारूनि सकळ । आले अवघे गोपाळ । जाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ॥१॥

देती आपुलाला झाडा । गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ॥धृ.॥

आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनियां गोडी । हरि मेळवी त्यांत तें ॥२॥

भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली जों मांदी । सकाळांचे संदी । वोझीं अवघीं उतरलीं ॥३॥

मागे जो तांतडी । त्यासि रागा येती गडी । तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥४॥

एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रम्हानंदें । तुका म्हणे पदें । या रे वंदूं हरीचीं ॥५॥

१४८

यमुनें पाबळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ।

अवघें एके ठायीं । करूनि स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तें ही । तुम्हामाजी देतों ॥१॥

म्हणती बरवें गोपाळ । म्हणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंदें ।

खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥धृ.॥

एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळा पांवे तया सुख । अधिक चि वाटे ।

म्हणती गोड जालें । म्हणती गोड जालें । आणिक देई । नाहीं पोट धालें ॥२॥

हात नेतो मुखापासीं । एर आशा तोंड वासी । खाय आपण तयासी । दावी वांकुलिया ।

देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं । धरूनि काढितील ओठीं । मुखामाजी खाती ॥३॥

म्हणती ठकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा । दुम करितो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या ।

अवघियांचे खाय । कवळ कृष्णा माझी माय । सुरवर म्हणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥४॥

एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न साहवे हरि । म्हणे पुरे आतां ।

येतो काकुलती । गोळा न साहवे श्रीपती । म्हणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥५॥

आनंदाचे फेरी । माजी घालुनियां हरी । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवे ।

वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ॥६॥

करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरी वाटतसे सुख । खदखदां हांसे ।

एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें ॥७॥

नाहीं ज्याची गेली भुक । त्याचें पसरवितो मुख । अवघियां देतो सुख । सारिखें चि हरी ।

म्हणती भला भला हरी । तुझी संगती रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥८॥

गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । जालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ।

देव पाहाती सकळ । मुखें घोटूनियां लाळ । धन्य म्हणती गोपाळ । धिग जालों आम्ही ॥९॥

म्हणती कैसें करावें । म्हणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया ।

सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट । तंव अधिक ची होंट । मटमटां वाजवी ॥१०॥

आनंदें सहित । क्रीडा करी गोपीनाथ । म्हणती यमुनेंत हात । नका धुऊं कोणी ।

म्हणती जाणे जीवीचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष कृष्णाचें । लाभ थोरिवे ॥११॥

धन्य दिवस काळ । आजी पावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझिया नि हातें ।

मानवले गडी । एक एकांचे आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥१२॥

तुझा संग बरवा । नित्य आम्हां द्यावा । ऐसें करूनि जीवा । नित्य देवा चालावें ।

तंव म्हणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी । आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥१३॥

तुका म्हणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली । गाई गोपाळांसि केली । आपण यांसरी ।

आजि जाला आनंद । आजि जाला आनंद । चाले परमानंद । सवें आम्हांसहित ॥१४॥

१४९

या हो या चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ॥१॥

वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त जालें चंचळ ॥धृ.॥

उरलें तें सांडा काम नका करूं गोवी । हे चि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥२॥

निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ॥३॥

कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन जालें उदास ॥४॥

एकाएकीं चालियेल्या सादावीत सवें । तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ॥५॥

फुगड्या - अभंग २

१५०

फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनि एक एकी पाहे ॥१॥

फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥धृ.॥

मागें जें शिकली होतीस पोटीं । तें चि विचारूनि आतां उच्चारी ओठीं ॥२॥

त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनि धरी घाली मूळबंदीं गांठी ॥३॥

आगळें पाउल जिंके एकाएक । पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥४॥

तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ॥५॥

१५१

फुगडी फू सवती माझे तूं । हागुनि भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरि ॥१॥

फुगडी घेतां आली हरी । ऊठ जावो जगनोवरी ॥ध्रु.॥

हातपाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥२॥

सात पांच आणिल्या हरी । वांचुनी काय तगसी पोरी ॥३॥

सरला दम पांगले पाय । आझुनि वरी घोळिसी काय ॥४॥

तुका म्हणे आझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ॥५॥

॥२॥

लखोटा - अभंग १

१५२

लये लये लखोटा । मूळबंदि कासोटा । भावा केलें साहें । आतां माझें पाहें ॥१॥

हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली । धीर माझा निका । सांडीं बोल फिका ॥२॥

अंगीकारी हरि । नको पडों फेरी । लाज धरीं भांडे । जग झोडी रांडे ॥३॥

बैस भावा पाठीं । ऐक माझ्या गोष्टी । केला सांडीं गोहो । येथें धरीं मोहो ॥४॥

पाठमोरा डोल । आवरी तें बोल । पांगलीस बाळा । पुढें अवकळा ॥५॥

आतां उभी ठायीं । उभाउभीं पाहीं । नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ॥६॥

नामा केलें खरें । आपुलें म्या बरें। तुका म्हणे येरी । पांगविल्या पोरी ॥७॥

हुंबरी - अभंग १

१५३

तुशीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ॥ध्रु.॥

सहस्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ॥१॥

चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनि बुडी ॥२॥

अशुद्ध पीतां करुणा नाहीं । तुवां माउशी ही मारियेली ॥३॥

रावणाचें घर बुडविलें सारें । त्याचीं रांडापोरें मारियेलीं ॥४॥

जाणो तो ठावा आहेसि आम्हां । तुवां आपुला मामा मारियेला ॥५॥

याशीं खेळतां नाश थोरू । तुकयास्वामी सारंगधरू ॥६॥

॥१॥

हमामा - अभंग २

१५४

मशीं पोरा घे रे बार । तुझें बुजीन खालील द्वार ॥१॥

पोरा हमामा रे हमामा रे ॥ध्रु.॥

मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळीं खालीं ॥२॥

तरी च मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ॥३॥

मशीं घेतां भास । जीवा मीतूंपणा नास ॥४॥

मज सवें खरा । पण जाऊं नेदी घरा ॥५॥

आमुचिये रंगीं । दुजें तगेना ये संगीं ॥६॥

तुक्यासवें भास । हरी जीवा करी नास ॥७॥

१५५

हमामा रे पोरा हमामा रे । हमामा घालितां ठकलें पोर । करी येरझार चौऱ्याशीची ॥१॥

पहिले पहारा रंगासि आलें । सोहं सोहं सें बार घेतलें । देखोनि गडी तें विसरलें । डाई पडिलें आपणची ॥ध्रु.॥

दुसऱ्या पहारा महा आनंदें । हमामा घाली छंदछंदें । दिस वाडे तों गोड वाटे । परि पुढें नेणे पोर काय होतें तें ॥२॥

तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणे पाय न राहे स्थिर । सोस सोस करितां डाईं पडसी । सत्य जाणें हा निर्धार ॥३॥

चौथ्या पहारा हमामा । घालिसी कांपविसी हातपाय । सुऱ्यापाटिलाचा पोर यम । त्याचे पडलीस डाईं ॥४॥

हमामा घालितां भ्याला तुका । त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवांचा मूल एक । विठोबा त्यासवें चारितो गाई ॥५॥

॥२॥

गाई - अभंग १

१५६

आम्हां घरीं एक गाय दुभता हे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥१॥

वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ध्रु.॥

वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥२॥

चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥३॥

तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥४॥

कांडण - अभंग २

१५७

सिद्ध करूनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ॥१॥

आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं सेवटिचा गे ॥ध्रु.॥

सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुजमळिणी जंव मिळे ॥२॥

एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष तिसडी ओज करी ॥३॥

सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ॥४॥

उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥५॥

तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनि तांतडी मूळ केलें ॥६॥

१५८

सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ॥१॥

मुसळ आधारीं आवरूनि धरीं । सांवरोनि थिरीं घाव घालीं ॥ध्रु.॥

वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीति ॥२॥

कांडिता कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ॥३॥

तुका म्हणे रूप उमटे आरिसा । पाक त्या सरिसा शुद्ध जाला ॥४॥

॥२॥

आडसण दळण - अभंग १

१५९

शुद्धीचें सारोनि भरियेली पाळी । भरडोनि वोंगळी नाम केलें ॥१॥

आडसोनि शुद्ध करीं वो साजणी । सद्धि कां पापिणी नासियेलें ॥ध्रु.॥

सुपीं तों चि पाहें धड उगटिलें । नव्हतां नासिलें जगझोडी ॥२॥

सुपीं तों चि आहे तुज तें आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ॥३॥

सुपीं तों चि संग घेइप धडफुडी । एकसा गधडी नास केला ॥४॥

दळितां आदळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ॥५॥

सुपीं तों चि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका म्हणे ॥६॥

॥१॥

दळण - अभंग १

१६०

शुद्ध दळणाचें सुख सांगों काई । मानवित सईबाई तुज ॥१॥

शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ॥ध्रु.॥

शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ॥२॥

शुद्ध त्याचा पाक सुचित चांगला । अविट तयाला नाश नाहीं ॥३॥

तुका म्हणे शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ॥४॥

॥१॥

१६१

उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥१॥

वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचें ॥ध्रु.॥

एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ॥२॥

तुका म्हणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ॥३॥

१६२

याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥१॥

आजि देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ॥धृ.॥

हळू हळू चला । कोणी कोणाशीं न बोला ॥२॥

तुका म्हणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥३॥

१६३

शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥१॥

तुम्ही व्हारे दोहींकडे । मुख पसरूनि गडे ॥धृ.॥

वाहाती त्या धारा । घ्यारे दोहींच्या कोंपरा ॥२॥

तुका म्हणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका ॥३॥

१६४

पळाले ते भ्याड । त्यांसि येथें जाला नाड ॥१॥

धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥धृ.॥

आपुलिया मतीं । पडलीं विचारीं तीं रितीं ॥२॥

तुका लागे घ्यारे पायां । कैं पावाल या ठाया ॥३॥

१६५

धालें मग पोट । केला गड्यांनी बोभाट ॥१॥

ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥धृ.॥

खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ॥२॥

तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥३॥

१६६

पाहाती गौळणी । तंव पालथी दुधाणी ॥१॥

म्हणती नंदाचिया पोरें । आजि चोरी केली खरें ॥धृ.॥

त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥२॥

सवें तुका मेळा । त्याणें अगुणा आणिला ॥३॥

१६७

आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ॥१॥

मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥धृ.॥

कोंडूं घरामधीं । न बोलोनि जागों बुद्धी ॥२॥

बोलावितो देवा । तुका गडियांचा मेळावा ॥३॥

१६८

गडी गेले रडी । कान्हो नेदीस तूं चढी ॥१॥

आम्ही न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥धृ.॥

न साहावे भार । बहु लागतो उशीर ॥२॥

तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥३॥

हाल - अभंग २

१६९

यमुनेतटीं मांडिला खेळ । म्हणे गोपाळ गडियांसि ॥१॥

हाल महाहाल मांडा । वाउगी सांडा मोकळी ॥धृ.॥

नांवें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मग कोणी ॥२॥

तुका म्हणे कान्हो तिळतांदळ्या । जिंके तो करी आपुला खेळ्या ॥३॥

१७०

बळें डाईं न पडे हरी । बुद्धि करी शाहणा तो ॥१॥

मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ॥धृ.॥

येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ॥२॥

तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं । मिठी जीवीं पायीं घालुनियां ॥३॥

॥२॥

सुतुतू - अभंग १

१७१

जीवशिवाच्या मांडूनि हाला । अहं सोहं दोन्ही भेडती भला ॥१॥

घाली हुतुतू फिरोनि पाही आपुणासि । पाही बळिया तो मागिला तुटी पुढिलासि ॥ध्रु.॥

खेळिया तो हाल सांभाळी । धुम घाली तो पडे पाताळीं ॥२॥

बळिया गांढ्या तो चि खेळे । दम पुरे तो वेळोवेळां खेळे ॥३॥

हातीं पडे तो चि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ॥४॥

मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तो चि आधार फिके ॥५॥

आपल्या बळें खळे रे भाई । गडियाची सांडोनि सोई ॥६॥

तुका म्हणे मी खेळिया नव्हें । जिकडे पडें त्याचि सवें ॥७॥

॥१॥

१७२

अनंत ब्रम्हांडे उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ॥१॥

नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ध्रु.॥

पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासि यशोदा भोजन घाली ॥२॥

विश्वव्यापक कमळापती । त्यासि गौळणी कडिये घेती ॥३॥

तुका म्हणे नटधारी । भोग भोगून ब्रम्हचारी ॥४॥

१७३

कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥१॥

होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥ध्रु.॥

प्रेम नाम वाचें गाती । सदा आनंदें नाचती ॥२॥

तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ॥३॥

१७४

मेळउनि सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥१॥

चला जाऊं चोरूं लोणी । आजि घेऊं चंद्रधणी ।

वेळ लावियेला अझुणी । एकाकरितां गडे हो ॥ध्रु.॥

वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मांदी ॥२॥

अवघा चि वावरे । कळों नेदी कोणा फिरे ॥३॥

घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ॥४॥

रिघे आपण भीतरी । पुरवी माथुलियाच्या हरी ॥५॥

बोलों नेदी म्हणे स्थिर । खुणा दावी खा रे क्षीर ॥६॥

१७५

धन्य त्या गौळणी इंद्राच्या पूजनीं । नैवेद्य हिरोनि खातो कृष्ण ॥१॥

अरे कृष्णा इंद्र अमर इच्छिती । कोण तयांप्रति येइल आतां ॥२॥

तुका म्हणे देव दाखवी विंदान । नैवेद्य खाऊन हासों लागे ॥३॥

१७६

तुम्ही गोपी बाळा मज कैशा नेणा । इंद्र अमरराणा म्यां चि केला ॥१॥

इंद्र चंद्र सूर्य ब्रम्हा तिन्ही लोक । माझे सकळीक यम धर्म ॥ध्रु.॥

मजपासूनिया जाले जीव शिव । देवांचा ही देव मी च कृष्ण ॥२॥

तुका म्हणे त्यांसी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ॥३॥

१७७

कां रे गमाविल्या गाई । आली वळती तुझी जाई । मागें जालें काई । एका तें का नेणसी ॥१॥

केलास फजित । मागें पुढें ही बहुत । लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां ॥ध्रु.॥

वोला खोडा खळि गाढी । ऐसा कोण तये काढी । धांवेल का पाडी । तुझी आधीं वोढाळा ॥२॥

चाल धांवें । मी ही येतों तुजसवें । तुका म्हणे जंव । तेथें नाहीं पावली ॥३॥

१७८

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ॥१॥

काय देवा यांसि व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ध्रु.॥

सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥२॥

तुका म्हणे वत्स धेनुचिया चित्तीं । तैसें मज येती सांभाळित ॥३॥

१७९

कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ॥१॥

काला वांटूं एकमेकां । वैष्णवा निका संभ्रम ॥ध्रु.॥

वांकुलिया ब्रम्हादिकां । उत्तम लोकां दाखवूं ॥२॥

तुका म्हणे भूमंडळीं । आम्ही बळी वीर गाडे ॥३॥

१८०

कवळाचिया सुखें । परब्रम्ह जालें गोरखें । हात गोऊनि खाय मुखें । बोटासांदी लोणचें ॥१॥

कोण जाणे तेथें । कोण लाभ कां तें । ब्रम्हादिकां दुर्लभ ॥ध्रु.॥

घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी छंदें मोहरी । गोपाळांचे फेरी । हरि छंदें नाचतसे ॥२॥

काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया । तुका म्हणे सवें तया । आम्ही ही सोंकलों ॥३॥

१८१

कान्होबा आतां तुम्ही आम्ही च गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ॥१॥

वाहीन तुझी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदीं ॥ध्रु.॥

ढवळे गाईचें दूध काढूं । एकएकल्यां ठोंबे मारूं ॥२॥

तुका म्हणे टोकवूं त्यांला । जे तुझ्या बोला मानीत ना ॥३॥

१८२

बहु काळीं बहु काळी । आम्ही देवाचीं गोवळीं ॥१॥

नाहीं विटों देत भात । जेऊं बेसवी सांगातें ॥ध्रु.॥

बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ॥२॥

तुका म्हणे नाहीं नाहीं । त्याचें आमचें सें कांहीं ॥३॥

१८३

बहु बरा बहु बरा । यासांगातें मळि चारा ॥१॥

म्हणोनि जीवेंसाठीं । घेतली कान्होबाची पाठी ॥ध्रु.॥

बरवा बरवा दिसे । समागम याचा निमिषें ॥२॥

पुढती पुढती तुका । सोंकला सोंकवितो लोकां ॥३॥

१८४

घेती पाण्यासी हुंबरी । त्यांचें समाधान करी ॥१॥

ऐशी गोपाळांची सवे । जाती तिकडे मागें धांवे ॥ध्रु.॥

स्थिरावली गंगा । पांगविली म्हणे उगा ॥२॥

मोहरी पांवा काठी । तुका म्हणे यांजसाठी ॥३॥

१८५

वळी गाई धांवे घरा । आमच्या करी येरझारा ॥१॥

नांव घेतां तो जवळी । बहु भला कान्हो बळी ॥ध्रु.॥

नेदी पडों उणें पुरें । म्हणे अवघें चि बरें ॥२॥

तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ॥३॥

१८६

म्हणती धालों धणीवरी । आतां न लगे शिदोरी । नये क्षणभरी । आतां यासि विसंबों ॥१॥

चाल चाल रे कान्होबा । खेळ मांडूं रानीं । बैसवूं गोठणीं । गाई जमा करूनि ॥ध्रु.॥

न लगे जावें घरा । चुकलिया येरझारा । सज्जन सोयरा । मायबाप तूं आम्हां ॥२॥

तुका म्हणे धालें पोट । आतां कशाचा बोभाट । पाहाणें ते वाट । मागें पुढें राहिली ॥३॥

१८७

तुझिये संगति । जाली आमुची निश्चिति ॥१॥

नाहीं देखिलें तें मळे । भोग सुखाचे सोहळे ॥ध्रु.॥

घरीं ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ॥२॥

तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥३॥

१८८

कामें पीडिलों माया । बहु मारी नाहीं दया ॥१॥

तुझ्या राहिलों आधारें । जालें अवघें चि बरें ॥ध्रु.॥

तुझे लागलों संगती । आतां येतों काकुळती ॥२॥

तुका म्हणे तुझ्या भिडा । कान्होबा हे गेली पीडा ॥३॥

टिपरी - अभंग ७

१८९

खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे । क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायीं रे ॥१॥

नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी । कळिकाळावरि घातलीसे कास । एक एकाहुनी बळी रे ॥ध्रु.॥

गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा । हार मिरवती गळां । टाळ मृदंग घाई पुष्पवरुषाव । अनुपम्य सुखसोंहळा रे ॥२॥

लुब्धलीं नादीं लागली समाधी । मूढ जन नर नारी लोकां । पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकचि सद्धिसाधकां रे ॥३॥

वर्णाभिमान विसरली याति । एकएकां लोटांगणीं जाती । निर्मळ चित्तें जालीं नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥४॥

होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले हे वैष्णव वीर रे । तुका म्हणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ॥५॥

१९०

एके घाई खेळतां न पडसी डाई । दुचाळ्याने ठकसील भाई रे ।

त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांसी तरी धरीं सोई रे ॥१॥

खेळ खेळोनियां निराळा चि राही । सांडी या विषयाची घाई रे ।

तेणें चि खेळें बसवंत होसी । ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ॥ध्रु.॥

सिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केला रे । आपुल्या सवंगडिया सिकवूनि घाई ।

तेणें सतत फड जागविला रे । एक घाई खेळतां तो न चुके चि कोठें । तया संत जन मानवले रे ॥२॥

ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदें खेळती रे । कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला ।

आपण भोंवतीं नाचती रे । सकळिकां मिळोनि एकी च घाई । त्याच्या ब्रम्हादिक लागती पायीं रे ॥३॥

रामा बसवंत कबिर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे । पांचा सवंगडियां एकचि घाई ।

तेथें नाद बरवा उमटला रे । ब्रम्हादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं । तो ही खेळ निवडिला रे ॥४॥

ब्राम्हणाचा पोर खेळिया एक भला । तेणें जन खेळकर केला रे । जनार्दन बसवंत करूनियां ।

तेणें वैष्णवांचा मेळ मेळविला रे । एक चि घाई खेळतां खेळतो । आपणचि बसवंत जाला रे ॥५॥

आणीक खेळिये होउनियां गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे । तुका म्हणे गडे हो हुशारूनि खेळा ।

पुढिलांची धरूनियां सोई रे । एक चि घाई खेळतां जो चुकला । तो पडेल संसारडाई रे ॥६॥

१९१

बाराही सोळा गडियांचा मेळा । सतरावा बसवंत खेळिया रे ।

जतिस पद राखों जेणें टिपरिया घाई । अनुहातें वायें मांदळा रे ॥१॥

नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया । विठ्ठल रखुमाई पाहूं रे ॥धृ.॥

सा चहूं वेगळा अठराही निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे ।

विसरती पक्षी चारा घेणें पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ॥२॥

आनंद तेथिचा मुकियासि वाचा । बहिरे ऐकती कानीं रे ।

आंधळ्यासि डोळे पांगळांसि पाय । तुका म्हणे वृद्ध होती तारुण्यें रे ॥३॥

१९२

दोन्ही टिपरीं एक चि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ।

कुसरी अंगें मोडितील परी । मेळविति एका छंदें रे ॥१॥

कांहींच न वजे वांयां रे । खेळिया एक चि बसवंत अवघियां रे ।

सम विषम तेथें होऊं च नेदी । जाणऊनि आगळिया रे ॥धृ.॥

संत महंत सिद्ध खेळतील घाई । ते च सांभाळी माझ्या भाई रे ।

हात राखोन हाणिती टिपऱ्या । टिपरें मिळोनि जाय त्याची सोई रे ॥२॥

विताळाचें अवघें जाईल वांयां । काय ते शृंगारूनि काया रे ।

निवडूनि बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संताचिया घाई रे ॥३॥

प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज । निःशंक होउनियां खेळें रे ।

नेणतीं नेणतीं च एकें पावलीं मान । विठ्ठल नामाचिया बळें रे ॥४॥

रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे।

तुका म्हणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ॥५॥

१९३

या रे गडे हो धरूं घाई जाणतां ही नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ॥१॥

फावलें तें घ्यारे आतां प्रेमदाता पांडुरंग । आजि सोनियाचा दिवस सोनियाचा वोडवला रंग ॥ध्रु.॥

हिंडती रानोरान भुजंगांत कांट्यावन । सुख तयांहून आम्हां गातां नाचतां रे ॥२॥

तुका म्हणे ब्रम्हादिकां सांवळें दुर्लभ सुखा । आजि येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ॥३॥

१९४

भीमातीरीं एक वसलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे ।

तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाइला सोळा हजार रे ॥१॥

नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसावा रे ।

पुढें गेले ते निधाई जाले । वाणितील त्याची सीमा रे ॥ध्रु.॥

बळियां आगळा पाळी लोकपाळां । रीघ नाहीं कळिकाळा रे ।

पुंडलीक पाटील केली कुळवाडी । तो जाला भवदुःखा वेगळा रे ॥२॥

संतसज्जनीं मांडिलीं दुकाने । जया जें पाहिजे तें आहे रे ।

भुक्तिमुक्ति फुका च साठीं । कोणी तयाकडे न पाहे रे ॥३॥

दोन्हीच हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे ।

न वजों म्हणती आम्ही वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ॥४॥

बहुत दिस होती मज आस । आजि घडलें सायासीं रे ।

तुका म्हणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ॥५॥

१९५

पंढरी चोहटा मांडियेला खेळ । वैष्णव मिळोनि सकळ रे ।

टाळ टिपरी मांदळे एक नाद रे । जाला बसवंत देवकीचा बाळ रे ॥१॥

चला तें कवतुक भाई रे । पाहों डोळां कामीं गुंतलेति काई रे ।

भाग्यवंत कोणी गेले सांगाति । ऐसें सुख त्रिभुवनीं नाहीं रे ॥ध्रु.॥

आनंदाचे वाद सुखाचे संवाद । एक एका दाखविती छंद रे ।

साही अठरा चारी घालुनियां घाई । नाचती फेरी टाळशुद्ध रे ॥२॥

भक्ताचीं भूषणें मुद्रा आभरणें । शोभती चंदनाच्या उट्या रे ।

सत्व सुंदर कास घालूनि कुसरी । गर्जती नाम बोभाटीं रे ॥३॥

हरि हर ब्रम्हा तीर्थासहित भीमा । देव कोटी तेहतीस रे ।

विस्मित होऊनि ठाकले सकळ जन । अमरावती केली ओस रे ॥४॥

वाणितील थोरी वैकुंठिचीं परी । न पवे पंढरीची सरी रे ।

तुकयाचा दास म्हणे नका आळस करूं । सांगतों नरनारींस रे ॥५॥

॥७॥

१९६

ब्रम्हादिकां न कळे खोळ । ते हे आकळ धरिली ॥१॥

मोहरी पांवा वाहे काठी । धांवे पाठीं गाईचे ॥ध्रु.॥

उच्छिष्ट न लभे देवा । तें हें सदैवां गोवळ्या ॥२॥

तुका म्हणे जोड जाली । ते हे माउली आमुची ॥३॥

१९७

कान्होबा तूं आलगट । नाहीं लाज बहु धीट । पाहिलें वाईट । बोलोनियां खोटें ॥१॥

परि तूं न संडिसी खोडी । करिसी केली घडीघडी । पाडिसी रोकडी । तुटी माये आम्हांसी ॥ध्रु.॥

तूं ठायींचा गोवळ । अविचारी अनर्गळ । चोरटा शिंदळ । ऐसा पिटूं डांगोरा ॥२॥

जरी तुझी आई । आम्ही घालूं सर्वा ठायीं । तुका म्हणे तें ही । तुज वाटे भूषण ॥३॥

१९८

भोजनाच्या काळीं । कान्हो मांडियेली आळी । काला करी वनमाळी । अन्न एकवटा ।

देई निवडुनी । माते म्हणतो जननी । हात पिटूनि मेदिनी । वरि अंग घाली ॥१॥

कैसा आळ घेसी । नव्हे तें चि करविसी । घेई दुसरें तयेसी । वारी म्हणे नको ॥ध्रु.॥

आतां काय करूं । नये यासि हाणूं मारूं । नव्हे बुझावितां स्थिरू । कांहीं करिना हा ।

तोंचिं केलें एके ठायीं । आतां निवडूनि खाई । आम्हा जाचितोसि काई । हरिसि म्हणे माता ॥२॥

त्याचें तयाकुन । करवितां तुटे भान । तंव जालें समाधान । उठोनियां बैसे ।

माते बरें जाणविलें । अंग चोरूनि आपुलें । तोडियलें एका बोलें । कैसें सुखदुःख ॥३॥

ताट पालवें झाकिलें । होतें तैसें तेथें केलें । भिन्नाभिन्न निवडिलें । अन्नें वेगळालीं ।

विस्मित जननी । भाव देखोनियां मनीं । म्हणे नाहीं ऐसा कोणी । तुज सारिखा रे ॥४॥

हरुषली माये । सुख अंगीं न समाये । कवळूनि बाहे देती आलिंगन । आनंद भोजनीं ।

तेथें फिटलीसे धणी । तुका म्हणे कोणी । सांडा शेष मज ॥५॥

१९९

चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥१॥

बहु केली वणवण । पायपिटी जाला सिण ॥ध्रु.॥

खांदीं भार पोटीं भुक । काय खेळायाचें सुख ॥२॥

तुका म्हणे धांवे । मग अवघें बरवें ॥३॥

२००

नेणों वेळा काळ । धालों तुझ्यानें सकळ ॥१॥

नाहीं नाहीं रे कान्होबा भय आम्हापाशीं । वळूनि पुरविसी गाई पोटा खावया ॥ध्रु.॥

तुजपाशीं भये । हें तों बोलों परी नये ॥२॥

तुका म्हणे बोल । आम्हा अनुभवें फोल ॥३॥

विटूदांडू - अभंग १

२०१

माग विटूदांडू । आणीक कांही खेळ मांडूं ॥१॥

बहु अंगा आले डाव । स्थिर नाहीं कोठें पाव ॥ध्रु.॥

कोली हाणे टोला । झेली तेणें तो गोविला ॥२॥

एकमेकां हाका मारी । सेल जाळी एक धरी ॥३॥

राजी आलें नांव । फेरा न चुकेचि धांव ॥४॥

पुढें एक पाटी । एक एकें दोघां आटी ॥५॥

एका सोस पोटीं । एक धांवे हात पिटी ॥६॥

तुका म्हणे आतां । खेळ मोडावा परता ॥७॥

॥१॥

२०२

पाहातां गोवळी । खाय त्यांची उष्टावळी ॥१॥

करिती नामाचें चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान ॥ध्रु.॥

आली द्यावी डाई । धांवे वळत्या मागें गाई ॥२॥

एके ठायीं काला । तुका म्हणे भाविकाला ॥३॥

२०३

पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजि वांचों आम्ही जीवें ॥१॥

धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं करावी ॥ध्रु.॥

अवचितां जाळ येतां देखियेला वरी । परतोनि पाहतां आधीं होतों पाठमोरी ॥२॥

सभोंवता फेर रीग न पुरे पळतां । तुका म्हणे जाणसी तें करावें अनंता ॥३॥

२०४

भिऊं नका बोले झाकुनियां राहा डोळे । चालवील देव धाक नाहीं येणें वेळे ॥१॥

बाप रे हा देवांचा ही देव कळों । नेदी माव काय करी करवी ते ॥ध्रु.॥

पसरूनि मुख विश्वरूप खाय जाळ । सारूनियां संधी अवघे पाहाती गोपाळ ॥२॥

तुका म्हणे आम्ही मागें भ्यालों वांयांविण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ॥३॥

२०५

नेणती तयांसि साच भाव दावी हरी । लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥१॥

चला रे याच्या पायां लागों आतां । राखिलें जळतां महा आगीपासूनि ॥धृ.॥

कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी । न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगी ॥२॥

तुका म्हणे तुम्ही कां रे करितां नवल । आमची सिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥३॥

२०६

त्यांनीं धणीवरी संग केला हरीसवें । देऊनि आपुलें तो चि देईल तें खावें ॥१॥

न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला । बहु दिवस संग हा चि निर्धार त्याला ॥धृ.॥

कान्होबा तू जेवीं घासोघासीं म्हणती । आरुष गोपाळें त्यांची बहु देवा प्रीती ॥२॥

तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा । तोय वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ॥३॥

२०७

घ्या रे भोंकरें भाकरी । दहींभाताची सिदोरी । ताक सांडीं दुरी । असेल तें तयापें ॥१॥

येथें द्यावें तैसें घ्यावे । थोडें परी निरें व्हावें । सांगतों हे ठावें । असों द्या रे सकळां ॥धृ.॥

माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये । चोरोनियां माये । नवनीत आणावें ॥२॥

तुका म्हणे घरीं । माझें कोणी नाहीं हरी । नका करूं दुरी । मज पायां वेगळें ॥३॥

२०८

काल्याचिये आसे । देव जळीं जाले मासे । पुसोनियां हांसे । टिरीसांगातें हात ॥१॥

लाजे त्यासि वांटा नाहीं । जाणे अंतरीचें तें ही । दीन होतां कांहीं । होऊं नेदी वेगळें ॥धृ.॥

उपाय अपाय यापुढें । खोटे निवडितां कुडे । जोडुनियां पुढें । हात उभे नुपेक्षी ॥२॥

तें घ्या रे सावकाशें । जया फावेल तो तैसें । तुका म्हणे रसें । प्रेमाचिया आनंदें ॥३॥

२०९

गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों । आपुलाले आम्ही जीवीची तया आवडी सांगों ।

एक म्हणती उगे रे उगे मागेंचि लागों । निजों नका कोणी घरीं रे आजि अवघेचि जागों ॥१॥

जाणोनि नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे । नाइकोनि बोल अइके कोण कोणाचे कैसे ।

एक एकाच्या संवादा जाणे न मिळे ची ऐसें । पोटीचें होटा आणवी देतो तयांसि तैसें ॥धृ.॥

एक म्हणति बहु रे आम्ही पीडिलों माया । नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया ।

तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया । आतां मागों पोटभरी रे याच्या लागोनि पायां ॥२॥

एक म्हणति तुमचें अरे पोट तें किती । मागों गाई म्हैसी घोडे रे धन संपत्ति हित्त ।

देव गडी कान्हो आमुचा आम्हां काय हातिं । कन्याकुमरें दासी रे बाजावरी सुपती ॥३॥

एक म्हणती बेटे हो कोण करी जतन । गाढव तैसेंचि घोडें रे कोण तयाचा मान ।

लागे भवरोग वाहतां खांदीं चवघे जण । हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडों मोकळे राण ॥४॥

एक म्हणती रानीं रे बहु सावजें फार । फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर ।

राखोनि राखे आपणा ऐसा कइचा शूर । बैसोनि राहों घरीं रे कोण करी हे चार ॥५॥

घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती काम । रिकामें कोणासि नावडे ऐसें आम्हासि ठावें ।

चौघांमध्यें बरें दिसेसें तेथें नेमक व्हावें । लपोनि सहज खेळतां भलें गडियासवें ॥६॥

एक म्हणती गडी ते भले मळिती मता । केली तयावरी चाली रे बरी आपुली सत्ता ।

नसावे ते तेथें तैसे रे खेळ हाणिती लाता । रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उडती लाता ॥७॥

एक म्हणती खेळतां उगीं राहतीं पोरें । ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें ।

अवघीं येती रागा रे एका म्हणतां बरें । संगें वाढे कलह हरावा एकाएकीं च खरें ॥८॥

एक म्हणती एकला रे तूं जासील कोठें । सांडी मांडी हें वाउगें तुझे बोल चि खोटे ।

ठायीं राहा उगे ठायीं च कां रे सिणसी वाटे । अवघियांची सिदोरी तुझे भरली मोटे ॥९॥

तुका म्हणे काय काहण्या अरे सांगाल गोष्टी । चाटावे तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं ।

जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं । धाले गडी तुका ढेकर देतो विठ्ठल कंठीं ॥१०॥

२१०

आजि ओस अमरावती । काला पाहावया येती । देव विसरती । देहभाव आपुला ॥१॥

आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई जाल्या श्वापदें ॥ध्रु.॥

जें या देवांचें दैवत । उभें आहे या रंगांत । गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ॥२॥

२११

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवती गोपाळांची दाटी ॥१॥

आनंदें कवळ देती एकामुखीं एक । न म्हणती सान थोर अवघीं सकळिक ॥ध्रु.॥

हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ॥२॥

लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरलीं देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥३॥

पुष्पाचा वरुषाव जाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ॥४॥

यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ॥५॥

२१२

माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनी ॥१॥

आपआपणामध्यें मिळो । एक खेळों एकाशीं ॥ध्रु.॥

घाबरियांच्या मोडा काड्या । धाडा भाड्यां वळतियां ॥२॥

तुका म्हणे देवापाशीं । विटाळशी नसावी ॥३॥

२१३

हे चि अनुवाद सदा सर्वकाळ । करुनियां गोपाळकाला सेवूं ॥१॥

वोरसलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ॥ध्रु.॥

संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ॥२॥

तुका म्हणे मधीं घालूं नारायण । मग नव्हे सीण कोणा खेळें ॥३॥

२१४

अधिकाचा मज कांटाळा । तुम्हां गोपाळां संगति ॥१॥

काय नाहीं तुम्हापाशीं । सकळांविशीं संपन्न ॥ध्रु.॥

उद्योगाचा नेघें भार । लागल्या सार पुरतें ॥२॥

तुका म्हणे अधीर जिणें । नारायणें न करावें ॥३॥

२१५

जालों आतां एके ठायीं । न वंचूं कांहीं एकमेकां ॥१॥

सरलों हेंगे देउनि मोट । कटकट काशाची ॥ध्रु.॥

सोडोनियां गांठीं पाहें । काय आहे त्यांत तें ॥२॥

तुका म्हणे जालों निराळा । आतां गोपाळा देऊं बोभा ॥३॥

२१६

या रे करूं गाई । जमा निजलेती काई । बोभाटानें आई । घरा गेल्या मारील ॥१॥

घाला घाला रे फुकारे । ज्याची तेणें चि मोहरे । एवढें चि पुरे । केलियानें सावध ॥धृ.॥

नेणोनियां खेळा । समय समयाच्या वेळा । दुश्चिताजवळा । मिळालेति दुश्चित ॥२॥

तुका म्हणे शीक । न धरितां लागे भीक । धरा सकळीक । मनेरी धांवा वळतियां ॥३॥

२१७

वोळलीचा दोहूं पान्हा । मज कान्हा सांगितला ॥१॥

घ्या जि हेंगे क्षीर हातीं । निगुतीनें वाढावें ॥धृ.॥

सांगितलें केलें काम । नव्हे धर्म सत्याचा ॥२॥

तुका म्हणे नवें जुनें । ऐसें कोणें सोसावें॥३॥

२१८

येइल तें घेइन भागा । नव्हे जोगा दुसरिया ॥१॥

आवडी ते तुम्ही जाणा । बहु गुणांसारिखी ॥धृ.॥

मज घेती डांगवरी । सवें हरि नसलिया ॥२॥

तुका म्हणे राबवा देवा । करीन सेवा सांगितली ॥३॥

२१९

अंतरली कुटी मेटी । भय धरूनियां पोटीं । म्हणतां जगजेठी । धांवें करुणाउत्तरीं ॥१॥

बाप बळिया शिरोमणी । उतावळि या वचनीं । पडलिया कानीं । धांवा न करी आळस ॥धृ.॥

बळ दुनी शरणागता । स्वामी वाहों नेदी चिंता । आइतें चि दाता । पंगतीस बैसवी ॥२॥

वाहे खांदीं पाववी घरा । त्याच्या करी येरझारा । बोबड्या उत्तरा । स्वामी तुकया मानवे ॥३॥

२२०

धन्य तें गोधन कांबळी काष्ठिका । मोहरी पांवा निका ब्रीद वांकी ॥१॥

धन्य तें गोकुळ धन्य ते गोपाळ । नर नारी सकळ धन्य जाल्या ॥धृ.॥

धन्य देवकी जसवंती दोहींचें । वसुदेवनंदाचें भाग्य जालें ॥२॥

धन्य त्या गोपिका सोळा सहस्र बाळा । यादवां सकळां धन्य जालें ॥३॥

धन्य म्हणे तुका जन्मा तींचि आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥४॥

२२१

गौळणी बांधिती धारणासि गळा । खेळे त्या गोपाळांमाजी ब्रम्ह ॥१॥

धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ॥ध्रु.॥

तुका म्हणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ॥२॥

२२२

देखिलासि माती खातां । दावियानें बांधी माता ॥१॥

जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणु पाठीं ॥ध्रु.॥

मोठें भावार्थाचें बळ । देव जाला त्याचें बाळ ॥२॥

तुका म्हणे भक्तासाठीं । देव धांवे पाठोवाटीं ॥३॥

२२३

हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगाती ॥१॥

देवें दिला खातों भाग । कराल तर करा लाग ॥ध्रु.॥

धालें ऐसें पोट । वरी करूनियां बोट ॥२॥

तुका म्हणे घरीं । मग कैं जी या परी ॥३॥

२२४

अवघें अवघीकडे । दिलें पाहे मजकडे । अशा सवंगडे । सहित थोरी लागली ॥१॥

कां रे धरिला अबोला । माझा वांटा देईं मला । सिदोरीचा केला । झाडा आतां निवडे ना ॥ध्रु.॥

भूक लागली अनंता । कां रे नेणसी जाणतां । भागलों वळितां । गाई सैरा ओढाळा ॥२॥

तुका करुणा भाकी । हरि पाहे गोळा टाकी । घेता जाला सुखी । भीतरी वांटी आणीकां ॥३॥

२२५

आम्ही गोवळीं रानटें । नव्हों जनांतील धीटें ॥१॥

सिदोरीचा करूं काला । एक वांटितों एकाला ॥ध्रु.॥

खेळों आपआपणांशीं । आमचीं तीं आम्हांपाशीं ॥२॥

मिळालों नेणते । तुका कान्होबा भोंवते ॥३॥

२२६

अवघियां दिला गोर । मजकरे पाहीना ॥१॥

फुंदे गोपाळ डोळे चोळी । ढुंगा थापली हाणे तोंडा ॥ध्रु.॥

आवडती थोर मोटे । मी रे पोरटें दैन्यवाणे ॥२॥

तुका म्हणे जाणों भाव । जीविंचा देव बुझावी ॥३॥

मृदंग पाटया - अभंग

२२७

मागें पुढें पाहें सांभाळूनि दोनी ठाय । चुकावूनि जाय गडी राखे गडियांसि ॥१॥

मुरडे दंडा दोहीं तोंडें गडियां सावध करी । भेटतियासंगे तया हाल तुजवरी ॥ध्रु.॥

गडियां गडी वांटुनि देई । ज्याचा सोडी तेचि ठायीं ॥२॥

अगळ्या बळें करील काय । तुज देणें लागे डोय ॥३॥

नवां घरीं पाउला करीं । सांपडे तो तेथें धरीं ॥४॥

जिंकोनि डाव करीं । टाहो सत्ता आणिकांवरी ॥५॥

सांपडोनि डाईं बहु । काळ गुंतलासी ॥६॥

बळिया गडी फळी । फोडी न धरितां त्यांसी ॥७॥

चुकांडी जो खाय मिळोनि अंगीं जाय । गुंतलासी काय तुका म्हणे अझूनी ॥८॥

२२८

पाहा रे तमासा तुमचा येथें नव्हे लाग । देईन तो भाग आलियाचा बाहेरी ॥१॥

जागा रे गोपाळ नो ठायीं ठायीं जागा । चाहुलीनें भागा दूर मजपासूनि ॥ध्रु.॥

न रिघतां ठाव आम्हा ठावा पाळतियां । भयाभीत वांयां तेथें काय चांचपा ॥२॥

तुका म्हणे हातां चडे जीवाचिये साटीं । मिटक्या देतां गोड मग लागतें शेवटीं ॥३॥

२२९

डाई घालुनियां पोरें । त्यांचीं गुरें चुकवीलीं ॥१॥

खेळ खेळतां फोडिल्या डोया । आपण होय निराळा ॥ध्रु.॥

मारिती माया घेती जीव । नाहीं कीव अन्यायें ॥२॥

तुका कान्होबा मागें । तया अंगें कळों आलें ॥३॥

२३०

आतां हें चि जेऊं हेंचि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ॥१॥

हरिनामाचा खिचडा केला । प्रेमें मोहिला साधनें ॥ध्रु.॥

चवीं चवीं घेऊं घास । ब्रम्हरस आवडी ॥२॥

तुका म्हणे गोड लागे । तों तों मागे रसना ॥३॥

२३१

अवघें चि गोड जालें । मागीलये भरी आलें ॥१॥

साहय जाला पांडुरंग । दिला अभ्यंतरीं संग ॥ध्रु.॥

थडिये पावतां तो वाव । मागें वाहावतां ठाव ॥२॥

तुका म्हणे गेलें । स्वप्नींचें जागें जालें ॥३॥

२३२

तुजसवें येतों हरी । आम्हां लाज नाहीं तरी । उचलिला गिरी । चांग तईं वांचलों ॥१॥

मोडा आतां खेळ । गाई गेल्या जाला वेळ । फांकल्या ओढाळ । नाहीं तो चि आवरा ॥ध्रु.॥

चांग दैवें यमुनेसी वांचलों बुडतां । निलाजिरीं आम्ही नाहीं भय धाक या अनंता ॥२॥

खातों आगी माती । आतां पुरे हा सांगाती । भोंवतां भोंवेल । आम्हां वाटतें हें चित्तीं ॥३॥

तुका म्हणे उरी नाहीं तुजसवें । शाहाणे या भावें दुरी छंद भोळियां सवें ॥४॥

२३३

नको आम्हांसवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥१॥

कोण धांवें त्यांच्या लागें । मागें मागें येरझारी ॥ध्रु.॥

न बैसती एके ठायीं । धांवती दाही दाहा वाटां ॥२॥

तुका म्हणे तू राख मनेरी । मग त्या येरी आम्ही जाणों ॥३॥

२३४

मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायाघरीं गांजियेलों ॥१॥

तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खुणा जिवें गेलों ॥ध्रु.॥

वांयांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ॥२॥

तुका म्हणे तूं आम्हां वेगळा । राहें गोपाळा म्हणउनी ॥३॥

२३५

काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडितां ॥१॥

तुमची मज लागली सवे । ठायींचे नवे नव्हों गडी ॥ध्रु.॥

आणीक बोलाविती फार । बहु थोर नावडती ॥२॥

भाविकें त्यांची आवडी मोठी । तुका म्हणे मिठी घाली जिवें ॥३॥

२३६

वरता वेंघोनि घातली उडी । कळंबाबुडीं यमुनेसी ॥१॥

हरि बुडाला बोंब घाला । घरचीं त्यांला ठावा नाहीं ॥ध्रु.॥

भवनदीचा न कळे पार । काळिया माजी थोर विखार ॥२॥

तुका म्हणे काय वाउग्या हाका । हातींचा गमावुनियां थिंका ॥३॥

२३७

अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता म्हणती गेला ॥१॥

आपलिया रडती भावें । जयासवें जयापरी ॥ध्रु.॥

चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ॥२॥

तुका म्हणे धांवती थडी । न घली उडी आंत कोणी ॥३॥

२३८

भ्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं ठावा जवळीं तो ॥१॥

आहाकटा करिती हाय । हात डोकें पिटिती पाय ॥ध्रु.॥

जवळी होतां न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ॥२॥

तुका म्हणे हा लाघवी मोटा । पाहे खोटा खरा भाव ॥३॥

२३९

काळिया नाथूनि आला वरी । पैल हरी दाखविती ॥१॥

दुसरिया भावें न कळे कोणा । होय नव्हेसा संदेह मना ॥धृ.॥

रूपा भिन्न पालट जाला । गोरें सांवळेंसा पैं देखिला ॥२॥

आश्वासीत आला करें । तुका खरें म्हणे देव ॥३॥

२४०

हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळ्या गळा मेळवूनी ॥१॥

भाविकें त्यांची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीविंचिया ॥धृ.॥

योगियांच्या ध्याना जो नये । भाकरी त्यांच्या मागोनि खाये ॥२॥

तुका म्हणे असे शाहाणियां दुरी । बोबडियां दास कामारी ॥३॥

२४१

धांव कान्होबा गेल्या गाई । न म्हणे मी कोण ही काई ॥१॥

आपुलियांचें वचन देवा । गोड सेवा करीतसे ॥धृ.॥

मागतां आधीं द्यावा डाव । बळिया मी तो नाहीं भाव ॥२॥

तुका म्हणे ऐशा सवें । अनुसरावें जीवेंभावें ॥३॥

२४२

धाकुटयाचे मुखीं घांस घाली माता । वरी करी सत्ता शाहाणियां ॥१॥

ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥धृ.॥

दोन्ही उभयतां आपण चि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ॥२॥

तुका म्हणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनीं ॥३॥

२४३

देवाचे म्हणोनि देवीं अनादर । हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥१॥

आतां येरा जना म्हणावें तें काई । जया भार डोई संसाराचा ॥ध्रु.॥

त्यजुनी संसार अभिमान सांटा । जुलूम हा मोटा दिसतसे ॥२॥

तुका म्हणे अळस करूनियां साहे । बळें कैसे पाहें वांयां जाती ॥३॥

२४४

उपदेश तो भलत्या हातीं । जाला चित्तीं धरावा ॥१॥

नये जाऊं पात्रावरी । कवटी सारी नारळें ॥ध्रु.॥

स्त्री पुत्र बंदीजन । नारायण स्मरविती ॥२॥

तुका म्हणे रत्नसार । परि उपकार चिंधीचे ॥३॥

२४५

संतांचे गुण दोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा ॥१॥

पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ध्रु.॥

तुका म्हणे गंगे अग्नीसि विटाळ । लावी तो चांडाळ दुःख पावे ॥२॥

२४६

चुंबळीचा करी चुंबळीशीं संग । अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥१॥

बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जाती ऐसा ॥ध्रु.॥

माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडूनियां सुना बिदी धुंडी ॥२॥

तुका म्हणे ऐसा व्याली ते गाढवी । फजिती ते व्हावी आहे पुढें ॥३॥

२४७

सांपडला संदीं । मग बळिया पडे फंदीं ॥१॥

ऐसी कोणी वाहे वेळ । हातीं काळाच्या सकळ ॥ध्रु.॥

दाता मागे दान । जाय याचका शरण ॥२॥

तुका म्हणे नेणां । काय सांगों नारायणा ॥३॥

२४८

सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥१॥

आला डोळ्यांसि कवळ । तेणें मळलें उजळ ॥ध्रु.॥

अंगाचे भोंवडी । भोय झाड फिरती धोंडी ॥२॥

तुका म्हणे नाड । पाप ठाके हिता आड ॥३॥

२४९

न देखोन कांहीं । म्या पाहिलें सकळ ही ॥१॥

जालों अवघियांपरी । मी हें माझें ठेलें दुरी ॥ध्रु.॥

न घेतां घेतलें । हातें पायें उसंतिलें ॥२॥

खादलें न खातां । रसना रस जाली घेतां ॥३॥

न बोलोनि बोलें । केलें प्रगट झांकिलें ॥४॥

नाइकिलें कानीं । तुका म्हणे आलें मनीं ॥५॥

ब्रम्हचारी फिर्याद गेला - अभंग २

२५०

काखे कडासन आड पडे । खडबड खडबडे हुसकलें ॥१॥

दादकरा दादकरा । फजितखोरा लाज नाहीं ॥ध्रु.॥

अवघा जाला राम राम । कोणी कर्म आचरे ना ॥२॥

हरिदासांच्या पडती पायां । म्हणती तयां नागवावें ॥३॥

दोहीं ठायीं फजीत जालें । पारणें केलें अवकळा ॥४॥

तुका म्हणे नाश केला । विटंबिला वेश जिहीं ॥५॥

२५१

कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला ॥१॥

भजन तें वोंगळवाणें । नरका जाणें चुके ना ॥ध्रु.॥

अक्षराची केली आटी । जरी पोटीं संतनिंदा ॥२॥

तुका म्हणे मागें पाय । तया जाय स्थळासि ॥३॥

॥२॥

२५२

तारतिम वरी तोंडा च पुरतें । अंतरा हें येतें अंतरीचें ॥१॥

ऐसी काय बरी दिसे ठकाठकी । दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ॥ध्रु.॥

भोजनांत द्यावें विष कालवूनि । मोहचाळवणी मारावया ॥२॥

तुका म्हणे मैंद देखों नेदी कुडें । आदर चि पुढें सोंग दावी ॥३॥

२५३

ब्रम्हनिष्ठ काडी । जरी जीवानांवें मोडी ॥१॥

तया घडली गुरुहत्या । गेला उपदेश तो मिथ्या ॥ध्रु.॥

सांगितलें कानीं । रूप आपुलें वाखाणी ॥२॥

भूतांच्या मत्सरें । ब्रम्हज्ञान नेलें चोरें ॥३॥

शिकल्या सांगे गोष्टी । भेद क्रोध वाहे पोटीं ॥४॥

निंदा स्तुति स्तवनीं । तुका म्हणे वेंची वाणी ॥५॥

२५४

इहलोकींचा हा देहे । देव इच्छिताती पाहें ॥१॥

धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचे जालों ॥ध्रु.॥

आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ॥२॥

तुका म्हणे पावठणी । करूं स्वर्गाची निशाणी ॥३॥

२५५

पंडित वाचक जरी जाला पुरता । तरी कृष्णकथा ऐके भावें ॥१॥

क्षीर तुपा साकरे जालिया भेटी । तैसी पडे मिठी गोडपणें ॥ध्रु.॥

जाणोनियां लाभ घेई हा पदरीं । गोड गोडावरी सेवीं बापा ॥२॥

जाणिवेचें मूळ उपडोनी खोड । जरी तुज चाड आहे तुझी ॥३॥

नाना परिमळद्रव्य उपचार । अंगी उटी सारचंदनाची ॥४॥

जेविलियाविण शून्य ते शृंगार । तैसी गोडी हरिकथेविण ॥५॥

ज्याकारणें वेदश्रुति ही पुराणें । तें चि विठ्ठलनाणें तिष्ठे कथे ॥६॥

तुका म्हणे येर दगडाचीं पेंवें । खळखळ आवघें मूळ तेथें ॥७॥

२५६

आणिकांच्या कापिती माना । निष्ठपणा पार नाहीं ॥१॥

करिती बेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ॥ध्रु.॥

सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासि ॥२॥

तुका म्हणे नाचति पोरें । खोडितां येरें अंग दुखे ॥३॥

२५७

गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोठें चराचरीं त्याग केला ॥१॥

गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ । मिळाल्या वाहाळ गंगाओघ ॥ध्रु.॥

कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासि । पांडवकुळासि पाहातां दोष ॥२॥

शकुंतळा सूत कर्ण शृंगी व्यास । यांच्या नामें नाश पातकांसि ॥३॥

गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर । पाहातां विचार पिंगळेचा ॥४॥

वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद । यांचे पूर्व शुद्ध काय आहे ॥५॥

न व्हावी तीं जालीं कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥६॥

तुका म्हणे पूर्व नाठवी श्रीहरी । मूळ जो उच्चारी नरक त्यासि ॥७॥

२५८

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वाना लागीं ॥१॥

मुक्ताफळहार खरासि घातला । कस्तुरी सुकराला चोजविली ॥ध्रु.॥

वेदपरायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खुण काय जाणे ॥२॥

तुका म्हणे ज्याचें तो चि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे ॥३॥

२५९

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥१॥

संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥ध्रु.॥

आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥२॥

संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासि ज्ञान नाहीं ॥३॥

धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ॥४॥

बहु बोलों जातां म्हणति हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥५॥

भेटिसि न वजातां म्हणती हा निष्ठ । येतां जातां घर बुडविलें ॥६॥

लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ॥७॥

निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥८॥

लोक जैसा लोक धरितां धरवे ना । अभक्ता जिरे ना संतसंग ॥९॥

तुका म्हणे आतां ऐकावें वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ॥१०॥

२६०

धर्म रक्षावया साठीं । करणें आटी आम्हांसि ॥१॥

वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥ध्रु.॥

न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥२॥

तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥३॥

२६१

चवदा भुवनें जयाचिये पोटीं । तो चि आम्हीं कंठीं साठविला ॥१॥

काय एक उणें आमुचिये घरीं । वोळगती द्वारीं रिद्धिसिद्धी ॥ध्रु.॥

असुर जयानें घातले तोडरीं । तो आम्हांसि जोडी कर दोन्ही ॥२॥

रूप नाहीं रेखा जयासि आकार । आम्हीं तो साकार भक्तीं केला ॥३॥

अनंत ब्रम्हांडें जयाचिये अंगीं । समान तो मुंगी आम्हासाठीं ॥४॥

रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥५॥

तुका म्हणे आम्ही देवाहूनि बळी । जालों हे निराळी ठेवुनि आशा ॥६॥

२६२

केला मातीचा पशुपति । परि मातीसि काय म्हणती । शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी सामावे ॥१॥

तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत । आम्ही किंकर संतांचे दास । संतपदवी नको आम्हांस ॥ध्रु.॥

केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नव्हे विष्णु । विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥२॥

केली कांशाची जगदंबा । परि कांसें नव्हे अंबा । पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसें राहे कांसेंपणें ॥३॥

ब्रम्हानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली कांजी । ज्याची पूजा त्याणें चि घेणें। आम्ही पाषाणरूप राहणें ॥४॥

२६३

ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ॥१॥

येरा मानी विधि पाळणापुरतें । देवाचीं तीं भूतें म्हणोनियां ॥ध्रु.॥

सर्वभावें जालों वैष्णवांचा दास । करीन त्यांच्या आस उच्छिष्टाची ॥२॥

तुका म्हणे जैसे मानती हरिदास । तैशी नाहीं आस आणिकांची ॥३॥

२६४

दया तिचें नांव भूतांचें पाळण । अणीक निर्दळण कंटकांचें ॥१॥

पाप त्याचें नांव न विचारितां नीत । भलतें चि उन्मत्त करी सदा ॥२॥

तुका म्हणे धर्म रक्षावया साठीं । देवास ही आटी जन्म घेणें ॥३॥

२६५

करावें गोमटें । बाळा माते तें उमटे ॥१॥

आपुलिया जीवाहूनी । असे वाल्हें तें जननी ॥ध्रु.॥

वियोग तें तिस । त्याच्या उपचारें तें विष ॥२॥

तुका म्हणे पायें । डोळा सुखावे ज्या न्यायें ॥३॥

२६६

कन्या सासुऱ्यासि जाये । मागें परतोनी पाहे ॥१॥

तैसें जालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ॥ध्रु.॥

चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे ॥२॥

जीवना वेगळी मासोळी । तुका म्हणे तळमळी ॥३॥

२६७

हातीं होन दावी बेना । करिती लेंकीच्या धारणा ॥१॥

ऐसे धर्म जाले कळीं । पुण्य रंक पाप बळी ॥धृ.॥

सांडिले आचार । द्विज चाहाड जाले चोर ॥२॥

टिळे लपविती पातडीं । लेती विजारा कातडीं ॥३॥

बैसोनियां तक्तां । अन्नेंविण पिडिती लोकां ॥४॥

मुदबख लिहिणें । तेलतुपावरी जिणें ॥५॥

नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥६॥

राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ॥७॥

वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ॥८॥

अवघे बाह्य रंग । आंत हिरवें वरी सोंग ॥९॥

तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धांवा ॥१०॥

२६८

साळंकृत कन्यादान । करितां पृथ्वीसमान ॥१॥

परि तें न कळे या मूढा । येइल कळों भोग पुढां ॥धृ.॥

आचरतां कर्म । भरे पोट राहे धर्म ॥२॥

सत्या देव साहे । ऐसें करूनियां पाहें ॥३॥

अन्न मान धन । हें तों प्रारब्धा आधीन ॥४॥

तुका म्हणे सोस । दुःख आतां पुढें नास ॥५॥

२६९

दिवट्या वाद्यें लावुनि खाणें । करूनि मंडण दिली हातीं ॥१॥

नवरा नेई नवरी घरा । पूजन वरा पाद्याचें ॥धृ.॥

गौरविली विहीण व्याही । घडिलें कांहीं ठेवूं नका ॥२॥

करूं द्यावें न्हावें वरें । ठायीचें कां रे न कळे चि ॥३॥

वऱ्हाडियांचे लागे पाठीं । जैसी उटिका तेलीं ॥४॥

तुका म्हणे जोडिला थुंका । पुढें नरका सामग्री ॥५॥

२७०

ब्रम्हहत्या मारिल्या गाई । आणीक काई पाप केलें ॥१॥

ऐका जेणें विकिली कन्या । पवाडे त्या सुन्याचे ॥धृ.॥

नरमांस खादली भाडी । हाका मारी म्हणोनि ॥२॥

अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिळाषिलें ॥३॥

उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे ॥४॥

तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागे ना कां ॥५॥

२७१

याचा कोणी करी पक्ष । तो ही त्याशी समतुल्य ॥१॥

फुकासाठीं पावे दुःखाचा विभाग । पूर्वजांसि लाग निरयदंडीं ॥धृ.॥

ऐके राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासि ॥२॥

तुका म्हणे त्याचें अन्न । मद्यपाना समान ॥३॥

२७२

कपट कांहीं एक । नेणें भुलवायाचें लोक ॥१॥

तुमचें करितों कीर्त्तन । गातों उत्तम ते गुण ॥धृ.॥

दाऊं नेणें जडीबुटी । चमत्कार उठाउठी ॥२॥

नाहीं शिष्यशाखा । सांगों अयाचित लोकां ॥३॥

नव्हें मठपति । नाहीं चाहुरांची वृत्ति ॥४॥

नाहीं देवार्चन । असे मांडिलें दुकान ॥५॥

नाहीं वेताळ प्रसन्न । कांहीं सांगों खाण खुण ॥६॥

नव्हें पुराणिक । करणें सांगणें आणीक ॥७॥

नेणें वाद घटा पटा । करितां पंडित करंटा ॥८॥

नाहीं जाळीत भणदीं । उदो म्हणोनि आनंदी ॥९॥

नाहीं हालवीत माळा । भोंवतें मेळवुनि गबाळा ॥१०॥

आगमीचें कुडें नेणें । स्तंभन मोहन उच्चाटणें ॥११॥

नव्हें यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ॥१२॥

२७३

रडोनियां मान । कोण मागतां भूषण ॥१॥

देवें दिलें तरी गोड । राहे रुचि आणि कोड ॥ध्रु.॥

लावितां लावणी । विके भीके केज्या दानी ॥२॥

तुका म्हणे धीरा । विण कैसा होतो हिरा ॥३॥

२७४

पूज्या एकासनीं आसनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ॥१॥

सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ॥ध्रु.॥

संतां ठाया ठाव पूजनाची इच्छा । जीवनीं च वळसा सांपडला ॥२॥

तुका म्हणे एकाएकीं वरासनें । दुजें तेथें भिन्न अशोभ्य तें ॥३॥

२७५

जेणें मुखें स्तवी । तें चि निंदे पाठीं लावी ॥१॥

ऐसी अधमाची याती । लोपी सोनें खाय माती ॥ध्रु.॥

गुदद्वारा वाटे । मिष्टान्नांचा नरक लोटे ॥२॥

विंचु लाभाविण । तुका म्हणे वाहे शीण ॥३॥

२७६

अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ॥१॥

विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयां विण ॥ध्रु.॥

सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ॥२॥

तुका म्हणे देवा । मज झणी ऐसे दावा ॥३॥

२७७

आणिकांची स्तुति आम्हां ब्रम्हहत्या । एका वांचूनि त्या पांडुरंगा ॥१॥

आम्हां विष्णुदासां एकविध भाव । न म्हणों या देव आणिकांसि ॥ध्रु.॥

शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ॥२॥

तुका म्हणे मज आणिका संकल्पें । अवघीं च पापें घडतील ॥३॥

२७८

तान्हेल्याची धणी । फिटे गंगा नव्हे उणी ॥१॥

माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधी ॥ध्रु.॥

तूं तों उदाराचा राणा । माझी अल्प चि वासना ॥२॥

कृपादृष्टीं पाहें । तुका म्हणे होईं साहे ॥३॥

२७९

संताचा अतिक्रम । देवपूजा तो अधर्म ॥१॥

येती दगड तैसे वरी । मंत्रपुष्पें देवा शिरीं ॥ध्रु.॥

अतीतासि गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ॥२॥

तुका म्हणे देवा । ताडण भेदकांची सेवा ॥३॥

२८०

करणें तें देवा । हे चि एक पावे सेवा ॥१॥

अवघें घडे येणे सांग । भक्त देवाचें तें अंग ॥ध्रु.॥

हें चि एक वर्म । काय बोलिला तो धर्म ॥२॥

तुका म्हणे खरें । खरें त्रिवाचा उत्तरें ॥३॥

२८१

मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनियां ॥१॥

परनारीचें जया घडलें गमन । दावीतो वदन जननीरत ॥ध्रु.॥

उपदेशा वरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ॥२॥

तुका म्हणे साक्षी असों द्यावें मन । घातली ते आण पाळावया ॥३॥

२८२

आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ॥१॥

ते चि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ॥ध्रु.॥

कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ॥२॥

तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा॥३॥

हनुमंतस्तुति - अभंग ४

२८३

शरण शरण जी हनुमंता । तुज आलों रामदूता ॥१॥

काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ॥ध्रु.॥

शूर आणि धीर । स्वामिकाजीं तूं सादर ॥२॥

तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ॥३॥

२८४

केली सीताशुद्धी । मूळ रामायणा आधीं ॥१॥

ऐसा प्रतापी गहन । सुरां सकळ भक्तांचें भूषण ॥ध्रु.॥

जाऊनि पाताळा । केली देवाची अवकळा ॥२॥

राम लक्षुमण । नेले आणिले चोरून ॥३॥

जोडूनियां कर । उभा सन्मुख समोर ॥४॥

तुका म्हणे जपें । वायुसुता जाती पापें ॥५॥

२८५

काम घातला बांदोडी । काळ केला देशधडी ॥१॥

तया माझें दंडवत । कपिकुळीं हनूमंत ॥ध्रु.॥

शरीर वज्रा ऐसें । कवळी ब्रम्हांड जो पुच्छे ॥२॥

रामाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ॥३॥

२८६

हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ॥१॥

तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ॥ध्रु.॥

करोनी उड्डाण । केलें लंकेचें दहन ॥२॥

जाळीयेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ॥३॥

॥४॥

२८७

कुंभ अवघा एक आवा । पाकीं एकीं गुफे डावा ॥१॥

ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे ॥ध्रु.॥

हिरे दगड एक खाणी । कैचें विजातीसी पाणी ॥२॥

तुका म्हणे शिरीं । एक एकाची पायरी ॥३॥

२८८

मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥१॥

ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥ध्रु.॥

बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥२॥

तुका म्हणे बहुतोंडे जे वाचाळ । तेंग तें च मूळ लटिक्याचें ॥३॥

२८९

न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पतिमेळ हाकारुनी ॥१॥

अंतरीचें धांवे स्वभावें बाहेरी । धरितां ही परी आवरे ना ॥ध्रु.॥

सूर्य नाहीं जागें करीत या जना । प्रकाश किरणा कर म्हुन ॥२॥

तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥३॥

२९०

चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥१॥

दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥ध्रु.॥

तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळे चि ना ॥२॥

२९१

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥१॥

मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ध्रु.॥

मन गुरू आणि शिष्य । करी आपुलें चि दास्य । प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥२॥

साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाहीं नाहीं आनुदैवत । तुका म्हणे दुसरें ॥३॥

२९२

मायबापें जरी सर्पीण बोका । त्यांचे संगें सुखा न पवे बाळ ॥१॥

चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥२॥

तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥३॥

२९३

शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥१॥

पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥२॥

तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही । देतील हे नाहीं ठावी वस्तु ॥३॥

२९४

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ॥१॥

अवघा देव चि जाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ॥ध्रु.॥

सत्वरजतमबाधा । नव्हे हरिभक्तांसि कदा ॥२॥

खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ॥३॥

देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥४॥

२९५

शास्त्राचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो माझा सांगाती प्राणसखा ॥१॥

म्हणउनी नाहीं आणिकांचा पांग । सर्व जालें सांग नामें एका ॥ध्रु.॥

सगुण निर्गुण जयाचीं अंगें । तो चि आम्हां संगें क्रीडा करी ॥२॥

तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू आइते केले नव्हों ॥३॥

२९६

ऐका महिमा आवडीचीं । बोरें खाय भिलटीचीं ॥१॥

थोर प्रेमाचा भुकेला । हा चि दुष्काळ तयाला । अष्टमा सिद्धींला । न मनी क्षीरसागराला ॥धृ.॥

पव्हे सुदामदेवाचे । फके मारी कोरडे च ॥२॥

न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडे । तुका म्हणे भक्तीपुढें ॥३॥

२९७

कोणें तुझा सांग केला अंगीकार । निश्चिति त्वां थोर मानियेली ॥१॥

कोणें ऐसा तुज उपदेश केला । नको या विठ्ठला शरण जाऊं ॥धृ.॥

तेव्हां तुज कोण घालील पाठीसी । घासील भूमीसी वदन यम ॥२॥

कां रे नागवसी आयुष्य खातो काळ । दिसेंदिस बळ क्षीण होतें ॥३॥

तुका म्हणे यासि सांगा कोणी तरी । विसरला हरी मायबाप ॥४॥

२९८

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पाहवे ॥१॥

साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कापती देखोनियां ॥२॥

असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥३॥

२९९

आमचे गोसावी अयाचितवृत्ती । करवी शिष्याहातीं उपदेश ॥१॥

दगडाची नाव आधींच ते जड । ते काय दगड तारूं जाणे ॥१॥

तुका म्हणे वेष विटंबिला त्यांनी । सोंगसंपादणी करिती परी॥३॥

३००

मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैल थडी ॥१॥

खापराचे होन खेळती लेंकुरें । कोण त्या वेव्हारें लाभ हाणि ॥धृ.॥

मंगळदायक करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ॥२॥

स्वप्नींचें जें सुखदुःख जालें काहीं । जागृतीं तो नाहीं साच भाव ॥३॥

सारीं जालीं मेलीं लटिकें वचन । बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ॥४॥

३०१

माझें म्हणतां याला कां रे नाहीं लाज । कन्या पुत्र भाज धन वित्त ॥१॥

कोणी सोडवी ना काळाचे हातींचें । एकाविणें साचें नारायणा ॥२॥

तुका म्हणे किती सांगावें चांडाळा । नेणे जीवकळा कोण्या जीतो ॥३॥

३०२

आंधळ्यासि जन अवघे चि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥१॥

रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥२॥

तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥३॥

३०३

छळी विष्णुदासा कोणी । त्याची अमंगळ वाणी ॥१॥

येऊं न द्यावा समोर । अभागी तो दुराचार ॥धृ.॥

नावडे हरिकथा । त्याची व्यभिचारीण माता ॥२॥

तुका म्हणे याति । भ्रष्ट तयाचि ते मति ॥३॥

३०४

बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥१॥

मिठेंविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेंविण शृंगारिले ॥धृ.॥

संपादणीविण विटंबिले सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ॥२॥

कन्यापुत्रेंविण मंगळदायकें । वेचिलें हें फिके द्रव्य तरी ॥३॥

तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखे अंतरीं प्रेमभाव ॥४॥

३०५

अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे ॥१॥

एकाचिये तोंडीं पडिली ते माती । अवघे ते खाती पोटभरी ॥धृ.॥

चारितां बळें येत असे दांतीं । मागोनियां घेती भाग्यवंत ॥२॥

तुका म्हणे नसे संचित हें बरें । तयासि दुसरें काय करी ॥३॥

३०६

धिग जीणें तो बाइले आधीन । परलोक मान नाही दोन्ही ॥१॥

धिग जीणें ज्याचें लोभावरी मन । अतीतपूजन घडे चि ना ॥धृ.॥

धिग जीणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ॥२॥

धिग जीणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ॥३॥

तुका म्हणे धिग ऐसे जाले लोक । निंदक वादक नरका जाती ॥४॥

३०७

अरे हें देह व्यर्थ जावें । ऐसें जरी तुज व्हावें । द्यूतकर्म मनोभावें । सारीपाट खेळावा ॥१॥

मग कैचें हरिचें नाम । निजेलिया जागा राम । जन्मोजन्मींचा अधम । दुःख थोर साधिलें ॥धृ.॥

विषयसुखाचा लंपट । दासीगमनीं अतिधीट । तया तेचि वाट । अधोगती जावया ॥२॥

अणीक एक कोड । नरका जावयाची चाड । तरी संतनिंदा गोड । करीं कवतुकें सदा ॥३॥

तुका म्हणे ऐसें । मना लावी राम पिसें । नाहीं तरी आलिया सायासें । फुकट जासी ठकोनी ॥४॥

३०८

अवघें ब्रम्हरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥१॥

नाहीं भाव तया सांगावें तें किती । आपुल्याला मतीं पाषांडिया ॥धृ.॥

जया भावें संत बोलिले वचन । नाहीं अनुमोदन शाब्दिकांसि ॥२॥

तुका म्हणे संतीं भाव केला बळी । न कळतां खळीं दूषिला देव ॥३॥

३०९

एक तटस्थ मानसीं । एक सहज चि आळसी ॥१॥

दोन्ही दिसती सारिखीं । वर्म जाणे तो पारखी ॥धृ.॥

एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोप ॥२॥

एकां सर्वस्वाचा त्याग। एकां पोटासाठीं जोग ॥३॥

एकां भक्ति पोटासाठीं । एकां देवासवें गांठी ॥४॥

वर्म पोटीं एका । फळें दोन म्हणे तुका ॥५॥

३१०

काय कळे बाळा । बाप सदैव दुबळा ॥१॥

आहे नाहीं हें न कळे । हातीं काय कोण्या वेळे ॥ध्रु.॥

देखिलें तें दृष्टी । मागे घालूनियां मिठी ॥२॥

तुका म्हणे भावें । माझ्या मज समजावें ॥३॥

३११

भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरी ॥१॥

धिग त्याचें साधुपण । विटाळूनी वर्ते मन ॥ध्रु.॥

नाहीं वैराग्याचा लेश । अर्थचाड जावें आस ॥२॥

हें ना तें सें जालें । तुका म्हणे वांयां गेलें ॥३॥

३१२

एकादशीस अन्न पान । जे नर करिती भोजन । श्वानविष्ठे समान । अधम जन तो एक ॥१॥

ऐका व्रताचें महिमान। नेमें आचरती जन । गाती ऐकतीं हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ॥ध्रु.॥

अशुद्ध विटाळसीचें खळ । विडा भिक्षतां तांबूल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ॥२॥

सेज बाज विलास भोग । करी कामिनीशीं संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥३॥

आपण न वजे हरिकीर्तना । अणिकां वारी जातां कोणा । त्याच्या पापें जाणा । ठेंगणा महा मेरु ॥४॥

तया दंडी यमदूत । जाले तयाचे अंकित । तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलीया ॥५॥

३१३

करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ॥१॥

शुद्धबुद्धि होय दोघां एक मान । चोरासवें कोण जिवें राखे ॥ध्रु.॥

आपुलें देऊनी आपुला चि घात । न करावा थीत जाणोनियां ॥२॥

देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥३॥

तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ॥४॥

३१४

इनामाची भरली पेठ । वाहाती दाट मारग ॥१॥

अवघेची येती वाण । अवघे शकुन लाभाचे ॥ध्रु.॥

अडचणी त्या केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ॥२॥

तुका म्हणे जोडी जाली । ते आपुली आपणा ॥३॥

३१५

वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोकां नाहीं येरां ॥१॥

विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एक सरे भवसिंधु ॥ध्रु.॥

जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सकळ मूढ लोक ॥२॥

तुका म्हणे विधि निषेध लोपला । उच्छेद या जाला मारगाचा ॥३॥

३१६

विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥१॥

मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ॥ध्रु.॥

बहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ॥२॥

तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ॥३॥

३१७

येथीचिया अळंकारें । काय खरें पूजन ॥१॥

वैकुंठींच्या लावूं वाटा । सर्व साटा ते ठायीं ॥ध्रु.॥

येथीचिया नाशवंतें । काय रितें चाळवूं ॥२॥

तुका म्हणे वैष्णव जेन । माझे गण समुदाय ॥३॥

३१८

उजळावया आलों वाटा । खरा खोटा निवाड ॥१॥

बोलविले बोल बोलें । धनीविठ्ठला सन्निध ॥ध्रु.॥

तरी मनीं नाहीं शंका । बळें एका स्वामीच्या ॥२॥

तुका म्हणे नये आम्हां । पुढें कामा गबाळ ॥३॥

३१९

बोलावें तें धर्मा मिळे । बरे डोळे उघडूनि ॥१॥

काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकी तें ॥ध्रु.॥

दुजें ऐसें काय बळी । जें या जाळी अग्नीसि ॥२॥

तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनीं बुरबुरी ॥३॥

३२०

बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों ॥१॥

भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥ध्रु.॥

विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥२॥

सेवा चुकतों संताची । नागवण हे फुकाची ॥३॥

गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥४॥

तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥५॥

३२१

दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ॥१॥

आतां काय उरलें वाचे । पुढें शब्द बोलायाचे ॥ध्रु.॥

देखती जे डोळे । रूप आपुलें तें खेळे ॥२॥

तुका म्हणे नाद । जाला अवघा गोविंद ॥३॥

३२२

कृपा करुनी देवा । मज साच तें दाखवा ॥१॥

तुम्ही दयावंत कैसे । कीर्ति जगामाजी वसे ॥ध्रु.॥

पाहोनियां डोळां । हातीं ओढवाल काळा ॥२॥

तुका म्हणे देवा । माझा करावा कुठावा ॥३॥

३२३

ठायींची ओळखी । येइल टाकुं टाका सुखीं ॥१॥

तुमचा जाईल ईमान । माझे कपाळीं पतन ॥धृ.॥

ठेविला तो ठेवा । अभिळाषें बुडवावा ॥२॥

मनीं न विचारा । तुका म्हणे हे दातारा ॥३॥

३२४

तुझें वर्म ठावें । माझ्या पाडियेलें भावें ॥१॥

रूप कासवाचे परी । धरुनि राहेन अंतरीं ॥धृ.॥

नेदी होऊं तुटी । मेळवीन दृष्टादृष्टी ॥२॥

तुका म्हणे देवा । चिंतन ते तुझी सेवा ॥३॥

३२५

गहूं एकजाती । परी त्या पाधाणी नासिती ॥१॥

वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ॥धृ.॥

कमाईच्या सारें । जाति दाविती प्रकार ॥२॥

तुका म्हणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ॥३॥

३२६

पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांची नांवें ॥१॥

नेघे माझे वाचे तुटी । महा लाभ फुकासाठी ॥धृ.॥

विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥२॥

तुका म्हणे जपें । संतांचिया जाती पापें ॥३॥

३२७

देव होईजेत देवाचे संगती । पतन पंगती जगाचिया ॥१॥

दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा । करितील सांटा आपुलाला ॥धृ.॥

दाखविले परी नाहीं वर्जिजेतां । आला तो तो चित्ता भाग भरा ॥२॥

तुका म्हणे अंगीं आवडीचें बळ । उपदेश मूळबीजमात्र ॥३॥

३२८

शोधिसील मूळें । त्याचें करीसी वाटोळें ॥१॥

ऐसे संतांचे बोभाट । तुझे बहु जाले तट ॥ध्रु.॥

लौकिका बाहेरी । घाली रोंखीं जया धरी ॥२॥

तुका म्हणे गुण । तुझा लागलिया शून्य ॥३॥

३२९

वैद वाचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥१॥

काय जाणों कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ॥ध्रु.॥

नवसें कन्यापुत्र होती । तरि कां करणें लागे पती ॥२॥

जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥३॥

३३०

मारगीं बहुत । या चि गेले साधुसंत ॥१॥

नका जाऊ आडराणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ध्रु.॥

चोखाळिल्या वाटा । न लगे पुसाव्या धोपटा ॥२॥

झळकती पताका । गरुड टके म्हणे तुका ॥३॥

३३१

कार्तिकीचा सोहळा । चला जाऊं पाहूं डोळां । आले वैकुंठ जवळां । सन्निध पंढरीये ॥१॥

पीक पिकलें घुमरी । प्रेम न समाये अंबरीं । अवघी मातली पंढरी । घरोघरीं सुकाळ ॥ध्रु.॥

चालती स्थिर स्थिर । गरुड टकयांचे भार । गर्जती गंभीर । टाळ श्रुति मृदंग ॥२॥

मिळािलिया भद्रजाती । कैशा आनंदें डुलती । शूर उठावती । एका एक आगळे ॥३॥

नामामृत कल्लोळ । वृंदें कोंदलीं सकळ । आले वैष्णवदळ । कळिकाळ कांपती ॥४॥

आस करिती ब्रम्हादिक । देखुनि वाळवंटीचें सुख । धन्य धन्य मृत्युलोक । म्हणती भाग्याचे कैसे ॥५॥

मरण मुक वाराणसी । पितृॠण गया नासी । उधार नाहीं पंढरीसि । पायापाशीं विठोबाच्या ॥६॥

तुका म्हणे आतां । काय करणें आम्हां चिंता । सकळ सिद्धींचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ॥७॥

३३२

जया दोषां परीहार । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । ते हरती अपार । पंढरपुर देखिलिया ॥१॥

धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागा सरोवर । पद्मातीर्थी विठ्ठल वीर । क्रीडास्थळ वेणुनादीं ॥ध्रु.॥

सकळतीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार । होतो नामाचा गजर । असुरकाळ कांपती ॥२॥

नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठाया । धन्य भाग्य जयां । जे पंढरपूर देखती ॥३॥

उपजोनि संसारीं । एक वेळ पाहें पा पंढरी । महा दोषां कैची उरी । देवभक्त देखिलिया ॥४॥

ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी । सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ॥५॥

तें सुख वर्णावया गति । एवढी कैची मज मति । जे पंढरपुरा जाती । ते पावती वैकुंठ ॥६॥

तुका म्हणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा । अधम जन्मांतरिचा । तया पंढरी नावडे ॥७॥

३३३

एक नेणतां नाडली । एकां जाणिवेची भुली ॥१॥

बोलों नेणें मुकें । वेडें वाचाळ काय निकें ॥ध्रु.॥

दोहीं सवा नाड । विहीर एकीकडे आड ॥२॥

तुका म्हणे कर्म । तुझें कळों नेदी वर्म ॥३॥

३३४

म्हणवितों दास । मज एवढी च आस ॥१॥

परी ते अंगीं नाहीं वर्म । करीं आपुला तूं धर्म ॥ध्रु.॥

बडबडितों तोंडें । रितें भावेंविण धेंडें ॥२॥

तुका म्हणे बरा । दावूं जाणतों पसारा ॥३॥

३३५

पूजा समाधानें । अतिशयें वाढे सीण ॥१॥

हें तों जाणां तुम्ही संत । आहे बोलिली ते नीत ॥ध्रु.॥

पाहिजे तें केलें । सहज प्रसंगीं घडलें ॥२॥

तुका म्हणे माथा । पायीं ठेवीं तुम्हां संतां ॥३॥

३३६

स्वप्नीचिया गोष्टी । मज धरिलें होतें वेठी । जालिया सेवटीं । जालें लटिकें सकळ ॥१॥

वायां भाकिली करुणा । मूळ पावावया सिणा । राव रंक राणा । कैंचे स्थानावरि आहे ॥ध्रु.॥

सोसिलें तें अंगें । खरें होतें नव्हतां जागें । अनुभव ही सांगे । दुःखें डोळे उघडीले ॥२॥

तुका म्हणे संतीं । सावचित केलें अंतीं । नाहीं तरि होती । टाळी बैसोनि राहिली ॥३॥

३३७

आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठ अतिवादी ॥१॥

याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं ॥ध्रु.॥

काळकुट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्ष देतें ॥२॥

तुका म्हणे बरी जातीसवें भेटी । नवनीत पोटीं सांटविलें ॥३॥

३३८

बाळपणीं हरि । खेळे मथुरेमाझारी । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी ।

मुख पाहे माता । सुख न माये चित्ता । धन्य मानव संचिता । वोडवलें आजि ॥१॥

बाळ चांगलें वो । बाळ चांगलें वो । म्हणतां चांगलें । वेळ लागे तया बोलें ।

जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥ध्रु.॥

मिळोनियां याती । येती नारी कुमारी बहुती । नाही आठव त्या चित्तीं । देहभाव कांहीं ।

विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेकुरें । धाक सांडोनियां येरें । तान भूक नाहीं ॥२॥

एकी असतील घरीं । चित्त तयापासीं परी । वेगीं करोनि वोसरी । तेथें जाऊं पाहे ।

लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनियां सेज । तेथें धाव घाली ॥३॥

वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा । बाळा खेळवी अबला । त्याही विसरल्या ।

कुमर कुमारी । नाभाव हा शरीरीं । दृष्टी न फिरे माघारी । तया देखतां हे ॥४॥

वैरभाव नाहीं । आप पर कोणीं कांहीं । शोक मोह दुःख ठायीं । तया निरसलीं ।

तुका म्हणे सुखी । केलीं आपणासारिखीं । स्वामी माझा कवतुकें । बाळवेषें खेळे ॥५॥

३३९

अशोकाच्या वनीं सीता शोक करी । कां हों अंतरले रघुनाथ दुरी ।

येउनि गुंफेमाजी दुष्टें केली चोरी । कांहो मज आणिले अवघड लंकापुरी ॥१॥

सांगा वो त्रीजटे सखिये ऐसी मात । देईल कां नेदी भेटी रघुनाथ ।

मन उतावळि जाला दुरी पंथ । राहों न सके प्राण माझा कुडी आंत ॥ध्रु.॥

काय दुष्ट आचरण होतें म्यां केलें । तीर्थ व्रत होतें कवणाचें भंगीलें ।

गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें । न कळे वो संचित चरण अंतरले ॥२॥

नाडियेलें आशा मृगकांतिसोने । धाडिलें रघुनाथा पाठिलागे तेणें ।

उलंघिली आज्ञा माव काय मी जाणें । देखुनी सूनाट घेउनि आलें सुनें ॥३॥

नाहीं मूळ मारग लाग अणीक सोये । एकाविण नामें रघुनाथाच्या माये ।

उपटी पक्षिया एक देउनि पाये । उदकवेढ्यामध्यें तेथें चाले काये ॥४॥

जनकाची नंदिनी दुःखें ग्लानी थोरी । चुकली कुरंगिणी मेळा तैशा परी ।

संमोखी त्रीजटा स्थिर स्थिर वो करी । घेइल तुकयास्वामी राम लंकापुरी ॥५॥

३४०

वीट नेघे ऐसें रांधा । जेणें बाधा उपजे ना ॥१॥

तरी च तें गोड राहे । निरें पाहे स्वयंभ ॥ध्रु.॥

आणिकां गुणां पोटीं वाव । दावी भाव आपुला ॥२॥

तुका म्हणे शुद्ध जाती । ते मागुती परतेना ॥३॥

३४१

नव्हतों सावचित । तेणें अंतरलें हित ॥१॥

पडिला नामाचा विसर । वाढविला संवसार ॥ध्रु.॥

लटिक्याचे पुरीं । वाहोनियां गेलों दुरी ॥२॥

तुका म्हणे नाव । आम्हां सांपडला भाव ॥३॥

३४२

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥१॥

आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥ध्रु.॥

देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांटवण घरोघरीं ॥२॥

देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥३ ॥

हित तरी होय गातां अईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥४॥

तुका म्हणे होसी भावें चि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची॥५॥

३४३

काय उणें आम्हां विठोबाचे पाई । नाहीं ऐसें काई येथें एक ॥१॥

ते हें भोंवतालें ठायीं वांटूं मन । बराडी करून दारोदारीं ॥ध्रु.॥

कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणीक आगळा दुजा सांगा ॥२॥

तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गावीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥३॥

३४४

सेवितों रस तो वांटितों आणिकां । घ्या रे होऊं नका राणभरी ॥१॥

विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तो चि एक दानशूर दाता ॥ध्रु.॥

मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धी याचे पायीं ॥२॥

तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥३॥

३४५

ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्याच्या दरशनें तुटे भवबंदु ।

जे कां सिच्चदानंदीं नित्यानंदु । जे कां मोक्षसिद्धी तीर्थ वंदू रे ॥१॥

भाव सर्वकारण मूळ वंदु । सदा समबुद्धि नास्ति भेदु।

भूतकृपा मोडीं द्वेषकंदु । शत्रु मित्र पुत्र सम करीं बंधु रे ॥ध्रु.॥

मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं ।

लघुत्व सर्वभावें अंगीकारीं । सांडीमांडी मीतूंपण ऐसी थोरी रे ॥२॥

अर्थकामचाड नाहीं चिंता । मानामान मोह माया मिथ्या ।

वर्ते समाधानीं जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचिता रे ॥३॥

मनीं दृढ धरीं विश्वास । नाहीं सांडीमांडीचा सायास ।

साधुदर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विटला जाणीवेस रे ॥४॥

३४६

भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवुनियां ॥१॥

त्याचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी । भावा एका साठीं । खांदां वाहे आपुल्या ॥ध्रु.॥

सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥२॥

भुक्तिमुक्तिची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता । तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥३॥

३४७

जें का रंजलें गांजलें । त्यासि म्हणे जो आपुलें ॥१॥

तो चि साधु ओळखावा । देव तेथें चि जाणावा ॥ध्रु.॥

मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥२॥

ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो ह्रदयीं ॥३॥

दया करणें जें पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ॥४॥

तुका म्हणे सांगूं किती । तो चि भगवंताची मूर्ती ॥५॥

३४८

याजसाठीं भक्ति । जगीं रूढवावया ख्याति ॥१॥

नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलाया सहजें ॥ध्रु.॥

गौरव यासाटीं । स्वामिसेवेची कसोटी ॥२॥

तुका म्हणे अळंकारा । देवभक्त लोकीं खरा ॥३॥

३४९

अमंगळ वाणी । नये ऐकों ते कानीं ॥१॥

जो हे दूषी हरिची कथा । त्यासि क्षयरोगव्यथा ॥ध्रु.॥

याति वर्ण श्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ठ ॥२॥

तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप ॥३॥

३५०

कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥१॥

वाचे नुच्चारी गोविंदा । सदा करी परनिंदा ॥ध्रु.॥

कैसा निरयगांवा । जाऊं न पवे विसावा ॥२॥

तुका म्हणे दंड । कैसा न पवे तो लंड ॥३॥

३५१

आचरणा ठाव । नाहीं अंगीं स्वता भाव ॥१॥

करवी आणिकांचे घात । खोडी काढूनि पंडित ॥ध्रु.॥

श्वानाचियापरी । मिष्टान्नासि विटाळ करी ॥२॥

तुका म्हणे ऐसा । सटवे चि ना पांचा दिसां ॥३॥

३५२

गर्भाचें धारण । तिनें वागविला सिण ॥१॥

व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घली च तोंडा ॥ध्रु.॥

उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ॥२॥

तुका म्हणे जाय । नरका अभक्ताची माय ॥३॥

३५३

पतनासि जे नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ॥१॥

विधीपुरतें कारण । बहु वारावें वचन ॥ध्रु.॥

सर्वस्वासि नाडी । ऐसी लाघवाची बेडी ॥२॥

तुका म्हणे दुरी । राखतां हे तों ची बरी ॥३॥

३५४

देव आड जाला । तो भोगिता मी उगला । अवघा निवारला । शीण शुभाअशुभाचा ॥१॥

जीवशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें । कैचीं येथें लोकें । हा आभास अनित्य ॥ध्रु.॥

विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग । वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ तयाचा ॥२॥

अवघी एकाची च वीण । तेथें कैचें भिन्नाभिन्न । वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥३॥

प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस । पायापाशीं वास । निकट नव्हे निराळा ॥४॥

मंबाजी गोसावी यांनीं स्वामीस पीडा केली - अभंग ॥५॥

३५५

न सोडीं न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ॥१॥

भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज ॥ध्रु.॥

शतखंड देह शस्त्रधारी । करितां परी न भीयें ॥२॥

तुका म्हणे केली आधीं । दृढ बुद्धी सावध ॥३॥

३५६

बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि आंत क्षमा अंगी कांटीवरी मारविलें ॥१॥

शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥२॥

तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवूनि घेतलें रे ॥३॥

३५७

पावलों पावलों । देवा पावलों रे ॥१॥

बरवें संचित होतें तैसें जालें रें । आतां काय बोलों रे ॥२॥

सोज्ज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे । तुका म्हणे करूनि वेगळा केलों रे ॥३॥

३५८

कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥१॥

मुळीं वर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥ध्रु.॥

होणार होऊनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥२॥

तुका म्हणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ॥३॥

३५९

सोडवा सोडवा । सोडवा हो अनंता ॥१॥

तुजविण ऐसा । कोण दुजा प्राणदाता ॥ध्रु.॥

कोणा लाज नेणां ऐसें । आणिकां शरण आम्ही जातां ॥२॥

तुका म्हणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ॥३॥

॥५॥

३६०

पुत्राची वार्ता । शुभ ऐके जेवीं माता ॥१॥

तैसें राहो माझें मन । गातां ऐकतां हरिगुण ॥ध्रु.॥

नादें लुब्ध जाला मृग । देह विसरला अंग ॥२॥

तुका म्हणे पाहे । कासवीचें पिलें माये ॥३॥

३६१

ध्यानी योगीराज बैसले कपाटीं । लागे पाठोवाटीं तयांचिया ॥१॥

तान भुक त्यांचें राखे शीत उष्ण । जाले उदासीन देहभाव ॥ध्रु.॥

कोण सखें तयां आणीक सोयरें । असे त्यां दुसरें हरीविण ॥२॥

कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद । नाहीं राज्यमद घडी तयां ॥३॥

तुका म्हणे विष अमृता समान । कृपा नारायण करितां होय ॥४॥

३६२

न व्हावें तें जालें देखियेले पाय । आतां फिरूं काय मागें देवा ॥१॥

बहु दिस होतों करीत हे आस । तें आलें सायासें फळ आजि ॥ध्रु.॥

कोठवरि जिणें संसाराच्या आशा । उगवो हा फांसा येथूनियां ॥२॥

बुडालीं तयांचा मूळ ना मारग । लागे तो लाग सांडूनियां ॥३॥

पुढें उलंघितां दुःखाचे डोंगर । नाहीं अंतपार गर्भवासा ॥४॥

तुका म्हणे कास धरीन पीतांबरीं । तूं भवसागरीं तारूं देवा ॥५॥

३६३

वैकुंठा जावया तपाचे सायास । करणें जीवा नास न लगे कांहीं ॥१॥

तया पुंडलिकें केला उपकार । फेडावया भार पृथीवीचा ॥२॥

तुका म्हणे सोपी केली पायवाट । पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥३॥

३६४

शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥१॥

येथें केले नव्हे काई । लंडीपण खोटें भाई ॥ध्रु.॥

करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥२॥

तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ॥३॥

३६५

म्हणउनी खेळ मांडियेला ऐसा । नाहीं कोणी दिशा वर्जीयेली ॥१॥

माझिया गोतें हें वसलें सकळ । न देखिजे मूळ विटाळाचें ॥ध्रु.॥

करूनि ओळखी दिली एकसरें । न देखों दुसरें विषमासी ॥२॥

तुका म्हणे नाहीं काळापाशीं गोवा । स्थिति मति देवा वांचूनियां ॥३॥

३६६

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥१॥

नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ध्रु.॥

पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥२॥

तुका म्हणे याती । हो का तयाची भलती ॥३॥

३६७

करोत तपादि साधनें । कोणी साधो गोरांजनें ॥१॥

आम्ही न वजों तया वाटा । नाचूं पंढरीचोहटां ॥ध्रु.॥

पावोत आत्मिस्थिति । कोणी म्हणोत उत्तम मुक्ति ॥२॥

तुका म्हणे छंद । आम्हां हरिच्या दासां निंद्य ॥३॥

॥ स्वामीस सद्गुरूची कृपा जाली ॥ - अभंग ४

३६८

सद्गुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥

सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ध्रु.॥

भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥२॥

कांहीं कळहे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा जाली ॥३॥

राघवचैतन्य कैशवचैतन्य । सांगितली खुण मळिकेची ॥४॥

बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥५॥

माघाशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥६॥

३६९

माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुराजा ॥१॥

आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें गुंपा कांहीं कोठें ॥ध्रु.॥

जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥२॥

जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटीं ॥३॥

तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरु पांडुरंग ॥४॥

३७०

घालुनियां भार राहिलों निश्चितीं । निरविलें संतीं विठोबासि ॥१॥

लावूनियां हातें कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥ध्रु.॥

कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरें तीरीं उभा ॥२॥

खुंटले सायास अणिकि या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥३॥

तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका म्हणे संता लाज माझी ॥४॥

३७१

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासि उदार जालों आतां ॥१॥

तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ॥ध्रु.॥

ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥२॥

जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हें चि आतां नाही लाज तुम्हां ॥३॥

तुका म्हणे संतीं घातला हावाला । न सोडीं विठ्ठला पाय आतां ॥४॥

॥४॥

३७२

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥१॥

ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ॥धृ.॥

देवाची जतन । तया बाधूं न शके अग्न ॥२॥

तुका म्हणे हरी । प्रर्‍हादासि यत्न करी ॥३॥

३७३

भले भणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥१॥

ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नास अल्प वर्म ॥धृ.॥

पाकसिद्धी लागे संचित आइतें । घडतां सोई तें तेव्हां गोड ॥२॥

तुका म्हणे बरे सांगतां चि गोष्टी । रणभूमि दृष्टी न पडे तों ॥३॥

३७४

संतसमागम एखादिया परी । राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ॥१॥

तेथें रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥धृ.॥

कामारी बटीक सेवेचे सेवक । दीनपण रंक तेथें भलें ॥२॥

तुका म्हणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ॥३॥

३७५

एकली राणागोविंदा सवें । गेलें ठावें तें जालें ॥१॥

मज न म्हणा न म्हणा शिंदळी । नाहीं विषम जवळीं आतळलें ॥धृ.॥

नव्हती देखिली म्यां वाट । म्हणोनि हा धीट संग केला ॥२॥

भेणें मिठी दिधली गळां । सेजे जवळ दडालें ॥३॥

सलगी धरी पयोधर । साहाती करमुर सवें ॥४॥

आहेव मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ॥५॥

तुका म्हणे सेवटा नेलें । संपादिलें उभयतां ॥६॥

३७६

होतें बहुत हें दिवस मानसीं । आजि नवस हे फळले नवसीं ।

व्हावी भेटी ते जाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो ॥१॥

स्थिर स्थिर मज चि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा ।

येथें आड मज न साहावे वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ॥धृ.॥

मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदी वेगळें होऊं एकी घडी ।

नाहीं लौकिक स्मरला आवडी । आता येणें काळें या वो लोभें वेडी वो ॥२॥

उदयीं उदय साधिला अवकाश । निश्चिंतीनें निश्चिंती सावकाश ।

धरिये गोडी बहुत आला रस । तुका म्हणे हा मागुता न ये दिवस वो ॥३॥

३७७

स्वयें सुखाचे जाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव ।

अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्वसाक्ष तेथें चि त्याचा जीव वो ॥१॥

आपआपणाशीं करिती नवल । परि वादावाद न संडिती बोल ।

एका मेघःशामें जलधर वोल । रसीं उतावळि हृदय सखोल वो ॥धृ.॥

एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरीं ।

अंध बहिर हे प्रेत लोकां चारी । त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरी वो ॥२॥

स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर ।

परस्परें हे सादरा सादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ॥३॥

भक्तिवल्लभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐशी ठेवी उरी ।

दुरी जवळी संचिता ऐसें धरी । रंगा रंगा ऐसें होणें लागे हरि वो ॥४॥

तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें वोसंडून ।

पडिलें कानीं त्या जीवाचें जतन । धरियेले एकाभावें हृदयीं चरण वो ॥५॥

३७८

आजि का वो तूं दिससी दुश्चिती । म्हणी एका मन लगे तुझ्या चित्तीं ।

दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ॥१॥

सर सर परती जालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड ।

व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थार दो ठायीं जाला खंड वो ॥धृ ॥

होतें तैसें तें उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी ।

नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ॥२॥

नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें ।

नाहीं अचळ सावरावा ठावे । देखों उदासीन तुज देहभावें वो ॥३॥

कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत ।

दोघे एकवाटा बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥४॥

करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासासुना ।

परा भक्ति हे शुद्ध तुम्ही जाणा । तुका म्हणें ऐसें कळों यावें जना वो ॥५॥

३७९

भरिला उलंडूनि रिता करी घट । मीस पाणियाचें गोविंदाची चट ।

चाले झडझडां उसंतूनि वाट । पाहे पाळतूनि उभा तो चि नीट वो ॥१॥

चाळा लावियेले गोप गोपीनाथें । जाणे आवडीचें रूप जेथें तेथें ।

दावी बहुतांच्या बहुवेषपंथें । गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो ॥ध्रु.॥

मनीं आवडे तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनि आधार ।

उगा राहे कां मारिसी कंकर । मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ॥२॥

धरिली खोडी दे टाकोनियां मागें । न ये विनोद हा कामा मशीं संगें ।

मिठी घालीन या जीवाचिया त्यागें । नाहीं ठाउकी पडिलीं तुझीं सोंगें रें ॥३॥

सुख अंतरींचें बाहय ठसठसी । म्हणे विनोद हा काय सोंग यासी ।

तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंदन या थोरपणें जासी रे ॥४॥

करी कारण तें कळों नेदी कोणा । सुख अंतरींचे बाह्य रंग जाना ।

मन मिनलें रे तुका म्हणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो ॥५॥

३८०

आजि नवल मी आलें येणे राणें । भेटी अवचिती नंदाचिया कान्हें ।

गोवी सांगती वो सकळ ही जन । होतें संचित आणियेलें तेणें वो ॥१॥

गेलें होउनि न चले आतां कांहीं । साद घालितां जवळी दुजें नाहीं ।

अंगीं जडला मग उरलें तें काई । आतां राखतां गुमान भलें बाई वो ॥धृ.॥

बहुत कामें मज नाहीं आराणूक । एक सारितां तों पुढें उभें एक ।

आजि मी टाकोनि आलें सकळिक । तंव रचिलें आणिक कवतुक वो ॥२॥

चिंता करितां हरिली नारायणें । अंगसंगें मिनतां दोघेजणें ।

सुखें निर्भर जालियें त्याच्या गुणें । तुका म्हणे खुंटलें येणें जाणें वो ॥३॥

३८१

मैं भुली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ॥१॥

कान्हा रे मनमोहन लाल । सब ही बिसरूं देखें गोपाल ॥धृ.॥

काहां पग डारूं देख आनेरा । देखें तों सब वोहिन घेरा ॥२॥

हुं तों थकित भैर तुका । भागा रे सब मनका धोका ॥३॥

३८२

हरिबिन रहियां न जाये जिहिरा । कबकी थाडी देखें राहा ॥१॥

क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ॥धृ.॥

कोई सखी हरी जावे बुलावन । बार हि डारूं उसपर तन ॥२॥

तुका प्रभु कब देखें पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ॥३॥

३८३

भलो नंदाजीको डिकरो । लाज राखीलीन हमारो ॥१॥

आगळ आवो देवजी कान्हा । मैं घरछोडी आहे म्हांना ॥धृ.॥

उन्हसुं कळना वेतो भला । खसम अहंकार दादुला ॥२॥

तुका प्रभु परवली हरी । छपी आहे हुं जगाथी न्यारी ॥३॥

३८४

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहती बहु होतो उबारा ।

मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमरा ॥१॥

सखिया वेशिया तुम्ही प्राणवल्लभा । निवेदिला भाव आर्तभूत या लोभा ।

उमटली अंगीं वो सांवळी प्रभा । साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ॥ध्रु.॥

नये कळों नेदावी हे दुजियासि मात । घडावा तयासि उत्कंठा एकांत ।

एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होइल नेणों भाग्य उदित वो ॥२॥

स्वाद सीण देहभान निद्रा खंडन । पाहिले तटस्थ उन्मळित लोचन ।

अवघें वोसाऊन उरले ते चरण । तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन ॥३॥

३८५

पडिली भुली धांवतें सैराट । छंद गोविंदाचा चोजवितें वाट ।

मागें सांडोनि सकळ बोभाट । वंदीं पदांबुजें ठेवुनि ललाट वो ॥१॥

कोणी सांगा या गोविंदाची शुद्धी । होतें वहिलें लपाला आतां खांदीं ।

कोठें आड आली हे देहबुद्धी । धांवा आळवीं करुणा कृपानिधी वो ॥ध्रु.॥

मागें बहुतांचा अंतरला संग । मुळें जयाचिया तेणें केला त्याग ।

पहिलें पाहातां तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहींसें जालें जग वो ॥२॥

शोकें वियोग घडला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा ।

केला उच्चार रे घडल्या दोषांचा । जाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ॥३॥

३८६

काय उणें कां करिशील चोरी । किती सांगों तुज नाइकसी हरी ।

परपरता तूं पळोनि जासी दुरी । अनावर या लौकिका बाहेरी वो ॥१॥

माया करुणा हे करिते बहुत । किती सोसूं या जनांचे आघात ।

न पुरे अवसरु हें चि नित्यानित्य । तूं चि सोडवीं करूनि स्थिर चित्त ॥ध्रु.॥

बहुत कामें मी गुंतलियें घरीं । जासी डोळा तूं चुकावूनि हरी ।

करितां लाग न येसी च पळभरी । नाहीं सायासाची उरों दिली उरी वो ॥२॥

तुज म्हणीयें मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळियां परता ।

न लगे जोडी हे तुजविण आतां । तुकयास्वामी कान्होबा गुणभरिता वो ॥३॥

३८७

घाली कवाड टळली वाड राती । कामें व्यापिलीं कां पडिली दुश्चित्ती ।

कोणे लागला गे सदैवेचे हातीं । आजि शून्य शेजे नाहीं दिसे पती वो ॥१॥

बोले दूतिकेशीं राधा हें वचन । मशीं लाघव दाखवी नारायण ।

म्हणे कोमळ परी बहु गे निर्गुण । याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥धृ.॥

धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता । तैं पाचारिलें होउनि ये वो सीता ।

लाजिनली रूप न ये पालटितां । जाला भीमकी आपण राम सीता वो ॥२॥

सत्यभामा दान करी नारदासी । तैं कळला वो मज हृषीकेशी ।

तुळे घालितां न ये कनक वो रासी । सम तुके एक पान तुळसी वो ॥३॥

मज भुली पडली कैशापरी । आम्हां भोगूनि म्हणे मी ब्रम्हचारी ।

दिली वाट यमुने मायें खरी । तुम्हां आम्हां न कळे अद्यापवरी वो ॥४॥

जाणे जीवींचें सकळ नारायण । असे व्यापूनि तो न दिसे लपून ।

राधा संबोखिली प्रीती आलिंगून । तुका म्हणे येथें भाव चि कारण वो ॥५॥

३८८

मिळोनि गौळणी देती यशोदे गाऱ्हाणीं । दहिं दुध तुप लोणीं शिंकां नुरे कांहीं ।

मेळवुनी पोरें तेथें रिघे एकसरें । वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ॥१॥

हरि सोंकला वो हरि सोंकला वो । सोंकला तो वारीं तुज लाज नाहीं तरी ।

आम्हां सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥धृ.॥

तुज वाटतसे कोड यासि लागतसे गोड । काय हासतेसी वेड तुज लागलें वो ।

आम्ही जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी । काय सांगों भांडखोरी लाज वाटे आम्हां ॥२॥

मुख मळिण वदन उभा हाडतिये घोणे । तंव दसवंती म्हणे आणा शीक लावूं ।

थोर आणिला कांटाळा घरीं दारीं लोकपाळां । डेरा रिघोनी गुसळा तेथें लोणी खाय ॥३॥

मिळोनि सकळा दावें लावूनियां गळां । कैशा बांधिती उखळा येथें राहे उगा ।

बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसिल चोरी । डोळे घालुनियां येरी येरीकडे हांसे ॥४॥

फांकल्या सकळा उपडूनियां उखळा । मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही ।

उठिला गजर दसवंती नव्हे धीर । धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं ॥५॥

३८९

गोरस घेउनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें ।

जाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ॥१॥

सर जाऊं दे परता । मुळीं भेटलासी आतां । नाट लागलें संचिता । खेपा खुंटलिया ॥धृ.॥

आसुडी पदरा धरी आणीक दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी ।

आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा । सर परता गोवळा काय बोलतोसी ॥२॥

आम्ही येथें अधिकारी मागें केली तुम्ही चोरी । आतां कळलियावरी मागें केलें त्याचें ।

बोलिल्या हांसुनी आम्ही सासुरवासिनी । कां रे झोंबसी दुरूनी करी मात कांहीं ॥३॥

वांयां परनारी कैशा धरिसी पदरीं । तयां कळलिया उरी तुज मज नाहीं ।

जडला जिव्हारीं फांकों नेदी तया नारी । जेथें वर्म तें धरी जाऊं पाहे तियेचें ॥४॥

तया हाती सांपडल्या हाटीं पाटीं चुकाविल्या । कृष्णमळिणीं मिळाल्या त्याही न फिरती ।

तुका म्हणे खंती वांयां न धरावी चित्तीं । होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजि ॥५॥

३९०

हरी तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांपेकळी । तुझ्या दर्शनें होईन काळी । मग हें वाळी जन मज ॥१॥

उगला राहें न करीं चाळा । तुज किती सांगों रे गोवळा । तुझा खडबड कांबळा । अरे नंदबाळा आलगटा ॥धृ.॥

तुझिये अंगीं घुरट घाणी । बहु खासी दुध तुप लोणी । घरिचें बाहेरिल आणोनी । मी रे चांदणी सकुमार ॥२॥

मज ते हांसतील जन । धिःकारिती मज देखोन । अंगीं तुझें देखोनि लक्षण । मग विटंबणा होइल रे ॥३॥

तुज लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन पिशुन व्याही । आणीक मात बोलूं काहीं । मसी भीड नाहीं तुज माझी ॥४॥

वचन मोडी नेदी हात । कळलें न साहे ची मात । तुकयास्वामी गोपीनाथ । जीवन्मुक्त करूनि भोगी ॥५॥

३९१

सात पांच गौळणी आलिया मिळोनी यशोदे गाऱ्हाणें देती कैसें ।

काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळें ची कैसें।

दहिं दुध लोणी शिंकां नुरे चि कांहीं कवाड जैशाचें तैसें ।

चाळवूनि नाशिली कन्याकुमरें आमुच्या सुनांसि लाविलें पिसें गे बाइये ॥१॥

आझुनि तरी यासि सांगें बरव्या परी नाहीं तरी नाहीं उरी जीवेसाटी ।

मिळोनि सकळै जणी करूं वाखा सखीं तुज मज होईल तुटी गे बाइये ॥ध्रु.॥

नेणे आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलतें करी ।

पाळतुनि घरीं आम्ही नसतां तेथें आपण संचार करी ।

सोगया चुंबन देतो आलिंगन लोळे मेजाबाजावरी ।

शिंकीं कडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाइये ॥२॥

आतां याची चाड नाहीं आम्हां भीड सांपतां कोड पुरवूं मनिचें ।

सोसिलें बहु दिस नव्हता केला निस म्हणुनि एकुलतें तुमचें ।

चरण खांबीं जीवें बांधैन सरिसा जवें न चले कांहीं याचें ।

अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जिवाचें गे बाइये ॥३॥

घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतिसे गौळणी वेळोवेळां ।

निष्ठ वाद झणीं बोलाल सकळा क्षोभ जाइल माझ्या बाळा ।

जेथें लागे हात वाढतें नवनीत अमृताच्या कल्लोळा ।

देखोनि तुकयास्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥४॥

३९२

विरहतापें फुंदे छंद करिते जाती । हा गे तो गे सावधान सवें चि दुश्चिती ।

न सांभाळुनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळी च पडों पाहे कुळाहुनिया ती ॥१॥

खुंटलीसी जाली येथें अवघियांची गती । आपुलीं परावीं कोण नेणें भोंवती ।

त्यांचीं नांवें बोभे अहो अहो श्रीपती । नवलाव हा येरां वाटोनियां हांसती ॥धृ.॥

बाहेरी च धांवे रानां न धरी च घर । न कळे बंधना जाला तेणें संचार ।

विसरूनि गेली सासुरें की माहेर । एका अवलोकी एका पडिला विसर ॥२॥

तुका म्हणे तुम्ही अवघ्या राहा निश्चळा । न ये आतां येऊं येथें सर्वथा बळा ।

त्याचा त्याच्या मुखें अवघाची निर्वाळा । बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा ॥३॥

३९३

ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें ।

कळों नेदी माया त्याचें त्यास ठाउकें । खेळतोंसें दावी लक्षलक्षापें मुकें ॥१॥

अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे तया त्या वाहाती संकल्प मना ।

काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेवोनियां राणा ॥धृ.॥

अवघियांचा जाणें जाला मेळासा हरी । मिळोनियां जावें तेथें तया भीतरी ।

कळों नेदी घरिच्या करी गोवूनी चोरी । हातोहातीं नेती परपरत्या दुरी ॥२॥

आनंदें निर्भर आपणाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारिखें जन ।

एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न । तुका म्हणे एका नारायणा वांचून ॥३॥

३९४

खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं । तंव नग्न चि या नारी तेथें देखियेल्या ।

मांडिले विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले ॥१॥

ख्याल मांडिला रे ख्याल मांडिला रे । पायां पडतां रे न सोडी नेदी साउलां रे ॥धृ.॥

साड्या साउलीं पातळें गोंडे कसणिया चोळ्या । बुंथी घेउनी सकळा कळंबावरी पळे।

खांदी धरूनियां करीं दृष्टी घालोनि सामोरी । बैसे पाला वोढी वरी खदखदां हांसे ॥२॥

आनंदें कल्लोळ बाळा खेळती सकळ देती उलटिया चपळ । एकी एकीहूनि म्हैस वेल सुर काडी ।

एकी उगविती कोडीं । नाना परीच्या निकडी खेळ मांडियेला ॥३॥

एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । म्हणे नाहीं नेलें चोरी काय जाणों केव्हां ।

केला सकळी हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां म्हणतील घरां जावें कैशा परी ॥४॥

तंव हांसे वनमाळी वरी पाहोनी सकळी । लाजे रिघालिया जळीं मागें पुढें हात ।

लाज राखावी गोपाळा आम्हांजणींची सकळां । काय मागसी ये वेळा देऊं गुळवाटी ॥५॥

जोडोनियां कर या गे सकळी समोर । वांयां न बोलावें फार बडबड कांहीं ।

भातुकें भूषण नाहीं चाड नेघें धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ॥६॥

एक एकीकडे पाहे लाज सांडूनियां राहे । म्हणे चला आतां सये जाऊं तयापाशीं ।

जोडोनियां हात कैशा राहिल्या निवांत । तुका म्हणे केली मात लाज राखिली तयांची ॥७॥

३९५

धरिला पालव न सोडी माझा येणें । कांहीं करितां या नंदाचिया कान्हें ।

एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठें भरलें अवघड या राणें रे ॥१॥

सोडी पालव जाऊ दे मज हरी । वेळ लागला रे कोपतील घरीं ।

सासू दारुण सासरा आहे भारी । तुज मज सांगतां नाहीं उरी रे ॥ध्रु.॥

सखिया वेशिया होतिया । तुज फावलें रे फांकतां तयांसी ।

होतें अंतर तर सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥२॥

कैसी भागली हे करितां उत्तर । शक्ति मावळल्या आसुडितां कर ।

स्वामी तुकयाचा भोगिया चतुर । भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ॥३॥

३९६

गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनि जगजेटी ।

चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ॥१॥

ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळ देखावया हरी ।

मिस पाणियाचें करितील घरीं । बारा सोळा मिळोनि परस्परीं वो ॥ध्रु.॥

चिरें चोळिया त्या धुतां विसरती । ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती ।

कोणा नाठवे कोण कुळ याती । जालीं ताटस्त सकळ नेत्रपातीं वो ॥२॥

दंतधावनाचा मुखामाजी हात । वाद्यें वाजती नाइके जनमात ।

करी श्रवण कृष्णवेणुगीत । स्वामी तुकयाचा पुरवील मनोरथ वो ॥३॥

३९७

कोठें मी तुझा धरूं गेलें संग । लावियेलें जग माझ्या पाठीं ॥१॥

सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा । नको लावूं चाळा खोटा येथें ॥ध्रु.॥

रूपाच्या लावण्यें नेली चित्तवृत्ती । न देखें भोंवतीं मी ते माझी ॥२॥

तुकयाचा स्वामी माझे जीवीं च बैसला । बोलीं च अबोला करूनियां ॥३॥

३९८

गोड लागे परी सांगतां चि न ये । बैसे मिठी सये आवडीची ॥१॥

वेधलें वो येणें श्रीरंगरंगें । मीमाजी अंगें हारपलीं ॥ध्रु.॥

परते चि ना दृष्टी बैसली ते ठायीं । विसावोनि पायीं ठेलें मन ॥२॥

तुकयाच्या स्वामीसवें जाली भेटी । तेव्हां जाली तुटी मागिल्यांची ॥३॥

३९९

पाहावया माजी नभा । दिसे शोभा चांगली ॥१॥

बैसला तो माझे मनीं । नका कोणी लाजवूं ॥ध्रु.॥

जीवा आवडे जीवाहूनि । नव्हे क्षण वेगळा ॥२॥

जालें विश्वंभरा ऐसी । तुकया दासी स्वामीची ॥३॥

४००

कोणी एकी भुलली नारी । विकितां गोरस म्हणे घ्या हरी ॥१॥

देखिला डोळां बैसला मनीं । तो वदनीं उच्चारी ॥ध्रु.॥

आपुलियाचा विसर भोळा । गोविंद कळा कौतुकें ॥२॥

तुका म्हणे हांसे जन । नाहीं कान ते ठायीं ॥३॥

४०१

करूनी आइत सत्यभामा मंदिरीं रे । वाट पाहे टळोनि गेली रात्री रे ।

न येचि देव येतील कामलहरी रे । पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी रे ॥१॥

सर गा परता कळला तुझा भाव रे । कार्या पुरतें हें दाविसी लाघव रे ।

बोलतोसी तें अवघी तुझी माव रे । जाणोनि आलासी उजडता समयो रे ॥ध्रु.॥

मीच वेडी तुजला बोल नाहीं रे । दानावेळे विटंबणा जाली काय रे ।

मागुती रुद्रासि भेटी दिली तई रे । विश्वास तो तुझ्या बोला आझुनि तरी रे ॥२॥

भ्रम होता तो अवघा कळों आला रे । मानवत होतें मी भला भला रे ।

नष्टा क्रिया नाहीं मां तुझ्या बोला रे । तुकयाबंधु स्वामी कानडया कौसाल्या रे ॥३॥

४०२

तंव तो हरि म्हणे वो निजांगने वो । लाइ नीच कां देसील डोहणे वो ।

मजपें दुजें आलें तें देव जाणे वो । शब्द काय हे बोलसी ते उणे वो ॥१॥

पाहा मनीं विचारुनी आधि वो । सांडूनि देई भ्रांति करीं स्थिर बुद्धि वो ।

तंट केलें हें माझें तुझें उपाधीं वो । उघडी डोळे आझुनि तरी धरीं शुद्धि वो ॥ध्रु.॥

कोठें तरी दुनियांत वर्तले वो । स्त्रियांनीं भ्रतारा दानां दिलें वो ।

कैसा भला मी नव्हे तें सोसिलें वो । रुसतेसी तूं उफराटें नवल जालें वो ॥२॥

काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो । तुझ्या गर्वें आणविलें हनुमंतासि वो ।

कष्टी केलें मज गरुडा भीमकीसि वो । तुकयाबंधु म्हणे खरें खोटें नव्हे यासि वो ॥३॥

४०३

तंव ते म्हणे ऐका हृषीकेशी वो । नवाजिलें तुम्ही म्हणां आपणांसि वो ।

तरी कां वंचनुक सुमनासि वो । नट नाट्य बरें संपादूं जाणतोसि वो ॥१॥

सर हो परता परता हो आतां हरी । म्हणे सत्राजिताची कुमरी ।

जाणतें मी या शब्दाच्या कुसरी । ऐसें च करून ठकविलें आजिवरी ॥ध्रु.॥

भावें गेलें म्हुण न व्हावा वियोग । मनिचे आर्त जन्मांतरीं व्हावा संग ।

तों तों केलें हें पाठमोरें जग । ऐसें काय जाणें हे तुझे रंग ॥२॥

काय करूं या नागविलें कामें । लागलें तयास्तव इतुकें सोसावें ।

नाहीं तरी कां नव्हती ठावीं वर्में । परद्वारीं ऐसा हाकलिती प्रसिद्ध नांवें ॥३॥

काय किती सांगावे तुझे गुण । न फुटे वाणी निष्ठ ऐसा निर्गुण ।

आप पर न म्हणसी माय बहीण । सासूसुनास लावुनि पाहासी भांडण ॥४॥

इतुकियावरी म्हणे वैकुंठिंचा राणा । होऊन गेलें तें नये आणूं मना ।

आतां न करीं तैसें करी क्रिया आणा । भक्तवत्सल म्हणे तुकयाबंधु कान्हा ॥५॥

४०४

कान्हो एकली रे एकली रे । तुजसवें चुकलें रे । भय वाटे वनीं मज अबळा धाकली रे ॥१॥

निघतां घरीं आई बा वारी । तुजसवें कां आलियें हरी ॥ध्रु.॥

लोक वाटा सांगती खोटा । परी मी चटा लागलियें ॥२॥

पिकल्या बोरी जालें सामोरी । काय जाणें कोठें राहिला हरी ॥३॥

आड खुंट जालिया जाळी । काय जाणों कान्हें मांडिली रळी ॥४॥

तुका म्हणे जाऊं आलिया वाटा । पाहों हरी पायीं न मोडे कांटा ॥५॥

४०५

क्याला मज आयो वारितेसी घरा । खेळतों सोकरा नंदाचा मी ॥१॥

बहु दिसीं जाली यासीं मज भेटी । आतां वाटे तुटी न परावी ॥ध्रु.॥

कोवळें बोलतो मना आवरतें । डोळियाचें पातें ढापवेना ॥२॥

आजि सकळांसी आलें चोलुनियां । कां गो पाठी वांयां पुलविली ॥३॥

तुमचें तें काय खोळंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घरीं ॥४॥

तुकयाचा धनी गोकुळनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ॥५॥

४०६

आता न यें मागें । मी आलें याच्या रागें । काय माझें जगें । कोपोनियां करावें ॥१॥

कां गो कलित्यां कोल्हाल । तुम्ही भलत्या च सकल । वेचाल ते बोल । झुटे होती बोलिले ॥ध्रु.॥

याचे भेटी माझें मन । स्वरुपीं ठाकले लोचन । वेगळें तें क्षण आतां होऊं नावरे ॥२॥

काज काम नको जालें । बीजें नावरे बोलिलें । याचिया भेदिलें । कामबाणीं अंतर ॥३॥

या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें । घेतलें तें मनें । आतां मागें न फिरे ॥४॥

आतां मोटी वार । माझी नका धरूं चार । तुकयाचा दातार । शेजे तो मी सुतलों ॥५॥

४०७

हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥१॥

अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ॥ध्रु.॥

वाचा वाच्यत्वासि न ये । कोठें काय करावें ॥२॥

तुका म्हणे देवा ऐशा । देवपिशा उदारा ॥३॥

४०८

गौळणी आल्या वाज । म्हणती या गे राखों आज । सांपडवुनी माजघरांत धरुनी कोंडूं ।

उघडें कवाड उभ्या काळोशाचे आड । साता पांचा एक भीड मौनेंची ठेल्या ॥१॥

नित्य सोंकवला नेदी । सांगों चित्त बोला । आतां सांपडतां याला कोण सोडी जीवें ॥ध्रु.॥

जाणोनियां हरी त्याच घरा आला चोरी । गडियां ठेवुनी बाहेरी पूर्वद्वारें शिरे ।

त्यांच्या भयाभीत चाले पिलंगत भोंवतालें । पाहे तंव देखियेलें नवनीत पुढें ॥२॥

उतरोनि सिंकें । पाहे चाखोनियां निकें । गोड तें चि एका एकें । हातीं लांबवितो ।

जाणे राखती तयांसि । तेथें अधिक चि नासी । माग लावी हात पुसी । चोरी जाणावया ॥३॥

जाणोनियां नारी । मूळ वर्मद्वार धरी । माजे कोंडूनी भीतरी । घरांत धरीयेला ।

कां रे नागविसी । माझे मुळीं लागलासी । आणवीन तुजपासीं । मागें खादलें तें ॥४॥

दोही संदी बाहे । धरूनि नेती माते पाहे । काय नासी केली आहे । घरामाजी येणें ।

तुका म्हणे मुख । त्याचें वाढों नेदी दुःख । दसवंती कवतुक। करुनी रंजविल्या ॥३॥

४०९

आलियें धांवति धांवति भेट होइल म्हुण । तंव ते टळली वेळ वो माझा उरला सीण ॥१॥

आतां काय करूं सांग वो मज भेटेल कैसा । हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ॥ध्रु.॥

लाविला उशीर बहुतीं बहु ओढिती ओढा । सांभाळितां सांग असांग दुःख पावल्यें पीडा ॥२॥

जळो आतां संसारु वो कई शेवट पुरे । तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ॥३॥

४१०

आणीक काय थोडीं । परि तें फार खोटीं कुडीं ॥१॥

सदा मोकळीं च गुरें । होती फजीत तीं पोरें ॥ध्रु.॥

सदा घालिता हुंबरी । एक एकांचे न करी ॥२॥

तुका म्हणे घरीं माय । वेळोवेळां मारी ॥३॥

४११

बहुतांचे संगती । बहु पावलों फजिती ॥१॥

बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ॥ध्रु.॥

माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ॥२॥

तुका म्हणी काई । किती म्हणों बाप आई ॥३॥

४१२

गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ॥१॥

चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्हीं गोपाळा छंद केले ॥ध्रु.॥

मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ॥२॥

मायबापा लाड दाखविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ॥३॥

निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी । ऐसा म्हणों बळी आमुचा स्वामी ॥४॥

तुका म्हणे सरसी असों येणें वोघें । लागोनि संबंधें सर्वकाळ ॥५॥

डांका - अभंग ८

४१३

चौक भरियेला आसनीं पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनि ये धांवोनी झडकरी ॥१॥

रंगा येई वो विठाई सांवळिये डोळसे । तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ॥ध्रु.॥

रजतमधुपारती । पंचप्राणांची आरती । अवघी सारोनी आइती । ये धांवती झडकरी ॥२॥

मन मारोनियां मेंढा । आशा मनसा तृष्णा सुटी । भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनि केला हाकारा ॥३॥

डांका अनुहात गजरे । येउनि अंगासी संचरे । आपुला घेउनी पुरस्कार । आरोग्य करीं तुकयासी ॥४॥

४१४

साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा । त्रिगुणाचा फुलवरा । आणा विनति सांगतों ॥१॥

माझें दैवत हें रंगीं । नाचे वैष्णवांच्या संगीं । भरलें मग अंगीं । निवाड करी दोहींचा ॥ध्रु.॥

तुझें आहे तुजपासीं । परि तूं जागा चुकलासी । चिवडुनियां नासी । तुझ्या घरिच्यांनीं केली ॥२॥

आतां न पडे ठावें । वांचूनियां माझ्या देवें । अंधकार व्हावें । नासु ठाव शोधावा ॥३॥

आंधळ्यासी डोळे । देते पांगुळासी पाय । वांजा पुत्र फळे । नवस पुरविते विठाई ॥४॥

उगविलीं कोडीं । मागें कितेकांचीं बापुडीं । तुका म्हणे घडी । न लगे नवस द्या आधीं ॥५॥

४१५

विनति घातली अवधारीं । मज देई वो अभय करीं । पीडिलों खेचरीं । आणीक वारी नांवांची ॥१॥

रंगा येई वो एकला रंग वोडवला । हरिनाम उठिला गजर केला हाकारा ॥ध्रु.॥

देवांचे दैवते । तुज नमिलें आदिनाथे । ये वो कृपावंते । भोगा माझ्या धांवति ॥२॥

न लवीं आतां वेळ । आइत सारिली सकळ । तुका म्हणे कुळ । आमुचिये दैवते ॥३॥

४१६

माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा । त्रिभुवनीं याचा । ठसा न लगे पुसावें ॥१॥

या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी । करील झाडणी । भूत काढी संसार ॥ध्रु.॥

पडिले विषयांचे गोंधळीं । ते त्रिगुण आकळी । हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ॥२॥

घेतला अहंकार । काम क्रोध या मत्सरें । पळती प्रेमभरें । अवघे ठाव सांडुनी ॥३॥

घेतलासे पुरा । माया ममता आसरा । अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ॥४॥

तुका म्हणे द्यावा भाव । फिटेल मनिचा संदेह । आणीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥५॥

४१७

पुढें येते देवी । तिची जती चालों द्यावी । मागील झाडावी । झाडा मान आसडी ॥१॥

एकवीरा आली अंगा । आतां निवारील रोगा । माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें करावी ॥ध्रु.॥

मेंढा मारावा लोवाळ । पूजा पावली सकळ । तुम्हीं केलें बळ । मग मी ठायीं न पडें ॥२॥

तुका म्हणें मुळीं । लागली ते आली कुळीं । वंदुनी सकळीं । जीवें भावों ओवाळा ॥३॥

४१८

अवघ्या जेष्ठादेवी । कोण पूजनाचा ठाव । धरितां चि भाव । कोठें नाहींसें जालें ॥१॥

दिसे सारिखें सारिखें । परि तें कारणीं पारिखें । तळीं गेलें देखें । वरी टोले न साहाती ॥ध्रु.॥

पट एका शिरीं । यथाविधीनें त्या येरी । बसकोळ्या घागरी । डेरे रांझण गाडगीं ॥२॥

तुका म्हणे माना । येथें कोणीं रुसावें ना । आपुलाल्या स्थानां । जेथें त्या चि शोभल्या ॥३॥

४१९

खेचर खडतर । काळ कांपती असुर । नांदे भीमातीर । पंढरपुर पाटणीं ॥१॥

आतां करी कां रे हाकारा । सहस्र नामें एकसरा । दवडिते खेचरा । अंगसंगें धरूनी ॥ध्रु.॥

सीते जाली झडपणी । राहाणे वासुगीच्या बनीं । पावली जननी । झोंटि मोकळिया केशी ॥२॥

लाविलें कावरें । प्रल्हादा म्हैसासुरें । आली येकसरें । दांत खात रंगासी ॥३॥

वसुदेवाचीं बाळें । सात खादलीं ज्या काळें। आली भोगवेळे । तया कारणें तेथें ॥४॥

पांडवें बापुडीं । वाज केलीं फिरती वेडीं । धांवोनियां काढी । अंगसंगें त्राहाविलीं ॥५॥

नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण । न विचारितां हीण । भाव देखे जयाचा ॥६॥

कुळीची कुळदेवता । तुका म्हणे आम्हां माता । काय भय भूतां । काळ यमदूताचें ॥७॥

४२०

देवी देव जाला भोग सरला यावरी । सांगाया दुसरी ऐसी नाहीं उरली ॥१॥

हरिनाम देवनाम तुम्ही गाऊनियां जागा । पेंठवणी मागा नका ठेवूं लिगाड ॥ध्रु.॥

शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक । ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ॥२॥

गुंडाळा देव्हारा मान देती मानकरी । तुका म्हणे बरीं आजि कोडीं उगविलीं ॥३॥

॥८॥

४२१

जाली झडपणी खडतर देवता । संचरली आतां निघों नये ॥१॥

मज उपचार झणी उपचार झणी आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ॥ध्रु.॥

नेऊनियां घाला चंद्रभागे तिरीं । जीवा नाहीं उरी कांहीं आतां ॥२॥

तुका म्हणे कळों आलें वर्तमान । माझें तों वचन आच्छादलें ॥३॥

४२२

अंगीं देवी खेळे । कां रे तुम्हासी न कळे । कोणाचे हे चाळे । सुख दुःख न मनितां ॥१॥

मीं तों आतां येथें नाहीं । ओळखी वचनाच्या ठायीं । पालटाचा घेई । भाव खरें लोपे ना ॥ध्रु.॥

आपुलाले तुम्ही पुसा । सोवा एव्याच सरिसा । थिरावल्या कैसा काय । जाणों विचार ॥२॥

तुका म्हणे लाभकाळ । तेथें नसावें शीतळ । मग तैशी वेळ । कोठें जाते सांपडों ॥३॥

४२३

पांगुळ जालों देवा नाहीं हात ना पाय । बैसलों जयावरी सैराट तें जाय ।

खेटितां कुंप कांटी । खुंट दरडी न पाहे । आधार नाहीं मज कोणी । बाप ना माये ॥१॥

दाते हो दान करा । जातें पंढरपुरा । न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ॥ध्रु.॥

हिंडतां गव्हानें गा । शिणलों दारोदारीं । न मिळे चि दाता कोणी । जन्मदुःखातें वारी ।

कीर्ति हे संतां मुखीं । तो चि दाखवा हरी । पांगळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥२॥

या पोटाकारणें गा । जालों पांगीला जना । न सरे चि बापमाय । भीक नाहीं खंडणा ।

पुढारा म्हणती एक । तया नाहीं करुणा । श्वान हें लागे पाठीं । आशा बहु दारुणा ॥३॥

काय मी चुकलों गा । मागें नेणवे कांहीं । न कळे चि पाप पुण्य । तेथें आठव नाहीं ।

मी माजी भुललों गा । दीप पतंगासोयी । द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥४॥

दुरोनि आलों मी गा । दुःख जालें दारुण । यावया येथवरी होतें । हें चि कारण ।

दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं जालें दरुषन । विनवितो तुका संतां । दोन्ही कर जोडून ॥५॥

४२४

देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों । करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ।

पाय डोळे म्हणतां माझे । तींहीं कैसा मोकलिलों । परदेशीं नाहीं कोणी । अंध पांगुळ जालों ॥१॥

आतां माझी करीं चिंता । दान देई भगवंता । पाठीं पोटीं नाहीं कोणी । निरवीं सज्जन संता ॥ध्रु.॥

चालतां वाट पुढें । भय वाटतें चित्तीं । बहुत जन गेलीं नाहीं आलीं मागुतीं । न देखें काय जालें।

कान तरी ऐकती । बैसलों संधिभागीं । तुज धरूनि चित्तीं ॥२॥

भाकितों करुणा गा । जैसा सांडिला ठाव । न भरें पोट कधीं नाहीं निश्चळ पाव । हिंडतां भागलों गा ।

लक्ष चौऱ्यांशी गांव । धरूनि राहिलों गा । हा चि वसता ठाव ॥३॥

भरवसा काय आतां । कोण आणि अवचिता । तैसी च जाली कीर्ति । तया मज बहुतां ।

म्हणउनि मारीं हाका । सोयी पावें पुण्यवंता । लागली भूक थोरी । तूं चि कृपाळू दाता ॥४॥

संचित सांडवलें । कांहीं होतें जवळीं । वित्त गोत पुत माया । तुटली हे लागावळी ।

निष्काम जालों देवा । होतें माझे कपाळीं । तुका म्हणे तूं चि आतां । माझा सर्वस्वें बळी ॥५॥

४२५

देखत होतों आधीं । मागें पुढें सकळ । मग हे दृष्टी गेली । वरी आले पडळ ।

तिमिर कोंदलेंसें । वाढे वाढतां प्रबळ । भीत मी जालों देवा । काय ज्याल्याचें फळ ॥१॥

आतां मज दृष्टी देई । पांडुरंगा मायबापा । शरण आलों आतां । निवारूनियां पापा ।

अंजन लेववुनी । करीं मारग सोपा । जाईन सिद्धिपंथें । अवघ्या चुकती खेपा ॥ध्रु.॥

होतसे खेद चित्ता । कांहीं नाठवे विचार । जात होतों जना । मागें तोही सांडिला आधार ।

हा ना तोसा ठाव जाला । अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज । कोणी न देती आधार ॥२॥

जोंवरि चळण गा । तोंवरि म्हणती माझा । मानिती लहान थोर देहसुखाच्या काजा । इंद्रियें मावळलीं ।

आला बागुल आजा । कैसा विपरीत जाला । तो चि देह नव्हे दुजा ॥३॥

गुंतलों या संसारें । कैसा झालोंसें अंध । मी माझें वाढवुनी । मायातृष्णेचा बाध।

स्वहित न दिसेचि । केला आपुला वध । लागले काळ पाठीं । सवें काम हे क्रोध ॥४॥

लागती चालतां गा । गुणदोषाच्या ठेंसा । सांडिली वाट मग । जालों निराळा कैसा ।

पाहातों वास तुझी । थोरी करूनी आशा । तुका म्हणे वैद्यराजा । पंढरीच्या निवासा ॥५॥

४२६

सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति जाली जन न दिसे तेथें ।

मी माजी हारपलें ठायीं जेथींचा तेथें । अदृश्य तें चि जालें कांहीं दृश्य जें होतें ॥१॥

सुखी मी निजलों गा शून्य सारूनि तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ॥ध्रु.॥

टाकिली पात्र झोळी धर्मअधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणाचा वोळसा ।

न मागें मी भीक आतां हा चि जाला भरवसा । वोळली सत्रावी गा तिणें पुरविली इच्छा ॥२॥

ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनि छंद ।

घेऊनि आला दान निजतत्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेविला भेद ॥३॥

शब्द हा बहुसार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मागें येतील त्यांसीं ।

मागोनि आली वाट सिद्धिओळीचि तैसी । तरले तरले गा आणीक ही विश्वासी ॥४॥

वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणिवनागवण नेदी लागो ठाव ।

म्हणोनि संग टाकी सेवीं अद्वैत भाव । तुका म्हणे हा चि संतीं मागें केला उपाव ॥५॥

४२७

आंधळ्यापांगळ्यांचा एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तो चि सर्व होय जाणता ।

घडी मोडी हेळामात्रें पापपुण्यसंचिता । भवदुःख कोण वारी तुजवांचुनि चिंता ॥१॥

धर्म गा जागो तुझा तूं चि कृपाळू राजा । जाणसी जीवींचें गा न सांगतां सहजा ॥ध्रु.॥

घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटीं ।

न देखे दुसरें गा । जाली अदृश्यदृष्टी । वोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी ॥२॥

आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें । न देखे न चलवे जना चालते वाटे ।

घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे । पावला त्याकारणें धांव घातली नेटें ॥३॥

बैसोनि खोळी शुक राहे गर्भ आंधळा । शीणला येरझारी दुःख आठवी वेळा ।

मागील सोसिलें तें ना भीं म्हणे गोपाळा । पावला त्याकारणें । लाज राखिली कळा ॥४॥

न देखे जो या जना तया दावी आपणा । वेगळा सुखदुःखा मोहो सांडवी धना ।

आपपर तें ही नाहीं बंधुवर्ग सज्जना । तुकया ते चि परी जाली पावें नारायणा ॥५॥

४२८

भगवंता तुजकारणें मेलों जीता चि कैसी । निष्काम बुद्धी ठेली चळण नाहीं तयासी ।

न चलती हात पाय दृष्टी फिरली कैसी । जाणतां न देखों गा क्षर आणि अक्षरासी ॥१॥

विठोबा दान दे गा तुझ्या सारिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ॥ध्रु.॥

भक्तिमुक्ति तूं चि एक होसि सिद्धीचा दाता । म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता ।

सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां । कृपादान देईं देवा येउनि सामोरा आतां ॥२॥

संसारसागरू गा भवदुःखाचें मूळ । जनवाद अंथरुण माजी केले इंगळ ।

इंयें वज्रघातें तपे उष्ण वरी जाळ । सोसिलें काय करूं दुर्भर हे चांडाळ ॥३॥

तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंघलों वरि खोडा भाव धरूनि टेंका ।

जाणवी नरनारी जागो धरम लोकां । पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका ॥४॥

नाठवे आपपर आतां काय बा करूं । सारिखा सोइसवा हारपला विचारू ।

घातला योगक्षेम तुज आपुला भारू । तुकया शरणागता देईं अभयकरू ॥५॥

वासुदेव - अभंग ६

४२९

मनु राजा एक देहपुरी । असे नांदतु त्यासि दोघी नारी।

पुत्र पौत्र संपन्न भारी । तेणें कृपा केली आम्हांवरी गा ॥१॥

म्हणउनि आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा ।

दाता तो मज भेटला इच्छा । येउनि मारग दाविला सरिसा गा॥धृ.॥

सवें घेउनि चौघेजण । आला कुमर सुलक्षण ।

कडे चुकवुनि कांटवण । ऐका आणिली तीं कोण कोण गा ॥२॥

पुढें भक्तिनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती ।

स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सद्बि आणुनि लाविलीं पंथीं गा ॥३॥

केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय ।

धर्में त्याच्या देखियेले पाय । दिलें अखय भय वारुनि दान गा ॥४॥

होतों पीडत हिंडतां गांव । पोट भरेना राहावया ठाव ।

तो येणें अवघा संदेह । म्हणे फेडियेला तुकयाचा बंधव गा ॥५॥

४३०

गातों वासुदेव मीं ऐका । चित्त ठेवुनि ठायीं भावें एका ।

डोळे झाकुनि रात्र करूं नका । काळ करीत बैसला लेखा गा ॥१॥

राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं ।

सांडावा उगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥धृ.॥

ऐसा अल्प मानवी देह । शत गणिलें अर्ध रात्र खाय ।

पुढें बालत्व पीडा रोग क्षय । काय भजनासि उरलें तें पाहें गा ॥२॥

क्षणभंगुर नाहीं भरवसा । व्हा रे सावध सोडा माया आशा ।

न चळे बळ पडेल मग फासा । पुढें हुशार थोर आहे वोळसा गा ॥३॥

कांहीं थोडें बहुत लागपाठ । करा भक्ति भाव धरा बळकट ।

तन मन ध्यान लावुनियां नीट । जर असेल करणें गोड शेवट गा ॥४॥

विनवितों सकळां जनां । कर जोडुनि थोरां लाहनां ।

दान इतुलें द्या मज दीना । म्हणे तुकयाबंधु राम म्हणा गा ॥५॥

४३१

गेले टळले पाहार तीन । काय निदसुरा अझून ।

जागे होउनि करा कांहीं दान । नका ऐकोनि झाकों लोचन गा ॥१॥

हरी राम कृष्ण वासुदेवा । जाणवितसें जना ।

चिपळ्या टाळ हातीं मुखीं घोष । नारायणा गा ॥ध्रु.॥

जें टाकेल कोणा कांहीं । फळ पुष्प अथवा तोय ।

द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥२॥

देवाकारणें भाव तस्मात । द्यावें न लगे फारसें वित्त।

जालें एक चित्त तरी बहुत । तेवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ॥३॥

आलों येथवरी बहु सायासें । करितां दान हें चि मागावयास ।

नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ॥४॥

आतां मागुता येईल फेरा । हें तों घडे या नगरा ।

म्हणे तुकयाबंधु धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ॥५॥

४३२

राम राम दोनी अक्षरें । सुलभ आणि सोपारें । जागा मागिले पाहारें । सेवटिचें गोड तें चि खरें गा ॥१॥

राम कृष्ण वासुदेवा । जाणवी जनासि । वाजवी चिपळिया । टाळ घागऱ्याघोषें गा ॥ध्रु.॥

गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिका नांवा । दान जाणोनियां करीं आवा । न ठेवीं उरीं कांहीं ठेवा गा ॥२॥

एक वेळा जाणविती । धरूनियां राहा चित्तीं । नेघें भार सांडीं कामा हातीं । नीज घेउनि फिरती गा ॥३॥

सुपात्रीं सर्व भाव । मी तों सर्व वासुदेव । जाणती कृपाळु संत महानुभाव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ॥४॥

शूर दान जीवें उदार । नाहीं वासुदेवी विसर । कीर्ति वाढे चराचर । तुका म्हणे तया नमस्कार गा ॥५॥

४३३

बोल बोले अबोलणे । जागें बाहेर आंत निजेलें । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों आंधार ना उजेडलें गा ॥१॥

वासुदेव करितों फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी कांहीं तरी दान करा । जाब नेदा तरी जातों सामोरा गा ॥धृ.॥

हातीं टाळ दिंडी मुखीं गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें । नाहीं निवडिलीं थोरलाहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ॥२॥

मी वासुदेव तत्वता । कळों येईल विचारितां । आहे ठाउका सभाग्या संतां । नाहीं दुजा आणीक मागता गा ॥३॥

काय जागाचि निजलासी । सुनें जागोन दारापासीं । तुझ्या हितापाठीं करी व्यास व्यासी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ॥४॥

ऐसें जागविलें अवघें जन । होतें संचित तींहीं केलें दान । तुका म्हणे दुबळीं कोणकोण । गेलीं वासुदेवा विसरून गा ॥५॥

४३४

रामकृष्ण गीती गात । टाळ चिपळ्या वाजवीत । छंदें आपुलिया नाचत । नीज घेऊनि फिरत गा ॥१॥

जनीं वनीं हा अवघा देव । वासनेचा हा पुसावा ठाव । मग वोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ॥धृ.॥

निज दासाची थोर आवडी । वासुदेवासि लागली गोडी । मुखीं नाम उच्चारी घडोघडीं । ऐसी करा हे वासुदेवजोडी गा ॥२॥

अवघा सारूनि सेवट जाला । प्रयत्न न चले कांहीं केला । जागा होई सांडुनि झोपेला । दान देई वासुदेवालागा ॥३॥

तुका म्हणे रे धन्य त्याचें जिणें । जींहीं घातलें वासुदेवा दान । त्याला न लगे येणें जाणें । जालें वासुदेवीं राहणे गा ॥४॥

॥६॥

गांवगुंड - अभंग १

४३५

आम्ही जालों गांवगुंड । अवघ्या पुंड भूतांसी ॥१॥

दुसरें तें खेळों आलें । एका बोले तो मियां ॥ध्रु.॥

अवघियांचा येऊं लाग । नेदूं अंग शिवाया ॥२॥

तुका म्हणे खुंटूं नाद । जिंतूं वाद सर्तीनें ॥३॥

॥१॥

जोगी - अभंग १

४३६

जग जोगी जग जोगी । जागजागे बोलती ॥१॥

जागता जगदेव । राखा कांहीं भाव ॥ध्रु.॥

अवघा क्षेत्रपाळ । पूजा सकळ ॥२॥

पूजापात्र कांहीं । फल पुष्प तोय ॥३॥

बहुतां दिसां फेरा । आला या नगरा ॥४॥

नका घेऊं भार । धर्म तो चि सार ॥५॥

तुका मागे दान । द्या जी अनन्य ॥६॥

॥१॥

सरवदा - अभंग १

४३७

एका गा ए भाई । सरवदा सांगतो काई । येथें नाडेल माई । दोघां पुत्रांची ।

ते करिती तिची विटंबना । अवघ्या प्रसद्धि जना । एक न मारितां शाहाणा । तो जाणा सुख न पवे ॥१॥

आणीक ऐका गा ए । सरवदा सांगतो काय । खरें चि बोले तो जाय । नरकामध्यें अधोगती ।

हें चौघांच्या मुखें । मना आणावें सुखें । अवघीं चुकती दुःखें । खोटें बोला नरनारी ॥ध्रु.॥

आणीक नाडेल एक जाण । सरवदा बोलतो वचन । जागें माझें म्हणोन । पडिलें खान तया घरीं ।

म्हणोन न म्हणा माझें कांहीं । निजीं निजा सुखें ठायीं । यत्न होईल तई । चोराठायीं विश्वास ॥२॥

आणीक एकी परी । सरवदा सांगतो थोरी । दुःख पावेल नारी । पतिव्रता यामधीं ।

पांचांनीं दिधली हातीं । म्हणोनि न मनावी निश्चिती । परपुरुषीं होय रती । सुखगती ते पावे ॥३॥

एकी परी । सरवदा सांगतो तें करीं । दान देतां जो न वारी । नव्हे भला भला तो तुका म्हणे आई ।

येथें नांव काई । सांगसी तें ठायीं । मरो रांडेचें ॥४॥

॥१॥

मुंढा - अभंग ३

४३८

संबाल यारा उपर तलें दोन्हो मारकी चोट । नजर करे सो ही राखे पश्वा जावे लुट ॥१॥

प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥ध्रु.॥

उडे कुदे ढुंग नचावे आगल भुलन प्यार । लडबड खडबड कांहेकां खचलावत भार ॥२॥

कहे तुका चलो एका हम जिन्होंके सात । मिलावे तो उसे देना तो ही चढावे हात ॥३॥

४३९

सब संबाल भ्याने लौंढे खडा केऊं गुंग । मदिरथी मता हुवा भुलि पाडी भंग ॥१॥

आपसकुं संबाल आपसकुं संबाल । मुंढे खुब राख ताल । मुथिवोहि बोला नहीं तो करूँगा हाल ॥ध्रु.॥

आवलका तो पीछें नहीं मुदल बिसर जाय । फिरते नहीं लाज रंडी गधे गोते खाय ॥२॥

जिन्हो खातिर इतना होता सो नहीं तुझे बेफाम । उचा जोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ॥३॥

निकल जावे चिकल जोरो मुंढे दिलदारी । जबानीकी छोड दे बात फिर एक तारी ॥४॥

कहे तुका फिसल रुका मेरेको दान देख । पकड धका गांडगुडघी मार चलाऊं आलेख ॥५॥

४४०

आवल नाम आल्ला बडा लेते भुल न जाये । इलाम त्याकालजमुपरताही तुंब बजाये ॥१॥

आल्ला एक तुं नबी एक तुं ॥ध्रु.॥

काटतें सिर पावों हात नहीं जीव उराये । आगले देखे पिछले बुझे । आपें हजुर आयें ॥२॥

सब सबरी नचाव म्याने । खडा आपनी सात । हात पावों रखते जबाब । नहीं आगली बात ॥३॥

सुनो भाई बजार नहीं । सब हि निरचे लाव । नन्हा बडा नहीं कोये एक ठोर मिलाव ॥४॥

एक तार नहीं प्यार । जीवतनकी आस । कहे तुका सो हि मुंढा । राखलिये पायेनपास ॥५॥

॥३॥

डोई फोडा - अभंग १

४४१

तम भज्याय ते बुरा जिकीर ते करे । सीर काटे ऊर कुटे ताहां सब डरे ॥१॥

ताहां एक तु ही ताहां एक तु ही । ताहां एक तु ही रे बाबा हमें तुम्हें नहीं ॥धृ.॥

दिदार देखो भुले नहीं किशे पछाने कोये । सचा नहीं पकडुं सके झुटा झुटे रोये ॥२॥

किसे कहे मेरा किन्हे सात लिया भास । नहीं मेलो मिले जीवना झुटा किया नास ॥३॥

सुनो भाई कैसा तो ही । होय तैसा होय । बाट खाना आल्ला कहना एकबारां तो ही ॥४॥

भला लिया भेक मुंढे । आपना नफा देख । कहे तुका सो ही संका । हाक आल्ला एक ॥५॥

॥१॥

मलंग - अभंग १

४४२

नजर करे सो ही जिंके बाबा दुरथी तमासा देख । लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥१॥

काहे भुला एक देखत आंखो मार तडांगो बाजार ॥धृ.॥

दमरी चमरी जो नर भुला । सोत आघो हि लत खाये ॥२॥

नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाये । कहे तुका उस असाके संग फिरफिर गोदे खाये ॥३॥

॥१॥

दरवेस -अभंग १

४४३

अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज । गाउ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ॥१॥

ख्याल मेरा साहेबका । बाबा हुवा करतार । व्हांटें आघे चढे पीठ । आपे हुवा असुवार ॥२॥

जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस । कहे तुका जो नर बुझे सो हि भया दरवेस ॥३॥

॥१॥

वैद्यगोळी - अभंग १

४४४

अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारु अल्ला खलावे । अल्ला बगर नही कोये अल्ला करे सो हि होये ॥१॥

मर्द होये वो खडा फीर नामर्दकुं नहीं धीर । आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ॥ध्रु.॥

सब रसोंका किया मार । भजनगोली एक हि सार । इमान तो सब ही सखा । थोडी तो भी लेकर ज्या ॥२॥

जिन्हो पास नीत सोये । वो हि बसकर तिरोवे । सांतो पांचो मार चलावे । उतार सो पीछे खावे ॥३॥

सब ज्वानी निकल जावे । पीछे गधडा मटी खावे । गांवढाळ सो क्या लेवे । हगवनि भरी नहि धोवे ॥४॥

मेरी दारु जिन्हें खाया । दिदार दरगां सो हि पाया । तल्हे मुंढी घाल जावे । बिगारी सोवे क्या लेवे ॥५॥

बजारका बुझे भाव । वो हि पुसता आवे ठाव । फुकट बाटु कहे तुका । लेवे सोहि लें हिसखा ॥६॥

॥१॥

गोंधळ - अभंग ३

४४५

राजस सुंदर बाळा । पाहों आलिया सकळा वो । बिबीं बिंबोनि ठेली ।

माझी परब्रम्ह वेल्हाळा वो । कोटि रविशशि माझी । परब्रम्ह वेल्हाळा वो ॥१॥

राजस विठाबाई । माझें ध्यान तुझे पायीं वो । त्यजुनियां चौघींसी । लावी आपुलिये सोई वो ॥ध्रु.॥

सकुमार साजिरी । कैसीं पाउलें गोजिरीं वो । कंठीं तुळसीमाळा ।

उभी भीवरेच्या तिरीं वो । दंत हिरया ज्योति । शंखचक्र मिरवे करीं वो ॥२॥

निर्गुण निराकार । वेदां न कळे चि आकार वो । शेषादिक श्रमले ।

श्रुती न कळे तुझा पार वो । उभारोनि बाहे । भक्तां देत अभयकर वो ॥३॥

येउनि पंढरपुरा । अवतरली सारंगधरा वो । देखोनि भक्ति भाव ।

वोरसली अमृतधारा वो । देउनि प्रेमपान्हा । तुकया स्वामीनें किंकरा वो ॥४॥

४४६

सुदिन सुवेळ । तुझा गोंधळ वो । पंच प्राण दिवटे । दोनी नेत्रांचे हिलाल वो ॥१॥

पंढरपुरनिवासे । तुझे रंगी नाचत असें वो । नवस पुरवीं माझा । मनिंची जाणोनियां इच्छा वो ॥ध्रु.॥

मांडिला देव्हारा । तुझा त्रिभुवनामाझारी वो । चौक साधियेला । नाभिकळस ठेविला वरी वो ॥२॥

बैसली देवता । पुढें वैष्णवाचें गाणें वो । उद्गारे गर्जती । कंठीं तुळसीचीं दर्शनें वो ॥३॥

स्वानंदाचे ताटीं । धूप दीप पंचारती वो । ओवाळिली माता । विठाबाई पंचभूतीं वो ॥४॥

तुझें तुज पावलें । माझा नवस पुरवीं आतां वो । तुका म्हणे राखें । आपुलिया शरणागता वो ॥५॥

४४७

सुंदर मुख साजिरें । कुंडलें मनोहर गोमटीं वो । नागर नाग खोपा । केशर कस्तुरी मळवटीं वो ।

विशाळ व्यंकट नेत्र । वैजयंती तळपे कंठीं वो । कास पीतांबराची । चंदन सुगंध साजे उटी वो ॥१॥

अतिबरवंटा बाळा । आली सुलक्षणीं गोंधळा वो । राजस तेजोराशी । मिरवी शिरोमणी वेल्हाळा वो ।

कोटि रविशशिप्रभा । लोपल्या सकळा वो । न कळे ब्रम्हादिकां । अनुपम्य इची लीळा वो ॥ध्रु.॥

सावळी सकुमार । गोरी भुजा शोभती चारी वो । सखोल वक्षस्थळ । सुढाळ पदक झळके वरी वो ।

कटीं क्षुद्र घंटिका । शब्द करिताती माधुरी वो । गर्जत चरणीं वाकी । अभिनव संगीत नृत्य करी वो ॥२॥

अष्टांगें मंडित काय । वर्णावी रूपठेवणी वो । शोधिव सुंदर रसाची ओतिली । सुगंध लावण्यखाणी वो ।

सर्वकळासंपन्न । मंजुळ बोले हास्यवदनीं वो । बहु रूपें नटली । आदिशक्ति नारायणी वो ॥३॥

घटस्थापना केली । पंढरपुरमहानगरीं वो । अस्मानी मंडप दिला । तिन्ही ताळांवरी वो ।

आरंभिला गोंधळ इनें । चंद्रभागेतिरीं वो । आली भक्तिकाजा । कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥४॥

तेहतिस कोटि देव । चौंडा अष्ट कोटि भैरव वो । आरत्या कुरवंड्या । करिती पुष्पांचा वरुषाव वो ।

नारद तुंबर गायन । ब्रम्हानंद करिती गंधर्व वो। वंदी चरणरज तेथें । तुकयाचा बंधव वो ॥५॥

४४८

शंख करिशी ज्याच्या नांवें । त्याचें तुज नाहीं ठावें ।

ऐक सांगतों एका भावें । सांपडे घरीं तें जीवउनि खावें । रे विठ्ठल ॥१॥

टिळे माळा करंडी सोंग । धरुनि चाळविलें जग ।

पसरी हात नाहीं त्याग । दावी दगड पुजी भग । रे विठ्ठल ॥२॥

राख लावुनि अंग मळी । वाये ठोके मी एक बळी ।

वासने हातीं बांधवी नळी । त्यासि येउनि गाळी । रे विठ्ठल ॥३॥

कोण तें राहडीचें सुख । वरते पाय हारतें मुख ।

करवी पीडा भोगवी दुःख । पडे नरकीं परी न पळे चि मूर्ख । रे विठ्ठल ॥४॥

सिकला फाक मारी हाका । रांडा पोरें मेळवी लोकां ।

विटंबी शरीर मागे रुका । केलें तें गेलें अवघें चि फुका । रे विठ्ठल ॥५॥

कळावें जनां मी एक बळी । उभा राहोनि मांडी फळी ।

फोडोनि गुडघे कोंपर चोळी । आपला घात करोनि आपण चि तळमळे । रे विठ्ठल ॥६॥

फुकट खेळें ठकलीं वांयां । धरुनि सोंग बोडक्या डोया ।

शिवों नये ती अंतरीं माया । संपादणीविण विटंबिली काया । रे विठ्ठल ॥७॥

धुळी माती कांहीं खेळों च नका । जवादी चंदन घ्यावा बुका ।

आपणा परिमळ आणिकां लोकां । मोलाची महिमा फजिती फुका । रे विठ्ठल ॥८॥

बहुत दुःखी जालियां खेळें । अंगीं बुद्धि नाहींत बळें ।

पाठीवरी तोबा तोंड काळें । रसना द्रवे उपस्थाच्या मुळें । रे विठ्ठल ॥९॥

काय सांगतो तें ऐका तुका । मोडा खेळ कांहीं अवगों च नका ।

चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका । धाल्यावरी बरा टाकमटिका । रे विठ्ठल ॥१०॥

४४९

ऐक बाई तुज वो कांहीं सांगतें शकुन । निजलिया भुर होसी जागें म्हणउन ॥१॥

मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न येतां हे भलें कळों कोणा लोकांसि ॥ध्रु.॥

सांगतें गुण जीवीची खुण ऐक माझी मात । बैस एका भावें माझे हातीं दे वो हात ॥२॥

बरवा घरचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ॥३॥

आहे तुझे हातीं एका नवसाचें फळ । भावा करीं साहए चहूं अठरांच्या बळें ॥४॥

करीं लागपाठ चित्त वित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज भोगईल ना हो ॥५॥

कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी । पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ॥६॥

तुका म्हणे नांद सुखें धरीं आठवण । माझ्या येती कोणी त्यांचा राख बरा मान ॥७॥

कावडे - अभंग ५

४५०

आहा रे भाई । प्रथम नमूं तो विनायक ।

ठेवुनि गुरुचरणीं मस्तक । वदेल प्रसादिक वाणी । हरिहरांचे पवाडे ॥१॥

माझी ऐसी ब्रीदावळी । दासें दासत्वें आगळी ।

पान्हेरीनें मार्ग मळी । जीवन घ्या रे कापडि हो ॥२॥

जें या सीतळाहुनि सीतळ । पातळाहुनि जें पातळ ।

प्रेमामृत रसाळ । तें हें सेवा अहो भाग्याचे ॥३॥

जिंकाल तरी जिंका रे अभिमान । दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान ।

धराल ते धरा शंभूचे चरण । दावाल पण ऐसा दावा तो ॥४॥

काळा घेऊं नेदीं वाव । आला तो राखें घावडाव ।

शुद्ध सत्वीं राखोनि भाव । म्हणा महादेव हरिहर वाणी गर्जो द्या ॥५॥

पराविया नारी माउली समान । परधनीं बाटों नेदीं मन ।

जीवित्व तें तृणासमान । स्वामिकाजीं जाण शूर म्हणों तया ॥६॥

शक्ति वेचाविया परउपकारा । खोटें खोट्याचा पसारा ।

सत्य तें भवनदीचा तारा । आळस तो न करा येथे अहो सांगतों ॥७॥

व्रत करा एकादशी सोमवार । कथा पूजन हरिजागर ।

पुण्य तें असे गातां नाचतां बहु फार । पुन्हा बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥८॥

संग संतांचा करितां बरवा । उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा ।

पंथ तो सुपंथें चालावा । उगवा वासना लिगाड ॥९॥

तुका चालवितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति चोखडी ।

पुढती पुढती अधिक गोडी । भरुनि कळस भजन आवडी केशवदास नटतसे ॥१०॥

४५१

आहा आहा रे भाई । हें अन्नदानाचें सत्र ।

पव्हे घातली सर्वत्र । पंथीं अवघे पंथ मात्र । इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥१॥

यावें तेणें घ्यावें । न सरेसें केलें सदाशिवें ।

पात्र शुद्ध पाहिजे बरवें । मंगळभावें सकळ हरि म्हणा रे ॥२॥

नव्हे हें कांहीं मोकळें । साक्षी चौघांचिया वेगळें ।

नेदी नाचों मताचिया बळें । अणु अणोरणीया आगळें । महदि महदा साक्षित्वें हरि म्हणा रे ॥३॥

हे हरि नामाची आंबिली । जगा पोटभरी केली ।

विश्रांति कल्पतरूची साउली । सकळां वर्णां सेवितां भली । म्हणा हर हर महादेव ॥४॥

तुका हरिदास तराळ । अवघे हाकारी सकळ ।

या रे वंदूं शिखरातळ । चैत्रमास पर्वकाळ महादेवदर्शनें ॥५॥

४५२

आहा रे भाई । नमो उदासीन जाले देहभावा । आळविती देवा तया नमो ॥१॥

नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती त्यांसी बोळविती त्यां नमो ॥२॥

नमो तयां संतवचनीं विश्वास । नमो भावें दास्य गुरुचें त्यां ॥३॥

नमो तया मातापित्यांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ॥४॥

नमो तया जाणे आणिकाचें सुखदुःख । राखे तान भुक तया नमो ॥५॥

परोपकारी नमो पुण्यवंता । नमो त्या दमित्या इंद्रियांसि ॥६॥

तुका म्हणे नमो हरिचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ॥७॥

४५३

आहा रे भाई । तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कळी क्रियाहीन ॥१॥

थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते थोरी दवडा वांयां बाहेरी ॥धृ.॥

बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ॥२॥

विद्याबळें वाद सांगोनियां छळी । आणिकांसि फळी मांडोनियां ॥३॥

गांविंचिया देवा नाहीं दंडवत । ब्राम्हण अतीत घडे चि ना ॥४॥

सदा सर्वकाळ करितो चि निंदा । स्वप्नीं ही गोविंदा आठवीना ॥५॥

खासेमध्यें धन पोटासि बंधन । नेणें ऐसा दानधर्म कांहीं ॥६॥

तुका म्हणे नटे दावुनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥७॥

४५४

आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ । तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ॥१॥

समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण म्हणों नये लिंगा । संत नव्हती जगा । मानसा त्या सारिखे ॥२॥

काठी म्हणों नये वेतु । अन्न म्हणों नये सांतु । राम राम हे मातु । नये म्हणों शब्द हे ॥३॥

चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वता समान । शेष वासुकी नव्हे सर्प जाण । विखाराच्या सारिखे ॥४॥

गरुड नव्हे पाखरूं । ढोर नव्हे नंदिकेश्वरू । झाड नव्हे कल्पतरू । कामधेनु गाय न म्हणावी ॥५॥

कूर्म नव्हे कासव । डुकर नव्हे वराह । ब्रम्हा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ॥६॥

गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड । परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वरीचे ॥७॥

सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु । नाहीं नाहीं चर्मांतु । कृष्णजिन व्याघ्रांबर ॥८॥

मुक्ताफळें नव्हेति गारा । खड्याऐसा नव्हे हिरा । जीव नव्हे सोइरा । बोळवीजे स्वइच्छेनें ॥९॥

गांव नव्हे द्वारावती । रणसोड नव्हे मूर्ति । तीर्थ नव्हे गोमती । मोक्ष घडे दर्शनें ॥१०॥

कृष्ण नव्हे भोगी । शंकर नव्हे जोगी । तुका पांडुरंगीं । हा प्रसाद लाधला ॥११॥

॥५॥

सौऱ्या - अभंग ११

४५५

वेसन गेलें निष्काम जालें नर नव्हे नारी । आपल्या तुटी पारख्या भेटी सौरियांचे फेरी ॥१॥

त्याचा वेध लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां । आपुलेमागें हासत रागें सावलें घालिती गळां ॥धृ.॥

जन वेषा भीतें तोंडा आमुच्या भांडपणा । कर कटीं भीमा तटीं पंढरीचा राणा ॥२॥

वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या एका भावें । टाकियेली चाड देहभाव जीवें शिवें ॥३॥

सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा । वाय तुंबामूढासवें भक्ति नाचों भावा ॥४॥

म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा । बहु जालें सुख काम चुकलों या काजा ॥५॥

४५६

आणिकां उपदेशूं नेणें नाचों आपण । मुंढा वांयां मारगेली वांयां हांसे जन ॥१॥

तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा । पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनी ॥ध्रु.॥

बाहिरल्या वेषें आंत जसें तसें । झाकलें तों बरें पोट भरे तेणें मिसें ॥२॥

तुका म्हणे केला तरी करीं शुद्ध भाव । नाहीं तरी जासी वांयां हा ना तोसा ठाव ॥३॥

४५७

टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आलें ठाव म्हणोनि देतें सिवी ॥१॥

आतां येणें छंदें नाचों विनोदें । नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ॥ध्रु.॥

कोरडे ते बोल कांगे वेचितेसी वांयां । वर्तें करूनि दावीं तुझ्या मुळीचिया ठाया ॥२॥

याजसाठीं म्या डौर धरियेला हातीं । तुका म्हणे तुम्हा गांठी सोडायाची खंती ॥३॥

४५८

मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें । धेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ॥१॥

ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची । समाधानीं उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥ध्रु.॥

न बोलतां करी चिंता न मारिता पळे । दादला सेज नावडे निजे जगझोडीचे चाळे ॥२॥

देखत आंध बहिर कानीं बोल बोलतां मुकें । तुका म्हणे पतन सोयरीं ऐसीं जालीं एकें ॥३॥

४५९

सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ॥१॥

या साहेबाचें जालें देणें वेळोवेळां न लगे येणें । आतां हाटीं काशासाठीं हिंडों पाटी दुकानें ॥ध्रु.॥

अवघ्या जणी मुंढा धणी नाचों एकें घाई । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ॥२॥

तुका म्हणे वोळगों एका तोड चिंता माया । देऊं उद्गार आतां जाऊं मुळीचिया ठाया ॥३॥

४६०

सौरी सुर जालें दुर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीही लोकीं जालें सरती ॥१॥

चाल विठाबाई अवघी पांज देई । न धरीं गुज कांहीं वाळवंटीं सांपडतां ॥ध्रु.॥

हिंडोनि चौऱ्यांशी घरें आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आंचवलें संसारा ॥२॥

लाज मेली शंका गेली नाचों महाद्वारीं । भ्रांति सावलें फिटोनि गेलें आतां कैची उरी ॥३॥

जालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरविन जीविंचें तें कोड ॥४॥

तुका म्हणे रुका करी संसारतुटी । आतां तुम्हां आम्हां कैसी जाली जीवे साटीं ॥५॥

४६१

सम सपाट वेसनकाट निःसंग जालें सौरी । कुडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ॥१॥

गाऊं रघुरामा हें चि उरलें आम्हां । नाहीं जीवतमा वित्तगोतासहीत ॥ध्रु.॥

ठाव जाला रिता झाकुनि काय आतां । कोणासवें लाज कोण दुजा पाहता ॥२॥

सौरीयांचा संग आम्हां दुरावलें जग । भिन्न जालें सुख भाव पालटला रंग ॥३॥

लाज भय झणी नाहीं तजियेलीं दोन्ही । फिराविला वेष नव्हों कोणाचीं च कोणी ॥४॥

तुका म्हणे हा आम्हां वेष दिला जेणें । जनाप्रचित सवें असों एकपणें ॥५॥

४६२

नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों । निर्लज्ज निष्काम जना वेगळे चि ठेलों ॥१॥

चाल रघुरामा न आपुल्या गांवा । तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ॥ध्रु.॥

जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे । साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ॥२॥

बहुता पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज । तुका म्हणे आतां सांडुनि लौकिक लाज ॥३॥

४६३

नीट पाट करूनि थाट । दावीतसे तोरा । आपणाकडे पाहो कोणी । निघाली बाजारा ॥१॥

ते सौरी नव्हे निकी । भक्तीविण फिकी ॥ध्रु.॥

चांग भांग करूनि सोंग । दावी माळा मुदी । रुक्याची आस धरूनि । हालवी ती फुदी ॥२॥

थोरे घरीं करी फेरी । तेथें नाचे बरी । जेथें निघे रुका । तेथें हालवी टिरी ॥३॥

आंत मांग बाहेर चांग । सौरी ती नव्हे तेग । तुका दास नटतसे । न करी त्याचा संग ॥४॥

४६४

चाल माझ्या राघो । डोंगरीं दिवा लागो ॥ध्रु.॥

घर केलें दार केलें । घरीं नाहीं वरो । सेजारणी पापिणीचीं पांच पोरें मरो ॥१॥

घरीं पांच पोरें । तीं मजहुनि आहेत थोरें । पांचांच्या बळें । खादलीं बावन केळें ॥२॥

घर केलें दार केलें । दुकान केला मोटा । पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोटा ॥३॥

दुकान केला मोटा । तर पदरीं रुका खोटा । हिजडा म्हणसी जोगी ।

तर सोळा सहस्र भोगी । तुका म्हणे वेगीं । तर हरि म्हणा जगीं ॥४॥

४६५

जन्मा आलिया गेलिया परी । भक्ति नाहीं केली ।

माझें माझें म्हणोनियां । गुंतगुंतों मेलीं ॥१॥

येथें कांहीं नाहीं । लव गुरूच्या पायीं । चाल रांडें टाकी रुका ।

नकों करूं बोल । गुरुविण मार्ग नाहीं । करिसी तें फोल ॥२॥

खाउनी जेउनि लेउनि नेसुनि । म्हणती आम्ही बऱ्या । साधु संत घरा आल्या । होती पाठमोऱ्या ॥३॥

वाचोनि पढोनि जाले शाहणे । म्हणती आम्ही संत । परनारी देखोनि त्यांचें । चंचळ जालें चित्त ॥४॥

टिळा टोपी घालुनि माळा । म्हणती आम्ही साधु । दयाधर्म चित्तीं नाहीं । ते जाणावे भोंदु ॥५॥

कलियुगीं घरोघरीं । संत जाले फार । वीतिभरी पोटासाठीं । हिंडती दारोदार ॥६॥

संत म्हणती केली निंदा । निंदा नव्हे भाई । तुका असे अनन्यें भावें शरण संतां पायीं ॥७॥

॥११॥

वाघा - अभंग १

४६६

अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधांचा घुमारा । अवचिता भरला वारा । या मल्लारी देवाचा ॥१॥

शुद्धसत्वाचा कवडा मोठा । बोधबिरडें बांधला गांठा । गळां वैराग्याचा पट्टा । वाटा दावूं या भक्तिच्या ॥२॥

हृदय कोटंबा सांगातें । घोळ वाजवूं अनुहातें । ज्ञानभांडाराचें पोतें । रितें नव्हे कल्पांतीं ॥३॥

लक्ष चौऱ्यांशी घरें चारी । या जन्माची केली वारी । प्रसन्न जाला देव मल्लारी । सोहंभावीं राहिलों ॥४॥

या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेंपरें। गुरुगुरु करी वेडे चारें । पाहा तुकें भुंकविलें ॥५॥

॥१॥

लळित - अभंग ११

४६७

आजी दिवस जाला । धन्य सोनियाचा भला ॥१॥

जालें संताचे पंगती । बरवें भोजन निगुती ॥धृ.॥

रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ॥२॥

तुका म्हणे आला । चवी रसाळ हा काला ॥३॥

४६८

तुम्ही तरी सांगा कांहीं । आम्हांविशीं रखुमाबाई ॥१॥

कांहीं उरलें तें ठायीं । वेगीं पाठवुनी देई ॥धृ.॥

टोकत बैसलों देखा । इच्छीतसें ग्रासा एका ॥२॥

प्रेम देउनि बहुडा जाला । तुका म्हणे विठ्ठल बोला ॥३॥

४६९

वाट पाहें बाहे निडळीं ठेवुनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टी लागलें चित्त ॥१॥

कई येतां देखें माझा मायबाप । घटिका बोटें दिवस लेखीं धरूनियां माप ॥धृ.॥

डावा डोळा लवे उजवी स्फुरते बाहे । मन उतावळि भाव सांडुनियां देहे ॥२॥

सुखसेजे गोडचित्तीं न लगे आणीक । नाठवे घर दार तान पळाली भूक ॥३॥

तुका म्हणे धन्य दिवस ऐसा तो कोण । पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ॥४॥

४७०

तुझें दास्य करूं आणिका मागों खावया । धिग् जालें जिणें माझें पंढरीराया ॥१॥

काय गा विठोबा तुज म्हणावें । थोराच्या दैवें गोड शुभअशुभ ॥धृ.॥

संसाराचा धाक निरंतर आम्हांसी । मरण भलें परि काय अवकळा तैसी ॥२॥

तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका म्हणे कवणा लाज हें कां नेणसी ॥३॥

४७१

पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं ॥१॥

माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ॥धृ.॥

घेतलें नुतरी । उचलोनि कडियेवरी ॥२॥

तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रम्हरस ॥३॥

४७२

कथेची सामुग्री । देह अवसानावरी ॥१॥

नको जाऊं देऊं भंगा । गात्रें माझीं पांडुरंगा ॥ध्रु.॥

आयुष्य करीं उणें । परी मज आवडो कीर्तन ॥२॥

तुका म्हणे हाणी । या वेगळी मना नाणीं ॥३॥

४७३

गळित जाली काया । हें चि लळित पंढरिराया ॥१॥

आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥ध्रु.॥

वाइला कळस । तेथें स्थिरावला रस ॥२॥

तुका म्हणे गोड जालें । नारायणीं पोट धालें ॥३॥

४७४

रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥१॥

कुंचे ढळती दोहीं बाहीं । जवळी रखुमाई राही ॥ध्रु.॥

नाना उपचारीं । सिद्धि वोळगती कामारी ॥२॥

हातीं घेऊनि पादुका । उभा बंदिजन तुका ॥३॥

४७५

हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ॥१॥

तैसा दिसे नारायण । मुख सुखाचे मंडण ॥ध्रु.॥

कोटि चंद्रलीळा । पूर्णिमेच्या पूर्णकळा ॥२॥

तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनि माघारी ते न ये ॥३॥

४७६

पतित पतित । परी मी त्रिवाचा पतित ॥१॥

परी तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ॥ध्रु.॥

नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥२॥

अपराधाचा केलों । तुका म्हणे किती बोलों ॥३॥

४७७

उभारिला हात । जगीं जाणविली मात ॥१॥

देव बैसले सिंहासनीं । आल्या याचका होय धनी ॥ध्रु.॥

एकाच्या कैवाडें । उगवे बहुतांचें कोडें ॥२॥

दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ॥३॥

॥११॥

आशीर्वाद - अभंग ५

४७८

जीवेंसाटीं यत्नभाव । त्याची नाव बळकट ॥१॥

पैल तीरा जातां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ॥ध्रु.॥

विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥२॥

तुका म्हणे भोळियांचा । देव साचा अंकित ॥३॥

४७९

आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥१॥

कल्याण ती असो क्षेम । वाढे प्रेम आगळें ॥ध्रु.॥

भक्तिभाग्यगांठी धन । त्या नमन जीवासी ॥२॥

तुका म्हणे हरिचे दास । तेथें आस सकळ ॥३॥

४८०

तया साटीं वेचूं वाणी । अइकों कानीं वारता ॥१॥

क्षेम माझे हरिजन । समाधान पुसतां त्यां ॥ध्रु.॥

परत्रींचे जे सांगाती । त्यांची याती न विचारीं ॥२॥

तुका म्हणे धैर्यवंतें । निर्मळचित्तें सरवीं तीं ॥३॥

४८१

अभय उत्तर संतीं केलें दान । जालें समाधान चित्त तेणें ॥१॥

आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ॥ध्रु.॥

आलें जें उचित देहविभागासी । तेणें पायांपासीं उभी असों ॥२॥

तुका म्हणे करी पूजन वैखरी । बोबडा उत्तरीं गातों गीत ॥३॥

४८२

असो मंत्रहीन क्रिया । नका चर्या विचारूं ॥१॥

सेवेमधीं जमा धरा । कृपा करा शेवटीं ॥ध्रु.॥

विचारूनि ठाया ठाव । येथें भाव राहिला ॥२॥

आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ॥३॥

॥५॥

४८३

ऐकें वचन कमळापती । मज रंकाची विनंती ॥१॥

कर जोडितों कथाकाळीं । आपण असावें जवळी ॥ध्रु.॥

घेई ऐसी भाक । मागेन जरि कांहीं आणिक ॥२॥

तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुका राखावा ॥३॥

४८४

आली लळिताची वेळ । असा सावध सकळ ॥१॥

लाहो करा वेगीं स्मरा । टाळी वाउनि विश्वंभरा ॥ध्रु.॥

जालिया अवसान । न संपडती चरण ॥२॥

तुकयाबंधु म्हणे थोडें । अवधि उरली आहे पुढें ॥३॥

४८५

नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचामनेंसहित आलों शरण ॥१॥

करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रिदें करावीं खरीं ॥ध्रु.॥

नेणें भक्तिभाव तुझा म्हणवितों दास । जरि देसी अंतर तरि लज्जा कोणास ॥२॥

म्हणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये । आतां कोण दुजा ऐसा आम्हांसी आहे ॥३॥

४८६

तूं च मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जीवलग जीवाचा ॥१॥

आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ध्रु.॥

तूं च क्रियाकर्म धर्म देव तूं कुळ । तूं च तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥२॥

म्हणे तुकयाबंधु करिता कार्यता देवा । तूं च भाव भक्ति पूजा पुनस्कार आघवा ॥३॥

४८७

करुनि उचित । प्रेम घालीं हृदयांत ॥१॥

आलों दान मागायास । थोरी करूनियां आस ॥ध्रु.॥

चिंतन समयीं । सेवा आपुली च देई ॥२॥

तुकयाबंधु म्हणे भावा । मज निरवावें देवा ॥३॥

४८८

गाऊं वाऊं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनि भय लज्जा शंका आस निरास ॥१॥

बळियाचा बळी तो कैवारी आमुचा । भुक्तिमुक्तिदाता सकळां ही सिद्धींचा ॥ध्रु.॥

मारूं शब्दशस्त्रबाण निःशंक अनिवार । कंटकाचा चुर शिर फोडूं काळाचें ॥२॥

म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड । आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ॥३॥

४८९

सांडूनि वैकुंठ । उभा विटेवरी नीट ॥१॥

आला आला रे जगजेठी । भक्ता पुंडलिकाचे भेटी ॥ध्रु.॥

पैल चंद्रभागे तिरीं । कट धरूनियां करीं ॥२॥

तुकयाबंधु म्हणे अंबर । गजर होतो जयजयकार ॥३॥

४९०

कृपाळु भक्तांचा । ऐसा पति गोपिकांचा ॥१॥

उभा न पाचारितां दारीं । न संगतां काम करी ॥ध्रु.॥

भाव देखोनि निर्मळ । रजां वोडवी कपाळ ॥२॥

तुकयाबंधु म्हणे न भजा । कां रे ऐसा भोळा राजा ॥३॥

४९१

केला अंगीकार पंढरीच्या देवें । आतां काय करिती काळ मशक मानवें ॥१॥

घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें । बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें ॥ध्रु.॥

लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता निर्धार कळों आला आम्हांसी ॥२॥

म्हणे तुकयाबंधु न लगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ॥३॥

४९२

अगोचरी बोलिलों आज्ञेविण आगळें । परी तें आतां न संडावें राउळें ॥१॥

जाईल रोकडा बोल न पुसती आम्हां । तुझा तुझें म्हणविलें पाहा पुरुषोत्तमा ॥ध्रु.॥

न व्हावा न वजावा न कळतां अन्याय । न धरावें तें मनीं भलता करा उपाय ॥२॥

म्हणे तुकयाबंधु हीन मी म्हणोनि लाजसी । वारा लागों पाहातोहे उंच्या झाडासी ॥३॥

४९३

जाली पाकसिद्धि वाट पाहे रखुमाई । उदक तापलें डेरां चीकसा मर्दुनी अई ॥१॥

उठा पांडुरंगा उशीर जाला भोजनीं । उभ्या आंचवणा गोपी कळस घेउनी ॥ध्रु.॥

अवघ्या सावचित्त सेवेलागीं सकळा । उद्धव अक्रूर आले पाचारूं मुळा ॥२॥

सावरिली सेज सुमनयाति सुगंधा । रत्नदीप ताटीं वाळा विडिया विनोदा ॥३॥

तुका विनंती करी पाहे पंढरीराणा । असा सावचित्त सांगे सकळा जना ॥४॥

४९४

उठा सकळ जन उठिले नारायण । आनंदले मुनिजन तिन्ही लोक ॥१॥

करा जयजयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ध्रु.॥

जोडोनि दोन्ही कर मुख पाहा सादर । पायावरी शिर ठेवूनियां ॥२॥

तुका म्हणे काय पढियंतें तें मागा । आपुलालें सांगा सुख दुःखें ॥३॥

४९५

करूनी विनवणी पायीं ठेवीं माथा । परिसावी विनवणी माझी पंढरीनाथा ॥१॥

अखंडित असावेंसें वाटतें पायीं । साहोनि संकोच ठाव थोडासा देई ॥ध्रु.॥

असो नमो भाव आलों तुझिया ठाया । पाहें कृपादृष्टी मज पंढरीराया ॥२॥

तुका म्हणे आम्हीं तुझीं वेडीं वांकडीं । नामें भवपाश हातें आपुल्या तोडीं ॥३॥

४९६

घडिया घालुनि तळीं चालती वनमाळी । उमटती कोमळीं कुंकुमाचीं ॥१॥

वंदा चरणरज अवघे सकळ जन । तारियेले पाषाण उदकीं जेणें ॥ध्रु.॥

पैस धरुनी चला ठाकत ठायीं ठायीं । मौन्य धरुनी कांहीं नो बोलावें ॥२॥

तुका अवसरु जाणवितो पुढें । उघडलीं महाल मंदिरें कवाडें ॥३॥

४९७

भीतरी गेले हरी राहा क्षणभरी । होईल फळ धीर करावा ॥१॥

न करीं त्वरा ऐकें मात । क्षण एक निवांत बैसावें ॥ध्रु.॥

करूनी मर्दन सारिलें पाणी । न्हाले देव अंग पुसी भवानी ॥२॥

नेसला सोनसळा विनवी रखुमाई । वाढिलें आतां ठायीं चलावें जी ॥३॥

करुनियां भोजन घेतलें आंचवण । आनंदें नारायण पहुडले ॥४॥

तुका मात जाणवी आतां । सकळां बहुतां होती ची ॥५॥

४९८

द्या जी आम्हां कांहीं सांगा जी रखुमाई । शेष उरलें ठायीं सनकादिकांचें ॥१॥

टोकत बाहेरी बैसलों आशा । पुराया ग्रासा एकमेकां ॥ध्रु.॥

येथवरी आलों तुझिया नांवें । आस करुनी आम्ही दातारा ॥२॥

प्रेम देउनियां बहुडा आतां दिला । तुका म्हणे आतां विठ्ठल बोला ॥३॥

४९९

बहुडविलें जन मन जालें निश्चळ । चुकवूनी कोल्हाळ आला तुका ॥१॥

पर्यंकीं निद्रा करावें शयन । रखुमाई आपण समवेत ॥ध्रु.॥

घेउनियां आलों हातीं टाळ वीणा । सेवेसि चरणा स्वामीचिया ॥२॥

तुका म्हणे आतां परिसावीं सादरें । बोबडीं उत्तरें पांडुरंगा ॥३॥

५००

नाच गाणें माझा जवळील ठाव । निरोपीन भाव होईल तो ॥१॥

तुम्हां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें । उतरूनि जीवें जाईन लोण ॥ध्रु.॥

एकाएकीं बहु करीन सुस्वरें । मधुर उत्तरें आवडीनें ॥२॥

तुका म्हणे तूं जगदानी उदार । फेडशील भार एका वेळा ॥३॥

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी. २३०० वर्षं ज्या भाषेत जनव्यवहार आणि ज्ञानव्यवहार चालू आहेत अशी भाषा. गाथा सप्तशती पासून ते ज्ञानोबा तुकोबा आणि आताच्या तरूण लेखकांच्या प्रतिभेचा अखंड झरा ज्या भाषेतून वाहतो आहे. अशा भाषेला इंटरनेटच्या काळात झुळझुळते ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक व्यक्ती व संस्था करीत आहेत. त्यातली एक ई साहित्य प्रतिष्ठान. करोडो पुस्तकांसह इंटरनेट व्यापलेल्या इंग्रजी भाषेसमोर या सर्व संस्थांचे एकत्रित कार्यही खुपच लहान आहे. पण आम्ही निराश नाही. मराठी भाषेतील आत्मगत शक्तीचा पाठिंबा आणि बारा कोटी मराठी लोकांचे पाठबळ या प्रयत्नांच्या पाठीशी आहे. फ़ार पुर्वी लढाया दगड धोंड्यांनी होत. नंतर बाण तलवारींनी होत. नंतर बंदुका रणगाडॆ आणि विमानांच्या लढाया झाल्या. पण या पुढच्या लढाया बटनांच्या लढाया असणार आहेत. इंटरनेट आणि एकूणच मिडियावर ज्यांची सत्ता ते जेते. अशा काळात इंटरनेटवर मराठी भाषेचे वर्चस्व दिसायला हवे.

आपणा सर्वांचे सहकार्य असेल तर हे अजिबात अशक्य नाही. आपण निदान ज्ञानोबा तुकोबांना तरी प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोचवू या. महाराष्ट्राच्या गांवोगावी, आणि जगभरातल्या देशोदेशी. ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके मोबाईलवर वाचता येतात. अनेक आघाडीच्या ऍंड्रॉईड ऍप वर ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके उपलब्ध आहेत. एका बटनाच्या अंतरावर. हे वादळ आता घरोघरी जाऊ द्या. आपल्या ओळखीच्या प्रत्येक व्यक्तीला ही गाथा फ़ॉरवर्ड करा. व त्यांचे ई मेल पत्ते esahity@gmail.com वर कळवा. दहाहून जास्त लोकांना पुस्तके पाठवणार्‍यांना किंवा त्यांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवणार्‍यांना आम्ही ई साहित्यचे VIP सभासद करून घेतो. विनामूल्य.

जय हिंद

जय महाराष्ट्र

टीम ई साहित्य